इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ८५ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




शनिवार,ता. २५ जुलै २०२६ | आषाढ शुक्ल ११ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००



सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ।।
तुळसी हार गळा कासे पितांबर।
आवडे निरंतर हेची ध्यान ।।

# लेखी आश्वासनानंतर वांगचुक यांचे उपोषण मागे

■ नवी दिल्ली,ता.२४–

**सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी 'नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्यावरून सुरू केलेले आपले २६ दिवसांचे उपोषण सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर मागे घेतले आहे. एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओ संदेशात सोनम वांगचुक यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला.**

देशभरातील युवकांमध्ये निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर आणि विविध राजकीय पक्षांच्या सातत्यपूर्ण आंदोलनांमुळे केंद्र सरकार आता सक्रिय झाले आहे. गुरुवारी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत (पान २ वर)



### सरकारने या मागण्या मान्य केल्या

सोनम वांगचुक यांच्या मते, सरकारने लेखी स्वरूपात आंदोलन करणाऱ्या आणि 'संसद चलो' मोर्चात सहभागी झालेल्या विद्यार्थी व युवकांविरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा एफआयआर दाखल केली जाणार नाही. प्रश्नपत्र फुटीच्या घटनेमुळे मृत्यू झालेल्या २० हून अधिक विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना सरकारकडून योग्य ती आर्थिक मदत व भरपाई दिली जाईल. या संपूर्ण प्रकरणावर, परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा आणि शिक्षण क्षेत्रातील सरकारी जबाबदारी याबाबत संसदेत सखोल चर्चा केली जाईल, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये या मागण्या मान्य केल्या आहेत.

### नुकसान सरकारचे–वांगचुक

धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न देणे हे सरकारच्याच दृष्टीने नुकसानकारक असल्याचे वांगचुक यांनी म्हटले. जर त्यांनी राजीनामा दिला असता, तर सरकारचे होणारे नुकसान थांबले असते.

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर सीजेपी ठाम

## आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार

■ नवी दिल्ली,ता.२४ –

**सोशल मीडिया मोहीम चालवणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) शुक्रवारी आपले देशव्यापी विद्यार्थी आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.**



शुक्रवारी दिल्लीतील जंतर मंतर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना, मोहिमेचे नेते अभिजीत दीपके म्हणाले, देशातील युवकांची एक साधी आणि स्पष्ट मागणी आहे: धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे. जोपर्यंत शिक्षणमंत्री राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत जंतर मंतर येथील आंदोलन सुरूच राहील. जर भाजप किंवा सरकारला हा प्रश्न सोडवायचा असेल, तर त्यावर एकच उपाय आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे.

ते पुढे म्हणाले, पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण संपवल्याने आम्हाला खूप दिलासा मिळाला आहे. कोणत्याही विद्यार्थ्यावर गुन्हा दाखल होऊ नये, ही त्यांची अट होती. आम्ही त्यांचे मनापासून आभार मानू इच्छितो. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, तिने संपूर्ण देशातील लोकांना जागृत केले. सोनम वांगचुक यांनी या देशासाठी आणि भावी पिढ्यांसाठी जे केले आहे, ते इतिहासात कायम स्मरणात राहील. देशभरात जनजागृती करण्यासाठी उचललेल्या या पावलासाठी आम्ही त्यांचे आभार मानतो. यामुळे एक मोठा बदल घडून आला आहे आणि तिच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण भारतात एक मोठी चळवळ उभी राहिली.

## नीट–यूजी पेपरफूट

# एनटीएचे ४७ कर्मचारी बडतर्फ

## केंद्र सरकारचे कठोर पाऊल

■ नवी दिल्ली,ता.२४–

**देशातील सर्वात मोठी परीक्षा आयोजित करणारी संस्था नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) गेल्या काही काळापासून पेपरफुट आणि परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरव्यवहारांमुळे वादाच्या केंद्रस्थानी होती. या पार्श्वभूमीवर नीट पेपरफुट प्रकरणी एनटीएने ४७ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे.**




**तसेच, गैरव्यवहार आणि पेपरफुटात सहभागी असल्याचा संशय असलेल्या काही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशीबरोबरच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

शिक्षण मंत्रालयाच्या सूत्रांच्या माहितीनुसार, एनटीएच्या प्रशासकीय आणि कार्यकारी रचनेची व्यापक पुनर्रचना करण्यात येत असून, येत्या एका महिन्याच्या आत संस्थेची संपूर्ण कार्यपद्धती, जबाबदाऱ्या आणि अंतर्गत व्यवस्थापन नव्याने उभारण्यात येणार आहे. देशातील स्पर्धा परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि (पान २ वर)

# ४८ लाखांच्या फसवणूक प्रकरणात दोघे जेरबंद

## तिसऱ्या संशयिताच्या शोधासाठी पथक मुंबईत

■ कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट शासकीय कागदपत्रांच्या आधारे तब्बल ४८ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कळे पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. तिसऱ्या संशयिताच्या अटकेसाठी पथक मुंबईकडे रवाना झाले आहे.**

या प्रकरणी वारनुळ (ता.पन्हाळा) येथील बबन कुंभार यांच्या फिर्यादीनुसार राजापूर येथील अमृतराव काळोखे, करजवाडे येथील सुरेश देसाई आणि थेरगाव येथील शिवाजी मोहिते यांच्याविरुद्ध



अमृतराव काळोखे   सुरेश देसाई

कळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांनी सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत बनावट शासकीय शिक्के, (पान २ वर)

# पावसाची उघडीप ; शेतीकामाला वेग

■ कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**जिल्ह्यात पावसाची उघडझाप सुरु असून पंचगंगा नदीचे पाणी पुन्हा नदी पात्रात आले आहे. ग्रामीण भागातही पावसाने घात दिल्याने रोप लागणीच्या कामाला गती आली असून शेतकरी बैल औतांच्या मदतीने तर काही ठिकाणी रोटरच्या सहायाने चिखलगुठ्ठ्याचे काम करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात रोपलागण आता अंतिम टप्प्यात आली आहे, काही शेतकरी उगवन झालेल्या भाताच्या कोळपणीत व्यस्त आहेत.**



यंदाचा खरीप हंगाम जूनमध्ये पावसाने दडी मारल्याने लांबणीवर पडला असून खरीप पेरणीही उशिरा सुरु झाला असला तरी आतापर्यंत ७२ टक्के पेरणी झाली आहे, जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र १ लाख ८० हजार ७४६ हेक्टर इतके आहे, आतापर्यंत १ लाख ३० हजार ९७८ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. भात रोपांची लागण वगळता इतर सर्व खरीप पिकांची लागण झाली असल्याचे कृषि विभागाने सांगितले.

उगवण झालेल्या भातासह इतर पिकांमध्ये आंतरमशागतीचे कामही सुरु असून हंगाम एकाच वेळी सुरु झाल्यामुळे शेतीकामासाठी मजूर मिळेनासे झाल्यामुळे शेतकरी कुटुंबच शेतात राबत आहे, तसेच नातेवाईकांचीही मदत शेतीकामासाठी घेतली जात आहे. एकमेकांना (पान २ वर)

# विठ्ठल दर्शनाची रांग पाच किलोमीटरपर्यंत

■ सोलापूर,ता.२४ (प्रतिनिधी)–

**श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेचा आषाढी एकादशी सोहळा शनिवारी होत असून, राज्यातून लाखो भाविक पंढरीत दाखल होत आहेत. यामुळे देवाच्या दर्शनाची रांग गोपाळपूरच्या पुढे स्वेरी कॉलेजपर्यंत पोहोचली आहे. रांगेत हजारो भाविक थांबले असल्याने प्रत्येक भाविकाला देवाच्या दर्शनासाठी अंदाजे २० ते २४ तासांचा कालावधी लागत आहे.** (पान २ वर)

# केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू यांचा राजीनामा

■ नवी दिल्ली,ता.२४–



**केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तसेच अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी शुक्रवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला.**

पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. (पान २ वर)

# पुसेगाव-फलटण मार्गावर अपघात; तिघे जागीच ठार




■ फलटण,ता.२४(वार्ताहर)–

**फलटण तालुक्यातील वाठार निंबाळकर हद्दीत पुसेगाव–फलटण मार्गावर भीषण कार अपघात झाला. यामध्ये सुरवडी येथील कमिन्स कंपनीत कार्यरत असलेल्या तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले. भरधाव वेगातील कार चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्यालगतच्या नाल्याच्या कठड्यावर जोरदार धडक देत वाहन पलटी झाल्याने हा भीषण अपघात घडला.**

या अपघातात मोहम्मद हुसेन (रा.अयोध्या, उत्तर प्रदेश), अनिल हेबरम आणि सदानंद पुर्ती (दोघे रा.जमशेदपूर, झारखंड) यांचा मृत्यू झाला. तर नयन लोंगाणी, सौरभ कुमार (झारखंड) आणि एम. डी. मितारे (बिहार) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काम आटोपल्यानंतर सर्व सहकारी वाठार निंबाळकर येथील त्यांच्या वसतिगृहात परतले. त्यानंतर रात्री ते कारमधून फलटण–लोणंद पालखी महामार्गावरील एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले. जेवण झाल्यानंतर ताथवडे घाट परिसरात फेरफटका मारून परत येत असताना मोहम्मद हुसेन यांनी वाहन चालवण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार वाहनाचा ताबा (पान २ वर)



(पान १ वरून)

## पुसेगाव-फलटण मार्गावर अपघात; तिघे जागीच ठार

त्यांच्याकडे देण्यात आला. वाठार-निंबाळकर हद्दीतील एका वळणावर कार भरधाव वेगात असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. कार रस्त्याच्या उजव्या बाजूला जाऊन नाल्याच्या कठड्यावर जोरदार आदळली आणि पलटी झाली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू करत जखमींना रुग्णवाहिकेतून फलटण येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी मोहम्मद हुसेन, अनिल हेबरम आणि सदानंद पुर्ती यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. तर अन्य तिघे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी फलटण ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतीकामाला वेग

शेतीकामात मदत म्हणून पैरा पध्दतीचाही अवलंब काही शेतकरी करीत आहेत. गेल्या दोन दिवस पावसाने उघडीप दिल्याने शहरातील जनजीवन पूर्वपदावर आले असून बाजारपेठात गजबज सुरु झाली आहे. तसेच पात्राबाहेर गेलले पंचगंगेचे पाणी पुन्हा पात्रामध्ये आले आहे. त्यामुळे संभाव्य पुराचा धोका टळला आहे. शहरात महापालिकेने पंचगंगा घाटावरील पुराच्या पाण्याबरोबरच आलेला गाळ काढण्याचे कामही गतीने हाती घेतले आहे.

गेल्या दोन दिवसात पावासाने दिलेल्या उघडीपीमुळे एका दिवसात पाण्याख ७ बंधारे मोकळे झाले असून शुक्रवारी सायंकाळी २३ बंधारे पाण्याखाली होते, तर पंचगंगा नदीच्या पाणी पातळीतही घट होऊ लागली असून एका दिवसात अडीच फुटांनी पाणीपातळीत घट झाली आहे.

## ४८ लाखांच्या फसवणूक प्रकरणात दोघे जेरबंद

बोगस सह्या आणि खोटी नियुक्तीपत्रे तयार करून फिर्यादीसह इतरांची ४८ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. त्यानुसार अमृतराव काळोखे याला पुणे येथून, तर सुरेश देसाई याला करजवाडे येथील राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. फरार असलेला तिसरा संशयित शिवाजी मोहिते याच्या अटकेसाठी पोलिसांचे विशेष पथक मुंबईकडे रवाना झाले असून, त्यालाही लवकरच ताब्यात घेतले जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईत पोलिस कॉन्स्टेबल विजय वाडकर, पोलिस नाईक पंडित पोवार आणि पोलिस कॉन्स्टेबल शहाजी दुर्गुळे यांनी सहभाग घेतला.

## विठ्ठल दर्शनाची रांग पाच किलोमीटरपर्यंत

आषाढी सोहळ्यातील भाविकांच्या गर्दीचा अंदाज घेऊन मंदिरे समितीने दर्शन रांगेतील भाविकांसाठी यंदा प्रथमच २० पत्राशेडची निर्मिती केली आहे. दर्शनरांगेत कायमस्वरूपी ४ व अतिरिक्त १६, अशा एकूण २० पत्राशेडची निर्मिती करण्यात आली आहे. या सर्व पत्रा शेडमध्ये भाविक रांगेत थांबले आहेत. दर्शन रांगेतील भाविकांना कोणत्याही अडचणी निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर हे सतत दर्शन रांगेची पाहणी करत आहेत. दर्शनरांग शिस्तबद्ध व गतिमान झाली आहे, यामुळे भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ व सुखकर होत आहे. दर्शनरांगेत भाविकांच्या सोयीसाठी सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे, दिशादर्शक व माहिती फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक ध्वनीप्रणाली, लाइव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टीव्ही, फॅब्रिकेटेड शौचालये, स्वच्छता व्यवस्था, आयसीयू व प्रथमोपचार केंद्र, पुरेसे वैद्यकीय कर्मचारी, विश्रांती कक्ष, बसण्याची व्यवस्था, आपत्कालीन मार्ग, अग्निशमन व्यवस्था यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे मंदिर समितीचे हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

## केंद्रीय मंत्री बिट्टू यांचा राजीनामा

रवनीत सिंह बिट्टू हे पंजाबचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय बेअंत सिंग यांचे नातू असून सध्या भाजपचे नेते आणि राज्यसभेचे खासदार आहेत. बिट्टू यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी काँग्रेसचा राजीनामा देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी लुधियाना मतदारसंघातून अमरिंदर सिंह राजा वडिंग यांच्या विरोधात निवडणूक लढवली, मात्र त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. निवडणुकीत पराभव होऊनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळात त्यांची केंद्रीय रेल राज्यमंत्री तसेच अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर २०२४ ते २०२६ या कालावधीत त्यांची राजस्थानमधून राज्यसभेवर निवड झाली होती.

# पेपरफुटी विरोधात काँग्रेसतर्फे आज धरणे, कॅन्डल मार्च

■ कोल्हापूर,ता.२४ (प्रतिनिधी)-

**देशभरात सातत्याने होणाऱ्या परीक्षांच्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थी व पालकांचे भविष्य टांगणीला लागले आहे. या गंभीर प्रश्नावर केंद्र सरकारच्या दुर्लक्षा विरोधात आणि पीडित विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने शनिवारी २५ जुलै रोजी कोल्हापुरात धरणे आंदोलन व कँडल मार्च आयोजिला आहे.**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार हे राज्यव्यापी आंदोलन छेडले जात आहे. कोल्हापुरातील राजारामपुरी परिसरामध्ये राजाराम गार्डन जनता बाझार चौक येथे सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हे आंदोलन होणार आहे. सायंकाळी ५ ते ६ या दरम्यान धरणे आंदोलन करण्यात येईल. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत राजाराम गार्डन येथून आईचा पुतळा मार्गे सायबर कॉलेज पर्यंत कँडल मार्च काढण्यात येईल. या आंदोलनात खास.शाहू छत्रपति, काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आम.सतेज पाटील, आम.जयंत आसगावकर, माजी आम. ऋतुराज पाटील, राजूबाबा आवळे, गणपतराव पाटील, सुर्यकांत पाटील बुद्धीहाळकर, शशांक बावचकर, संजय कांबळे, तौफिक मुल्लाण्णी, राजेश लाटकर, इंद्रजीत बोंद्रे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, तालुकाध्यक्ष,जिल्ह्यातील काँग्रेसचे सर्व प्रमुख नेते, महिला, कार्यकर्ते, युवक काँग्रेस, एनएसयूआयचे प्रतिनिधी तसेच विद्यार्थी आणि पालक उपस्थित राहणार आहेत, असे शहराध्यक्ष प्रविण केसरकर यांनी सांगितले.

# नाम. गोरे यांच्या हस्ते दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किटचे वाटप

■ पंढरपूर,ता.२४ (प्रतिनिधी)-

**आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र(मोरोची) येथे उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किटचे वाटप करण्यात आले. यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन उपस्थित होते.**



दिंडी प्रमुखांना प्रथमोपचार किटचे वाटप करताना पालकमंत्री जयकुमार गोरे.

आषाढी वारी कालावधीत वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पालखी मार्गावर फिरते वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, तात्पुरते उपचार केंद्र व औषधसाठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. कोणत्याही वारकऱ्याला आरोग्यविषयक अडचण आल्यास तात्काळ सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने नियोजन केले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनाली परतरावर यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते. पालकमंत्री गोरे यांनी आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांची पाहणी करून डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना २४ तास सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या.

# वांगचुक यांचे उपोषण मागे

(पान १ वरून)

सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आणि विविध घोषणा केल्या. या घडामोडींमध्ये सोनम वांगचुक यांनी त्यांच्या उपोषणाच्या २६ व्या दिवशी, रात्री सुमारे १२.३० वाजता उपोषण मागे घेतले. सोनम वांगचुक यांनी सांगितले की केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा, जितेंद्र सिंह आणि लडाखच्या एपेक्स बॉडीचे वरिष्ठ नेते त्यांची भेट घेण्यासाठी आले होते. यापूर्वी विविध राजकीय पक्षांतील सुमारे ६५ खासदारांनी पत्रावर स्वाक्षऱ्या करून सोनम वांगचुक यांना उपोषण समाप्त करण्याची विनंती केली होती. खासदार आणि मंत्र्यांनी त्यांना आश्वासन दिले होते की नीट प्रश्नपत्र फुटी प्रकरण आणि देशातील परीक्षा व्यवस्थेच्या प्रश्नावर संसदेत चर्चा केली जाईल.

सोनम वांगचुक यांनी एक्सवर व्हिडिओ संदेशात सांगितले की गेल्या दोन दिवसांपासून सरकार आणि त्यांच्यात चर्चा सुरू होती. ते सरकारकडून लेखी आश्वासनाची मागणी करत होते. त्यामुळे त्यांना आणखी दोन दिवस उपोषण सुरू ठेवावे लागले. अखेर सरकारने त्यांच्या मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण समाप्त करण्याचा निर्णय घेतला.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मुद्द्यावर सोनम वांगचुक म्हणाले की सरकार त्याबाबत कोणतेही ठोस आश्वासन देऊ शकले नाही. त्यांनी सांगितले की त्यांच्या समोर दोन पर्याय होते एकतर अनेक आठवडे उपोषण सुरू ठेवून स्वतःचा जीव धोक्यात घालणे किंवा उपोषण समाप्त करणे. ते म्हणाले, गेल्या दोन-तीन आठवड्यांपासून हजारो लोक मला सांगत होते की हा लढा पुढे नेण्यासाठी माझे जिवंत राहणे आवश्यक आहे. आपल्या मागण्या मान्य झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या देशभरातील नागरिकांचे आभार मानले.

# दरड कोसळून १३ जणांचा मृत्यू

■ शिमला,ता.२४-

**हिमाचल प्रदेशच्या लाहोल-स्पीती जिल्ह्यात शुक्रवारी दुपारी भीषण दुर्घटना घडली. तिंदीहून पांगीकडे जात असलेल्या टाटा सूमो टॅक्सीवर अचानक डोंगरावरील भली मोठी दरड कोसळल्याने वाहन चिरडले गेले. या भीषण अपघातात १३ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाने दिली आहे.**

उदयपूर-किलाड मार्गावरील कडू नाला परिसरात हा अपघात घडला. अपघातग्रस्त टाटा सूमो कुल्लूहून पांगीकडे जात होती. वाहनात चालकासह सुमारे १४ प्रवासी असल्याचे सांगितले जात आहे.मागील दिवशी मुसळधार पावसामुळे आणि दरड कोसळल्याने उदयपूर-किलाड मार्ग वाहतुकीसाठी बंद होता. शुक्रवारी मार्ग सुरू झाल्यानंतर वाहन पांगीकडे रवाना झाले. मात्र, कडू नाला परिसरात अचानक डोंगराचा मोठा भाग कोसळून ही दुर्घटना घडली.

## मद्य तस्करी; साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

■ कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)-

**पन्हाळा तालुक्यातील कोतोली येथे अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका कारवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने शुक्रवार ता. २४ रोजी कारवाई केली. यात १ लाख ३३ हजार रुपयांचा मद्यसाठा आणि ३ लाख रुपयांची कार असा एकूण ४ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आशिष राजेंद्र कटारे (रा.टेंबलाईवाडी,कोल्हापूर) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शाहूवाडी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने कोतोली हद्दीतील केर्ले-नांदगाव मार्गावर सापळा रचला होता. यावेळी संशयास्पद कारची तपासणी केली असता, त्यामध्ये विविध ब्रँडच्या देशी दारूचे १८० मिलीचे १८ बॉक्स आणि ९० मिलीचे १६ बॉक्स आढळून आले.

त्यानंतर कारचालक आशिष राजेंद्र कटारे याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १ लाख ३३ हजार रुपयांचा मद्यसाठा आणि ३ लाख रुपयांची कार असा एकूण ४ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस.आर.गायकवाड करीत आहेत.

# सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### कर्जमाफीसह वीज थकबाकी माफीचा लाभ- मंत्री शिवेंद्रसिंहराजे

■ सातारा,ता,२४(प्रतिनिधी)-

**आजपर्यंत कधीही कर्जमाफी व वीज बिल थकीत माफी झाली नाही, ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ मिळाला असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बोलताना दिली.**



राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सातारा जिल्ह्यातील ५३ हजार ७३६ खातेदार शेतकऱ्यांना ५६९ कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील लाभाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा केली जाणार आहे. याशिवाय ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपधारकांची वीज थकबाकी माफ करण्याच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे दोन लाख शेतकऱ्यांना १,०६८ कोटी रुपयांचा अतिरिक्त दिलासा मिळणार असल्याचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बोलताना सांगितले.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे रामकृष्ण वेताळ, भाजपचे गटनेते अविनाश कदम, विकास गोसावी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ७.५ एचपीपर्यंतच्या कृषी वीजपंपांची सुमारे ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीज थकबाकी माफ करण्याचा निर्णय जाहीर केल्याचेही त्यांनी सांगितले. या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांच्या वीजबिलाचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याची माहिती ना शिवेंद्रसिंहराजे यांनी बोलताना दिली.

शेती क्षेत्र अधिक सक्षम आणि शाश्वत करण्यासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली जात असून, जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, सौर कृषीवाहिनी, सौरपंप आणि नदीजोड प्रकल्प यांसारख्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. भविष्यात दिवसा शंभर टक्के वीजपुरवठा आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# प्रभाग १६ मध्ये स्वच्छता निरीक्षक-मुकादम यांच्यात जुंपली

■ इचलकरंजी,ता.२४-

**प्रभाग क्र.१६ मधील सफाई कर्मचाऱ्यांच्या हजेरीवरून स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम यांच्यात चांगलीच जुपल्याचे चित्र सकाळी न्यायालय आवार परिसरात दिसून आले. एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रकार देखील घडला. आर्थिक कारणावरून हा प्रकार घडल्याचे बोलले जात आहे.**

प्रभाग क्र १६ मध्ये साफसफाईचे कामासाठी सध्या महापालिकेचे आणि खाजगी मक्तेदाराचे देखील कर्मचारी कार्यरत आहेत. पण कर्मचारी असूनही भागातील स्वच्छतेचा बोजवारा उडताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी गटारी तुंबल्याचे तसेच कचऱ्याचे ढीग दिसून येतात. याबाबतच्या तक्रारी भागातील नगरसेवकांच्या सोशल मिडीया ग्रुपवर दिसून येत आहेत. त्यामुळे महापालिका आणि ठेकेदार यांचेकडील कर्मचारी नेमके करतात तरी काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रभागात अनेक कर्मचारी नियुक्त असलेतरी प्रत्यक्ष हजर किती असतात, हे न उलगडलेले कोडे आहे. त्यामुळे 'भजनाला आठ अन खायला साठ' अशी महापालिका आरोग्य विभागाची अवस्था झाल्याचे दिसून येते. सफाई कर्मचारी महापालिकेकडील असो अथवा ठेकेदाराकडील तो कामावर नसतानाही त्याची हजेरी लागते किंबहुना प्रभागात जादा कर्मचारी असल्याचे दाखविले जाते. यात मोठे आर्थिक गणित दडल्याची चर्चा आहे. सदरची बाबत खटकल्यामुळेच भर रस्त्यावर स्वच्छता निरिक्षक आणि मुकादमामध्ये जुंपल्याचे बोलले जाते.

दरम्यान, असाच प्रकार अन्य भागातही केला जात असेल तर महापालिकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील सर्व प्रभागात अचानक फिरती करण्याची आवश्यता आहे. त्यामध्ये गैरहजर कर्मचाऱ्यांची हजेरी लागत असेल तर स्वच्छता निरिक्षक, मुकादमासह कामचुकार सफाई कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवावा, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

# राधानगरी धरण ८७ टक्के भरले

■शिरगाव,ता.२४(प्रतिनिधी)-

**राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेले दोन दिवस पावसाचा जोर थोडा कमी झाला आहे. मात्र पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक सुरू असल्याने राधानगरी धरण शुक्रवारी सायंकाळी चार वाजेपर्यंत ८७ . ५ ४ टक्के भरले आहे.**

राधानगरी धरणाची पाणी पातळी ३४१ . ९० फूट असून पाणीसाठा ७३ २ ७ दक्ष लक्ष घनफूट आहे. धरणात ७ .३२ टिएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. सायंकाळी चारपर्यंत गेल्या आठ तासात धरण परिक्षेत्रात २८ मि.मी पावसाची नोंद झाली. धरणाच्या वीज निर्मिती केंद्रातून भोगावती नदीत १५०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

दरम्यान तुळशी धरणात २.४५ टिएमसी पाणीसाठा झाला असून धरण ७०.७१ टक्के भरले आहे. काळम्मावाडी (दुधगंगा) धरणात १२.६३ टिएमसी पाणीसाठा झाला असून धरण ४९.७५ टक्के भरले आहे.यंदा गतवर्षाच्या तुलनेत धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचे सरासरी प्रमाण कमी राहिले आहे. तरी तालुक्यातील प्रमुख धरणात आजतागायत लक्षणीय जलसाठा झाला आहे. ही बाब समाधानकारक आहे.

## जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | ७०.८८ |
| राधानगरी | ८.३६ | ०७.२८ |
| तुळशी | ३.४७ | ०२.४४ |
| वारणा | ३४.४० | २६.६२ |
| काळम्मावाडी | २५.३९ | १२.५० |
| कासारी | २.७७ | १.९९ |
| कडवी | २.५२ | १.९३ |
| कुंभी | २.७२ | १.८० |
| पाटगाव | ३.७२ | २.२१ |
| चिकोत्रा | १.५२ | ०.७१ |
| चित्री | १.८९ | १.६० |
| जंगमहट्टी | १.२२ | १.०६ |
| घटप्रभा | १.५६ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८२ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.०२ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |
| कोदे.ल.पा. | ०.२१ | ०.२१ |

## एनटीएचे ४७ कर्मचारी बडतर्फ

(पान १ वरून)

विश्वासार्ह बनविणे हा या सुधारणांचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.परीक्षा प्रक्रियेत झालेल्या त्रुटींचे एक प्रमुख कारण म्हणून सुरक्षा मानकांकडे झालेली दुर्लक्ष आणि बाह्य संस्थांवर वाढलेले अवलंबित्व समोर आले आहे. यामुळे तज्ज्ञ समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यानुसार, एनटीएकडून खासगी संस्था आणि विक्रेत्यांना काम देण्याच्या प्रक्रियेत मोठे बदल करण्यात येणार असून, त्यांच्या निवडीसाठी अधिक कठोर आणि पारदर्शक निकष लागू केले जाणार आहेत.

एनटीएचे पुनर्गठन करताना भविष्यात कोणत्याही प्रकारचा पेपरफुट होऊ नये, यासाठी लीक-प्रूफ परीक्षा प्रणाली विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानासह सक्षम मनुष्यबळाच्या मदतीने बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारली जाणार आहे. केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला मुळीच सहन केले जाणार नाही. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी आगामी काळात आणखी कठोर सुधारणा राबविण्यात येणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.


भावपूर्ण श्रद्धांजली!



श्री. गजानन रघुनाथ म्हेतर

आमचे पार्टनर श्री. अक्षय गजानन म्हेतर यांचे वडिल श्री. गजानन रघुनाथ म्हेतर यांचे बुधवार, दि. २२/७/२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

गणेश पॉलीमर्स, पायोनियर पॉलीमर्स
सर्व कामगार वर्ग, इचलकरंजी.

भावपूर्ण श्रद्धांजली!




लालबी रहिमानसो खलिफा

आमच्या पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. मुसाभाई रहिमानसो खलिफा यांच्या मातोश्री लालबी रहिमानसो खलिफा यांचे शुक्रवार, दि.२४/०७/२०२६रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच अल्लाह चरणी प्रार्थना!

चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, सल्लागार व ऑफीस स्टाफ
इचलकरंजी जनता नागरी सहकारी पतसंस्था मर्या., इचलकरंजी.
(टिप-जियारत रविवार, दि. २६/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. होईल)

भावपूर्ण श्रध्दांजली



लालबी रहिमानसो खलिफा

आमचे मंडळाचे सेक्रेटरी श्री. मुसाभाई रहिमानसो खलिफा यांच्या मातोश्री लालबी रहिमानसो खलिफा यांचे शुक्रवार दि.२४/७/२०२६ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना !

अवधुत आखाडा व्यायाम मंडळ
गावभाग, इचलकरंजी.

।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



श्री. राजेंद्र तुकाराम पाटील (दादा)

आमचे परममित्र श्री. राजेंद्र तुकाराम पाटील (दादा) यांचे गुरुवार, दि. २३/७/२६ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

संजय देशमाने, सुदर्शन बाबर, प्रविण रावळ
मुस्सा जमादार, रणजीत शिंदे, रविंद्र कोंडेकर
योगेश कवडे, संदिप शेळके, चंदू शिंदे
मुन्ना जमादार, राजेंद्र तळकर, सरदार पद्मन
दत्ता डाकरे (D.D.ग्रुप)

CTM ग्रुप, इचलकरंजी.
रक्षाविसर्जन : रविवार, दि. २६/०७/२०२६ रोजी सकाळी ८ वा. पंचगंगातिरी

# रेकॉर्डवरील गुन्हेगारासह मोका आरोपी पुन्हा मोकाट

## पोलिसांकडून कडक कारवाईची गरज

इचलकरंजी,ता.२४–

**मोका कारवाईसह रेकॉर्डवरील अनेक गुन्हेगार जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा मोकाट फिरत असून खंडणी, मारहाण, दहशत, तोडफोड आणि शस्त्रांचा धाक दाखवत पुन्हा एकदा संघटित गुन्हेगारीने डोके वर काढल्याचे चित्र दिसत आहे. गुन्हेगारांच्या वाढत्या प्रकारामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही महिन्यांतील सलग घटनांमुळे पोलिस खात्याच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून गुन्हेगाराविरूध्द कडक कारवाईची गरज निर्माण झाली आहे.**



### ठोस उपाय योजनांची गरज

सराईत गुन्हेगारावर केवळ हद्दपार किंवा प्रतिबंधात्मक कारवाई करून भागणार नाही, अशी भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर सातत्यपूर्ण देखरेख, जामिनाच्या अटींचे कठोर पालन, अवैध आर्थिक स्रोतांवर कारवाई, शस्त्रसाठा आणि अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीवर आघात तसेच संवेदनशील भागात अधिक प्रभावी गस्त आणि गुप्त माहिती संकलन यांसारख्या ठोस उपाययोजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

वस्त्रनगरीमध्ये वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस खात्यामार्फत मोका, हद्दपार आणि प्रतिबंधात्मक कारवाईसारखे कठोर उपाय यापूर्वी करण्यात आले.मात्र, त्याचा अपेक्षित धाक गुन्हेगारांवर राहिलेला दिसत नाही. उलट जामिनावर सुटलेले रेकॉर्डवरील आरोपी पुन्हा त्याच पद्धतीने सक्रिय होत असल्याचे अलीकडील गुन्ह्यांमधून समोर येत आहे.

व्यापारी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करत खंडणीची मागणी, विरोध करणाऱ्यांवर प्राणघातक हल्ले, वाहनांची तोडफोड आणि उघडपणे शस्त्रांचे प्रदर्शन अशा घटनांनी शहराच्या कायदा-सुव्यवस्थेला मोठे आव्हान निर्माण केले आहे.

गुन्हेगारांकडून संघटितपणे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याने अनेक भागांत भीतीचे वातावरण आहे. परिणामी, व्यापारी वर्ग आणि नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून, गुन्हेगारीचे वाढते धाडस चिंतेचा विषय ठरत आहे.

# फेरीवाल्यांचे आमरण उपोषण महापौरांच्या आश्वासनानंतर मागे

इचलकरंजी,ता.२४–

**शहरातील शिवतीर्थ परिसरातील गाळ्याबाबत २२ जुलैपासून फेरीवाला संघटनेच्या वतीने सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल घेत शुक्रवारी महापौर उदय धातुंडे यांनी फेरीवाला संघटनेच्या पदाधिकारी व संबंधितांशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली.**

शिवतीर्थ परिसरातील फेरीवाल्यांसाठी पर्यायी व्यवस्था करून देण्याबाबत महापौरांनी आश्वासन दिले.आश्वासनानंतर फेरीवाला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व उपोषणकर्त्यांनी आमरण उपोषण मागे घेतले.

फेरीवाल्यांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांना योग्य व पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे महापौरांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी सभागृह नेते विठ्ठल चोपडे, परिवहन सभापती अरुणा बचाटे, मागासवर्गीय सभापती रुबेन आवळे यांच्या हस्ते सरबत देऊन उपोषणकर्त्यांचे उपोषण सोडवण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, शहाजी भोसले, भाऊसो आवळे, शशिकांत मोहिते, प्रमोद बचाटे व अन्य नगरसेवक उपस्थित होते.

# महिलांवरील अत्याचारात वाढ

## कुठे विनयभंग तर कुठे छेडछाड; जिल्ह्यात ६ महिन्यांत ४९ अत्याचाराचे गुन्हे

कोल्हापूर, ता.२४ (प्रतिनिधी)–


**महिला सुरक्षेसाठी अनेक उपाययोजना आणि कठोर कायदे असूनही कोल्हापूर जिल्ह्यात महिलांवरील लैंगिक अत्याचार आणि विनयभंगाच्या घटना कमी झालेल्या नाहीत.कागल तालुक्यातील मुरगूड येथे एका अल्पवयीन मुलीची छेडछाड तर दुसरीकडे,हेरवाड(ता.शिरोळ) येथील हायस्कूलमध्ये शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला. नुकत्याच घडलेल्या दोन घटनांमुळे महिला-युवतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.**

जिल्हा पोलिसांच्या १ जानेवारी ते १५ जुलै २०२६ या साडेसहा महिन्यांच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात लैंगिक अत्याचाराचे ४९ गुन्हे दाखल झाले आहेत. म्हणजेच दरमहा सरासरी ८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. यामुळे महिला सुरक्षेसाठी राबवल्या जाणाऱ्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या गंभीर गुन्ह्यांमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेकदा सामाजिक दबाव, बदनामीची भीती किंवा कौटुंबिक कारणांमुळे तक्रार नोंदवण्यास उशीर होतो. त्यामुळे प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांची संख्या नोंद झालेल्या गुन्ह्यांपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. विशेषतः ग्रामीण भागातील अल्पवयीन मुली, शिक्षणासाठी बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनी आणि नोकरी करणाऱ्या महिलांच्या सुरक्षा गंभीर बनली आहे.

तपासादरम्यान अनेक प्रकरणांमध्ये आरोपी हा अनोळखी नसून पीडितेच्या ओळखीच्या व्यक्ती, नातेवाईक, मित्र तसेच विश्वासातील व्यक्ती असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ सार्वजनिक ठिकाणांपुरता मर्यादित नसून घर, नातेसंबंध आणि कौटुंबिक परिसरातही गंभीर बनला आहे.तक्रार दाखल करण्यास उशीर झाल्याने पोलिसांच्या तपासावरही परिणाम होतो.अत्याचार रोखण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहेच; पण त्यासोबतच समाजाची मानसिकता बदलणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

स्त्री-पुरुष समानता, महिलांबद्दल आदर, मुलांमधील संवेदनशीलता आणि लैंगिक शिक्षण यांवर भर दिल्यास अशा गुन्ह्यांवर दीर्घकालीन नियंत्रण मिळवता येईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.











।। झाडु संतांचे मार्ग ।। करु पंढरीचा स्वर्ग ।।

**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**

स्वच्छ भारत अभियान
जा.क्र./पंनपं/आरोग्य ३७३७/२०२६

दूरध्वनी क्र. (०२१८६) २२३०१२
comcpandharpur@gmail.com

माझी वसुंधरा ७.०
दि. २१/०७/२०२६

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण २०२६

**आषाढी यात्रा २०२६**



**यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन**

भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. शहराचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

१) राहण्याची व्यवस्था - यात्रेकरु, दिंडीकरी, फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे. कोणत्याही धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.

२) उघड्यावरील अन्न टाळा.- आपले आरोग्य बिघडू नये म्हणून उघड्यावरील व माश्या बसलेले अन्नपदार्थ शिळे अन्न आणि नासकी फळे, कापलेली फळे खाणे टाळावे.

३) शुध्द पाणी - नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या शुध्द व पिण्याच्या पाण्याचाच वापर करावा, नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये.

४) घनकचरा व्यवस्थापन :- आपल्या मठ/संस्था. वास्तव करणाऱ्या ठिकाणी इ.मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. ओला, सुका असा वेगवेगळा साठवून ठेवावा तो नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्येच द्यावा.

५) शौचालयांचा वापर :- नगरपरिषद प्रशासनाने ठिकठिकाणी उभारलेल्या तात्पुरत्या व कायमस्वरूपी शौचालयांचाच वापर करावा. तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयांचा वापर करावा. उघड्यावर शौचास बसू नये.

६) प्लॅस्टिकचा वापर टाळा :- पंढरपूर शहरात प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी आहे. पंढरपूर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशव्या वापरू नका. कृपया कापडी पिशव्यांचा वापर करावा.

७) प्रशासनाला सहकार्य करा :- आपत्कालीन परिस्थितीत पोलीस आणि स्वयंसेवकांच्या सूचनांचे पालन करा.

८) वैद्यकीय मदत :- कुठेही त्रास जाणवल्यास तात्काळ जवळच्या नगरपरिषद प्रथमोपचार केंद्र किंवा शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधावा.

९) पार्कींग व्यवस्था ठिकाणे :- अंबाबाई पटांगण, संत गजानन महाराज मठामागे, इसबावी विसावा मंदिर समोर, सांगोला रोड एम.एस.ई.बी. समोर, कुंभार घाट समोर, कवठेकर गल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मरिआई पटांगण, कराड रोड, वेअर हाऊस जवळ, रेल्वे स्टेशन मैदान, आहिल्या देवी चौक, नवीन पुलाजवळ, वाखरी पालखी तळ, कुर्डूवाडी रोड गणेश ढाबा पिछाडी इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**



**▪ संपादकीय ▪**

# प्रतीक्षा निर्णायक निकालाची

ठाकरेसेनेच्या सहा खासदारांचे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलिनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेण्यास आता सर्वोच्च न्यायालयाने संमती दर्शवली आहे. तृणमूल काँग्रेस या पश्चिम बंगालमधील पक्षाच्या २० खासदारांबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. त्यांनी एका अनोळखी अगदीच पाटी कोरी असलेल्या पक्षात प्रवेश केला आहे. त्यावर काय निर्णय होतो याकडेही सगळ्यांचे लक्ष लागले आहे. तथापि, हे विषय गंभीर आहेत. त्याचे कारण मतदारांचा कौल मनमानी पद्धतीने बदलण्याचा प्रकार लोकप्रतिनिधींनी सुरू केला आहे. या निवडून आलेल्या प्रतिनिधींना तो अधिकार आहे का? याचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे आहे.राजकारणाचा मूळ ढाचा सध्या एका विचित्र आणि चिंताजनक वळणावर येऊन ठेपला आहे. ज्या कायद्याची निर्मिती लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री थांबवण्यासाठी आणि मतदारांच्या कौलाचा सन्मान करण्यासाठी करण्यात आली होती, तोच कायदा आज सत्तांतराचे आणि राजकारणातील सोयीस्कर समीकरणांचे सर्वात मोठे साधन बनला आहे. पक्षांतर विरोधी कायदा आज आपल्याच मूळ उद्दिष्टांपासून भरकटल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि ठाकरेसेना सोडून बंडखोर गटात सामील झालेल्या सहा खासदारांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने तूर्तास या विलीनीकरणाला स्थगिती देण्यास नकार दिला असला, तरी या निमित्ताने पुन्हा एकदा पक्षांतर विरोधी कायद्यातील गंभीर पळवाट चव्हाट्यावर आली आहे. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ४ मध्ये विलीनीकरणाचा अपवाद देण्यात आला आहे. या नियमानुसार, जर एखाद्या राजकीय पक्षाच्या विधिमंडळ किंवा संसदेतील सदस्यांपैकी दोन तृतीयांश (२/३) सदस्यांनी दुसऱ्या पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला, तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होत नाही. १९८५ मध्ये जेव्हा हा कायदा संमत झाला,तेव्हा त्यातील तरतुदींमागचा हेतू स्वच्छ होता.मात्र,गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहिल्या तर हा अपवाद म्हणजेच कायद्याची सर्वात मोठी पळवाट ठरला आहे.पूर्वी ज्या कथित राजकीय फेरजुळण्या फुटकळ स्वरूपात होत होत्या त्यांना आता घाऊक स्वरूप प्राप्त झाले आहे. आता वैयक्तिक पातळीवर एकापाठोपाठ एक आमदार किंवा खासदार पक्ष सोडत नाहीत; तर थेट दोन-तृतीयांश संख्याबळ गाठून संपूर्ण गटच बाहेर पडतो. याचा अर्थ एका प्रस्थापित पक्षातील ८० ते ९० टक्के माल किंवा डोकी तशीच्या तशी वेगळ्या पक्षात जाऊन बसतात.महाराष्ट्रातील २०२२ चे सत्तापालट, राष्ट्रवादी काँग्रेसमधील उभी फूट, गोव्यात काँग्रेसच्या ८ आमदारांचे भाजपमध्ये झालेले विलीनीकरण, अगदी अलीकडेच आपच्या राज्यसभा खासदारांचे झालेले पक्षांतर ही सर्व उदाहरणे या एकाच तंत्राची पुनरावृत्ती.दोन-तृतीयांश बहुमताच्या नावाखाली मतदारांनी दिलेल्या कौलामध्ये फेरफार करण्याची आणि नवी निवडणूक न होताच सरकारे बदलण्याची ही पळवाट घटनात्मकदृष्ट्या योग्य आहे का ? हा ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत रास्त आहे. पक्षांतराच्या याचिकांवर निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार सभागृहाच्या अध्यक्षांकडे असतो.परंतु, दुर्दैवाने अध्यक्षांचे पद हे निष्पक्ष मानले जात असले तरी प्रत्यक्षात ते सत्ताधारी पक्षाच्या राजकीय हितसंबंधांच्या बाजूने झुकलेले दिसते. अपात्रतेच्या याचिकांवर वर्षानुवर्षे निर्णय न घेणे किंवा स्वतःच्या पक्षाला सोयीचे निर्णय घेणे ही एक नेहमीची पद्धत बनली आहे.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रसंगी अध्यक्षांच्या या विलंबावर आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित भूमिकेवर कडक ताशेरे ओढले आहेत.परंतु,प्रत्यक्ष कारवाईचा अधिकार अध्यक्षांकडेच राहिल्याने कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही ही वस्तुस्थिती आहे.मतदाराने एका पक्षाच्या चिन्हावर, विचारांवर आणि जाहीरनाम्यावर विश्वास ठेवून लोकप्रतिनिधीला निवडून दिलेले असते.परंतु,निवडून आल्यानंतर तोच प्रतिनिधी आपल्या वैयक्तिक किंवा राजकीय सोयीसाठी संपूर्ण गट घेऊन दुसऱ्या पक्षात जातो, तेव्हा मतदाराचा कौल पूर्णपणे पायदळी तुडवला जातो. २००३ मध्ये घटनादुरुस्तीद्वारे मूळ कायद्यातील एक-तृतीयांश फुटीचा नियम रद्द करण्यात आला होता.तरीही दोन-तृतीयांश विलीनीकरणाचा नियम वापरून सरकारे पाडण्याचे सत्र थांबलेले नाही. आता चेंडू सर्वोच्च न्यायालयाच्या कोर्टात आहे. न्यायालयासमोर दोन महत्त्वाचे मार्ग आहेत. एक जर न्यायालयाने कायद्याची व्याख्या अधिक कडक केली, तर भविष्यात अशा प्रकारे होणाऱ्या घाऊक पक्षांतरांना आळा बसेल आणि राजकीय स्थैर्य लाभेल. न्यायालयाने सध्याचीच व्याख्या कायम ठेवली, तर राजीनामा न देता किंवा निवडणुकीला सामोरे न जाता दोन-तृतीयांशचा मार्ग वापरून सत्तांतर करण्याचे प्रयोग चालूच राहतील.

# समानतेच्या दिशेने पाऊल; पण...

**मध्य प्रदेश विधानसभेने समान नागरी संहिता (युनिफॉर्म सिव्हिल कोड) विधेयकाला मंजुरी देत देशातील महत्त्वाच्या घटनात्मक चर्चेला नवे वळण दिले आहे. उत्तराखंड, गुजरात आणि आसामनंतर समान नागरी संहिता लागू करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारे मध्य प्रदेश हे चौथे राज्य ठरले आहे. राज्यपालांच्या माध्यमातून राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा लागू होईल आणि विवाह,घटस्फोट, वारसा, दत्तक, पोटगी तसेच कौटुंबिक अधिकारांशी संबंधित बाबींमध्ये सर्व नागरिकांसाठी समान कायदेशीर व्यवस्था अस्तित्वात येईल.**

हा केवळ नवा कायदा नसून भारतीय राज्यघटनेने अपेक्षित केलेल्या समान नागरिकत्वाच्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.भारतीय जनता पक्षाच्या राजकीय आणि वैचारिक भूमिकेत समान नागरी संहिता हा अनेक दशकांपासूनचा प्रमुख विषय राहिला आहे.जनसंघाच्या काळापासून राममंदिर,कलम ३७० आणि समान नागरी संहिता हे पक्षाचे तीन प्रमुख मुद्दे मानले जात होते. राममंदिराची उभारणी पूर्ण झाली, जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्यात आले आणि आता समान नागरी संहितेची अंमलबजावणी विविध राज्यांमधून टप्प्याटप्प्याने सुरू होत असल्याचे चित्र दिसत आहे.मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केलेले निवडणूक आश्वासन या विधेयकामुळे पूर्ण झाले असून, पुढील काळात इतर राज्यांमध्येही अशा प्रकारच्या कायद्यांची प्रक्रिया वेग घेण्याची शक्यता आहे. समान नागरी संहितेचा मूळ हेतू कोणत्याही एका धर्माचा कायदा इतरांवर लादणे हा नसून सर्व नागरिकांना समान नागरी हक्क आणि समान कायदेशीर संरक्षण देणे हा आहे.सध्या भारतात विवाह, घटस्फोट, वारसा,दत्तक आणि कौटुंबिक संबंध यांसारख्या विषयांवर विविध धर्मांचे स्वतंत्र वैयक्तिक कायदे लागू आहेत. त्यामुळे एकाच देशातील नागरिक असूनही त्यांच्या नागरी हक्कांमध्ये भिन्नता निर्माण होते. राज्यघटनेने अपेक्षित केलेली समानता ही केवळ राजकीय किंवा सामाजिक संकल्पना नसून कायद्यापुढे सर्व नागरिक समान असावेत, ही




तिची मूलभूत भावना आहे.याच कारणामुळे राज्य घटनेतील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनुच्छेद ४४ अंतर्गत सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.मध्य प्रदेशच्या विधेयकात अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. पहिला जोडीदार जिवंत असताना दुसरा विवाह करता येणार नाही. तिहेरी तलाक आणि निकाह हलाला यांना बेकायदेशीर आणि दंडनीय घोषित करण्यात आले आहे.घटस्फोटाला केवळ न्यायालयीन प्रक्रियेद्वारेच कायदेशीर मान्यता मिळेल. लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांना एका महिन्याच्या आत नोंदणी करणे बंधनकारक असेल. तसेच मालमत्ता, वारसा,पोटगी आणि कौटुंबिक अधिकारांमध्ये महिलांना समान कायदेशीर संरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. विशेषतः महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि न्यायाच्या दृष्टीने या तरतुदींना महत्त्व प्राप्त झाले

**दैनंदिनी**

आहे. समान नागरी संहितेच्या आवश्यकतेवर सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमध्ये वेळोवेळी भाष्य केले आहे. शाह बानो प्रकरणापासून सायरा बानो प्रकरणापर्यंत न्यायालयाने वैयक्तिक कायद्यांच्या नावाखाली महिलांच्या घटनात्मक अधिकारांवर गदा येऊ नये, अशी भूमिका स्पष्ट केली. तिहेरी तलाकविरोधातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि त्यानंतर केंद्र सरकारने केलेला कायदा हे त्याच विचारांचे पुढील पाऊल मानले जाते. न्यायालयाने धार्मिक स्वातंत्र्याचा आदर राखतानाच लैंगिक समानता आणि मानवी प्रतिष्ठा यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे,असे सातत्याने अधोरेखित केले आहे. मात्र समान नागरी संहितेला विरोध करणाऱ्यांचे म्हणणेही पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डासह काही संघटनांचा दावा आहे की या कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा येऊ शकतात आणि वैयक्तिक कायद्यांमध्ये हस्तक्षेप होऊ शकतो. काहींच्या मते,हा कायदा बहुसंख्याक समाजाच्या परंपरा इतर समुदायांवर लादण्याचा प्रयत्न ठरू शकतो. अशा शंका आणि भीती दूर करणे ही सरकारची जबाबदारी आहे.लोकशाही व्यवस्थेत कायदा बनविणे जितके आवश्यक आहे, तितकेच समाजात विश्वास निर्माण करणेही आवश्यक असते.संवाद, पारदर्शकता आणि घटनात्मक मूल्यांवरील विश्वास या माध्यमातूनच अशा संवेदनशील विषयांवर व्यापक सामाजिक सहमती निर्माण होऊ शकते.एक महत्त्वाची बाब लक्षात घेण्यासारखी आहे की समान नागरी संहितेचा संबंध धार्मिक श्रद्धा,पूजा-पद्धती,आहार, वेशभूषा किंवा धार्मिक परंपरांशी नाही. हा कायदा केवळ विवाह, घटस्फोट, वारसा, दत्तक आणि मालमत्तेच्या नागरी अधिकारांशी संबंधित आहे.त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य अबाधित ठेवत नागरी व्यवहारांमध्ये समानता आणण्याचा हा प्रयत्न आहे. भारतीय राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्य आणि समान नागरी हक्क या दोन्ही मूल्यांना समान महत्त्व दिले असून,त्यांच्यात समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे. मध्य प्रदेशने उत्तराखंड आणि गुजरातप्रमाणेच आदिवासी समाजाला या कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवले आहे. त्यामागे त्यांच्या पारंपरिक सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेचा सन्मान राखण्याचा उद्देश असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. यावरून समान नागरी संहिता लागू करताना देशातील विविधता आणि स्थानिक वैशिष्ट्ये लक्षात घेण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

# भक्तीभावाप्रमाणे अनुभूती देणारा पंढरीचा 'पांडुरंग'

**पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो.त्यामुळेच संतांनी 'सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु', असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला 'कानडा' म्हणूनही हाक मारली आहे.चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते.ज्याचा जसा भक्तीभाव असेल,तशी त्याला देव अनुभूती देतो.**

धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात,'हा धनगरांचा देव आहे.हा मूळ 'आदिम'(आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह 'पंडरिगे'या गावी आला आणि पुढे तो 'पांडुरंग' झाला.'पंडरिगे या गावाची 'पंढरी' झाली.पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला 'पंढरपूर'या नावाने संबोधण्यात येऊ लागले.अशा रितीने पंढरीचे पंढरपूर झाले. पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर',असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता.त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात,तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात.तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे.असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात.(आद्य शंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते ;कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा,मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती



असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते.नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे.त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा',असे जैनांचे मत आहे.

दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे,तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे.व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. 'विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हणतात', तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून 'वेंगडम'असे म्हणतात. त्यामुळेच त्याला 'विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश'असेही म्हणतात.कुरूबा ('कुरूबा' समाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे.) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून 'विठोबा' निर्माण झाला. शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तीत पुष्कळ साम्य आढळते.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे.वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत,''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे.तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे.त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत.तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग'आहे.एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली,''अरे दादा,तूया पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.''त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो.अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे.असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे.

कोणत्या तरी विशिष्ट वारीला, तिथीला अथवा कोणत्या तरी मासात विशिष्ट देवतांची स्पंदने पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असतात. तो काळ त्या देवतेचा काळ मानला जातो,उदा. शिवाचा सोमवार, दत्ताचा गुरुवार, तशी श्रीविष्णूची एकादशी. वर्षभरात २४ वेळा येणाऱ्या एकादशींच्या तुलनेत आषाढ आणि कार्तिक मासांतील शुक्लपक्षात येणाऱ्या एकादशींच्या वेळी श्रीविष्णूचे तत्त्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने श्रीविष्णूशी संबंधित या दोन एकादशींचे महत्त्व अधिक आहे.

**▪ जगन घाणेकर**

## वाचकांचा पत्रव्यवहार

### एकतेचा संदेश देणारी पंढरीची वारी

आषाढी वारीमध्ये जात, पात, धर्म, उच्च, निच्च,गरीब - श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता आपल्या घरादारांसह मुलाबाळांची, संसाराची सर्वकाही जबाबदारी पांडुरंगावर सोपवून वारकरी यामध्ये लीन होतात.फक्त आणि फक्त टाळ मृदंगाच्या गजरात विठुरायाचा जप केला जातो.आजच्या डिजिटल युगातही वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना दिसून येते आहे.स्नेह आणि ज्ञानाची जीवनमूल्ये अधिक वाढावीत, सर्वांमधला चैतन्याचा अंश एकच आहे ही मनोधारणा वाढावी हाच वारीचा संदेश आहे.वारी हा फक्त अध्यात्मिक सोहळा नाही ती सामाजिक आणि आरोग्याची चळवळ आहे.शेकडो किलो मीटरचा पायी प्रवास करतांना शिस्त,संयम,परोपकार आणि साधेपणाचे आचरण वारकरी दाखवतात.कोणताही गोंधळ न करता स्वच्छतेची आणि शिस्तीची शिकवण जगापुढे ठेवणारी हि वारी जगात दुर्मिळ असून सेवा, श्रद्धा, समर्पण आणि एकतेचा संदेश देणारी अशी ही पंढरीची वारी......या सोहळ्यानिमित्त सर्वांना शुभेच्छा!

**▪ राजू जाधव,मांगूर**

## आनंदाचे डोही आनंद तरंग

पंढरीची वारी ही बघण्यापेक्षा अनुभवण्याची गोष्ट आहे. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठीच संतांनी वारीची परंपरा सुरू केली. येथे सर्व वारकरी एक आहेत.वर्षभरात येणाऱ्या एकादशींपैकी आषाढी आणि कार्तिकी या दोन एकादशी विशेष मानल्या जातात. आषाढी एकादशी चातुर्मासाची सुरुवात दर्शवते आणि भगवान विष्णूंच्या योगनिद्रेचे प्रतीक आहे. उपवास, भजन-कीर्तन, व्रत यामुळे मानसिक शांती मिळते आणि आत्मशुद्धी होते. पावसाळ्यातील हा काळ आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा असल्याने हलका आहार आणि भक्ती यांचा मेळ या वारीत दिसतो. विदेशी पर्यटकांसाठीही पंढरीची वारी हे एक आश्चर्य आहे.



शिस्तबद्धपणे चालणारा हा लाखो भाविकांचा सोहळा जगभरातील संशोधकांसाठी अभ्यासाचा विषय ठरला आहे.आज समाजाला जातीयता, दांभिकता, अंधश्रद्धेपासून वाचवण्यासाठी संत साहित्य आणि वारीतील समता हाच खरा प्रेरणास्त्रोत आहे. 'माउली-माउली' ची एक हाक आणि चंद्रभागेच्या तीरावरचा टाळ-मृदंगाचा ठेका म्हणजे स्वर्गीय अनुभव. यंदा पुन्हा एकदा महाराष्ट्र विठ्ठलमय होणार आहे.


**▪ प्रा.विजय कोष्टी**

## जाता पंढरीसी.. सुख वाटे जीवा!

'भिडे आसमंती ध्वजा वैष्णवांची, उभी पंढरी आज नादावली! तुझे नाव ओठी,तुझे रूप ध्यानी,जीवाला तुझी आस गा लागली! जरी बाप साऱ्या जगाचा परि तू,आम्हा लेकरांची विठू माऊली!' खरेच विठुरायाचे हे यथार्थ वर्णन आहे.पंढरीची वारी आणि तिची समृद्ध परंपरा संतांची भूमी असलेल्या आपल्या महाराष्ट्राचा सांस्कृतिक अनमोल ठेवाच आहे.वारीतील विठू माऊलीच्या गजरात तल्लीन झालेला वारकरी पाहता जीवनाचे खरे सुख आणि समाधान यातच सामावलेले आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही विठ्ठल नामाचा गजर करीत विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने खांद्यावर भगव्या पताका घेऊन पंढरीच्या दिशेने जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या दिंड्यांनी ओसंडून वाहणाऱ्या रस्त्यांचे दृश्य विलोभनीयच! विठ्ठलनामाच्या जयघोषाने भक्तांच्यात संचारलेला अमाप उत्साह वातावरण अधिकच भारून टाकत असतो आणि याची प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे साक्षात स्वर्गीय सुखाचीच अनुभूती असते.

**▪ श्रीकांत जाधव**

## दैनिक पंचांग (सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.२५.७.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, ग्रीष्म ऋतो,आषाढ मासे,शुक्ल पक्षे,एकादशी तिथी, ११.३५ नंतर द्वादशी तिथी,ज्येष्ठा नक्षत्र, अहोरात्र वृश्चिक रास, ब्रह्मायोग, २१.०९ नंतर ऐंद्र योग, विष्टी करण,११.३५ नंतर बव करण २४.४७ पर्यंत,दिनमान १२.५१,सुर्योदय ०६.१४,सुर्यास्त १९.०९ (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी ९ ते १०.३०,देवशयनी एकादशी,पंढरपूर यात्रा,विष्णु शयनोत्सव, चातुर्मासारंभ,भद्रा ११.३५ पर्यंत, घबाड ११.३५ नंतर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-भीती, चिंता तुमच्या सुखी समाधानी,आनंदी जगण्याला मारक ठरू शकते.आपल्या विचारांमधून आणि कल्पनांमधूनच चिंतेचा जन्म झाला आहे हे तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल.

**वृषभ**- कुटुंबातील कुणी सदस्यांच्या आजारी पडण्यामुळे तुम्हाला आर्थिक चिंता येऊ शकते. तथापि, यावेळी तुम्हाला धनापेक्षा जास्त त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.

**मिथून**- आजच्या दिवशी स्वतःसाठी वेळ काढणे खूप कठीण आहे. परंतु,आज असा दिवस आहे, जेव्हा तुमच्याजवळ आपल्यासाठी भरपूर वेळ असेल.

**कर्क**- चार भिंतीबाहेरील उपक्रम तुमच्यासाठी लाभदायक ठरतील. आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवाल.

**सिंह**- रात्री उशिरापर्यंत बाहेर राहणे आणि इतरांवर खर्च करणे टाळा.समजूतदारपणामुळेच तुम्ही तुमच्या पत्नीस भावनिक आधार देऊ शकाल.

**कन्या**-तुमच्या जीवनातील विमनस्कतेमुळे तुमच्या जोडीदारावरील तणाव वाढेल.जोपर्यंत एखादे काम पूर्ण होण्याची खात्री होत नाही तोपर्यंत कसलेही वचन देऊ नका.

**तुळ**- त्रयस्थ व्यक्तीचा हस्तक्षेप वैमनस्य निर्माण करू शकतो. तुम्ही सरळ उत्तरे दिली नाहीत तर तुमचे सहकारी त्रासून जाण्याची शक्यता आहे.आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**वृश्चिक**- तुमच्या परिपूर्ण आत्मविश्वासाचा फायदा घ्या आणि बाहेर जाऊन नवीन लोकांशी, मित्रमंडळींशी संपर्क साधा. तुमच्या जोडीदाराची प्रकृती काहीशी खालावेल.

**धनु**-आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे.तुम्हाला उत्कृष्ट वागणुकीची गरज आहे.

**मकर**- या राशीतील वृद्ध जातक आजच्या दिवशी आपल्या जुन्या मित्रांशी रिकाम्या वेळात भेटायला जाऊ शकता. एखादा नातेवाईक, तुमच्या वैवाहिक आयुष्यात तणाव निर्माण करेल.

**कुंभ**-कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. यामुळे कामावर लक्ष विचलित होईल.

**मीन**-दिवसाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकतात.असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर असेल आणि पूर्ण दिवस तुमच्यात ऊर्जा राहील.कुटुंबियांसमवेत दिवसाचा आनंद घ्या.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०, पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणीत एसआरआय मोहिमेचे ८० टक्के काम पूर्ण

## तहसीलदारांची माहिती;राजकीय पक्षांनी सहकार्य करण्याचे आवाहन

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी तपासणी (एसआयआर) अभियानांतर्गत निपाणी विधानसभा मतदारसंघातील ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित २० टक्के काम वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींनी प्रशासनाला सक्रिय सहकार्य करावे,असे आवाहन तहसीलदार सुरेश मुंजे यांनी केले.**



निपाणी: तहसील कार्यालयात आयोजित बैठकीप्रसंगी बोलताना तहसीलदार सुरेश मुंजे,शेजारी उपस्थित कविता वारंगळ, गणपती पाटील व इतर मान्यवर.

तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राजकीय पक्षांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. मतदार नोंदणी अधिकारी कविता वारंगळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला पालिका आयुक्त गणपती पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कविता वारंगळ यांनी सांगितले की, निपाणी तालुक्यात सोमवारी सुरू झालेल्या एसआयआर अभियानांतर्गत सर्व बीएलओ नियोजनबद्ध पद्धतीने घरोघरी जाऊन तपासणीचे काम करीत आहेत. मात्र अनेक कुटुंबे रोजगार, शिक्षण किंवा इतर कारणांमुळे बाहेरगावी वास्तव्यास असल्याने त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत आहेत. तसेच काही नागरिकांनी निवासस्थान बदलून दुसऱ्या प्रभागात स्थलांतर केले असल्यामुळे त्यांच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागत आहेत. अशा परिस्थितीत स्थानिक राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी संबंधित कुटुंबांची माहिती प्रशासनाला उपलब्ध करून दिल्यास कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही,असे त्यांनी स्पष्ट केले.बैठकीदरम्यान कविता वारंगळ यांनी उपस्थित प्रतिनिधींना एसआयआर अभियानाची सविस्तर माहिती दिली.पालिका आयुक्त गणपती पाटील यांनी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होईल, यासाठी सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.बैठकीस राज्य महिला काँग्रेसच्या सरचिटणीस सुप्रिया पाटील, निपाणी ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष राजेश कदम, माजी सभापती राजू गुंदेशा, श्रीकांत बन्ने, काशीमखान पठाण यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### बूथनिहाय तपासणीला गती

निपाणी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या एसआयआर अभियानात आतापर्यंत ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित २० टक्के तपासणी लवकर पूर्ण करण्यासाठी बीएलओंसह प्रशासन कार्यरत असून बाहेरगावी असलेल्या व स्थलांतरित कुटुंबांची माहिती मिळविण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे.कोणताही पात्र मतदार यादीबाहेर राहू नये, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

## शिक्षकांना एसआयआर कामातून मुक्त करा

गडहिंग्लज,ता.२४(प्रतिनिधी)-

**बीएलओ म्हणून कार्यरत शिक्षकांवरील वाढता कामाचा ताण लक्षात घेता त्यांना एसआयआर मोहिमेच्या कामातून मुक्त करण्यात यावे, अशी मागणी आम.जयंत आसगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**

यावेळी कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व कर्मचारी सहकारी पतपेढीचे तज्ज्ञ संचालक संदीप पाटील उपस्थित होते.आम. आसगावकर म्हणाले, या कामामुळे शिक्षकांमध्ये भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, त्याचा थेट परिणाम शाळांतील अध्यापनावर होत आहे. मंत्री दादासाहेब भुसे यांनी शिक्षकांना एसआयआर कामातून वगळण्याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले तसेच शिक्षक व मुख्याध्यापकांशी अरेरावीची भाषा वापरणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



चौंडाळ गावातील मुख्य रस्त्यावर कमी उंचीच्या मिनी मोहरीवरील खचलेला रस्ता.

## चौंडाळ ओढ्यावरील मिनी मोहरीजवळचा रस्ता खचला

निढोरी,ता.२४(वार्ताहर)-

**चौंडाळ (ता.कागल) येथील मुख्य कागल रस्त्याला जोडण्यात आलेल्या ओढ्यावरील मिनी मोहरी व जवळचा रस्ता पूर्ण खचला असुन वाहतूकीला धोकादायक बनला आहे.**

गेल्या दोन वर्षांपासून अधिकारी वर्गाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सार्वजनिक बांधकाम खाते कागल विभागाच्या अखत्यारीत सदरचा मार्ग येत असुन सदर रस्त्याचे काम व मोहरीची उंची करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्या निढोरी-कागल मुख्य रस्त्याचे कामकाज गेल्या मे महिन्यापासून सुरू असून दुहेरी मार्ग म्हणून चौंडाळ व्हाया सावर्डे मार्गे कागल वहातुक सुरू आहे, मात्र येथील रस्ताच पुर्णपणे खचला असुन प्रवासी वाहतुकीसाठी धोक्याची घंटा जिवावर बेतू शकते.प्रशासनाने गांभीर्याने घेऊन अडचणीचा मार्ग खुला करावा अशी मागणी होत आहे.

# काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशाने भाजपाला बळ

## आम.जोल्ले; बेनाडीतील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**निपाणी मतदारसंघात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आगमनाने भाजप पक्षाला अधिक बळ मिळाले असल्याचे प्रतिपादन आम. शशिकला जोल्ले यांनी केले. निपाणी मतदारसंघातील बेनाडी गावातील काँग्रेस व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. या कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या.**



बेनाडी : भाजप पक्षप्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या स्वागतप्रसंगी आम.शशिकला जोल्ले,मा.खास.अण्णासाहेब जोल्ले व इतर.

यावेळी दलित समाजाचे नेते बाळासो माळगे, मोहन कोरे, अजित माने, महादेव बोरे,संजय गोरे, दीपक गोरे, रमेश कोरे, प्रभाकर मधाळे, गणपती गोरे, अर्जुन कांबळे, सुरेखा वराळे, राजश्री माळगे व त्यांच्या टीममधील ३० हून अधिक सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश केला.या सर्वांचे माजी मंत्री आणि आम.शशिकला जोल्ले, माजी खास.अण्णासाहेब जोल्ले यांनी प्रवेश केलेल्या सर्वांचे भारतीय जनता पक्षात स्वागत केले. यावेळी हालसिद्धनाथ साखर कारखान्याचे संचालक रमेश पाटील,श्रीकांत बन्ने,भरत नसलापुरे,राजू चांदुरे, पांडुरंग पाटील, सत्याप्पा हजारे शिवराज पन्नुरे,अरुण जविर, सदाशिव जनवाडे, रावसाहेब जनवाडे, लक्ष्मी खोत, बबन हवालदार व स्थानिक नेते उपस्थित होते.

# महाराष्ट्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसपास देण्यास विलंब

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**निपाणी शहरातील असंख्य महाविद्यालयीन विद्यार्थी कोल्हापुर येथे उच्चशिक्षण घेत आहेत.परंतु महाराष्ट्रातील शैक्षणिक वर्ष कर्नाटकातील शैक्षणिक वर्षापेक्षा दोन महिने लवकर सुरू होत असल्याने निपाणी आगारातील डेपो मॅनेजर हे निपाणी येथील विद्यार्थ्यांना कर्नाटक शासनाच्या शैक्षणिक वर्षापासून बस पास देत असल्यामुळे कोल्हापूरमध्ये शिक्षण घेत असलेल्या असंख्य विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.**



निपाणी डेपो मॅनेजर यांच्या आडमुठेपणामुळे येथील विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे निपाणी डेपो मॅनेजर यांनी त्वरित कर्नाटक डेपोचे बस पास उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी निपाणीतील विद्यार्थ्यांनी चिकोडी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व बुडाचे अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे यांना निवेदन देऊन केली.

सदर निवेदनाचा गांभीर्याने विचार करू व निपाणी बस स्थानकाचे डेपो मॅनेजर यांच्याशी चर्चा करू असे आश्वासन चिंगळे यांनी विद्यार्थ्यांना दिले. सदर निवेदनाची प्रत निपाणीचे तहसीलदार सुरेश मुंजे यांना देण्यात आली आहे.यावेळी आदित्य निर्मळे, आदित्य पाटील, हर्षवर्धन पाटील, सिद्धार्थ परीट, सिद्धार्थ वाडेकर, अनिश वासुदेव, सुरेश कांबळे, प्रतीक कोळी, अलोक फुटाणकर, गुरु चव्हाण आदी उपस्थित होते.



## गडहिंग्लजमध्ये युवासेनेची निदर्शने

गडहिंग्लज,ता.२४(प्रतिनिधी)-

**नीट पेपरफुटी, टीईटी पेपर फुटी, विविध भरती परीक्षांमधील कथित घोटाळे आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेविरोधात तसेच दिल्लीच्या जंतर-मंतरवर आपल्या हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीमाराचा तीव्र निषेध शिवसेना-युवासेनेच्यावतीने करण्यात आला.**

यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख अवधुत पाटील, प्रकाश रावळ, वसंत नाईक, बाळू कुंभार, सुधाकर जगताप, यांच्यासह शिवसैनिक व युवासैनिक यांनी सरकार विरोधी घोषणांनी परिसर दणाणून सोडला.



निपाणी: येथे उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ यांना निवेदन देताना उत्तम पाटील,अच्युत माने यांच्यासह इतर.

## निपाणीत जंतरमंतरवरील लाठी हल्ला प्रकरणाचा तीव्र निषेध

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अमानुषपणे मारहाण करून भाजपने देशाला काळीमा फासण्याचे काम केले असल्याची टीका युवा नेते उत्तम पाटील यांनी केली.**

दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ला प्रकरणाचा निषेध करण्यासाठी येथील छ.धर्मवीर संभाजीराजे चौकात मानवी साखळी करून उत्तम पाटील युवाशक्ती व संघटनांनी आंदोलन केले.यावेळी अच्युत माने, अमित शिंदे, संभाजी थोरवत यांनी भाजप सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी मानवी साखळी करून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. तहसीलद शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.याप्रसंगी माजी नगरसेवक रवींद्र शिंदे, दिलीप पठाडे, शौकत मनेर,गोपाळ नाईक, इम्रान मकानदार, प्रा.आर.के दिवाकर यांच्यासह उत्तम पाटील युवाशक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



कन्याशाळा बचावसाठी आंदोलन करणारे पालक.

## कन्या शाळा एकत्रिकरणास पालकांचा तीव्र विरोध

मुरगूड,ता.२४(प्रतिनिधी)-

**येथील कन्या विद्या मंदीरचे शेजारील जीवन शिक्षण विद्यामंदीर या कुमार शाळेत समायोजन करण्याचा शिक्षण विभागाने घाट घातला आहे त्यास आज मुरगूडमधील पालकांनी शाळेसमोर येत तीव्र विरोध दर्शविला व प्रसंगी आंदोलन करू असा इशारा देणारे निवेदन शाळा व्यवस्थापन समितीला सादर केले.**

हे निवेदन जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती व मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे व जर हे एकत्रिकरण थांबवले नाही तर तीव्र आंदोलन करू असा इशारा यावेळी सर्व पालकांनी दिला आहे.यावेळी पालक आकाश दरेकर, समीर गोरुले, प्रदीप भोपळे, विशाल सूर्यवंशी व इतर नागरिक महिला, पुरुष, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गारगोटीत इंडिया आघाडीच्यावतीने तीव्र निदर्शने

गारगोटी,ता.२४(प्रतिनिधी)-

**जंतर-मंतरवरील आंदोलनात पोलिसांच्या लाठीमारात अनेक विद्यार्थी जखमी झाले.या लाठीमाराच्या निषेधार्थ गारगोटी येथे क्रांती चौकात इंडिया आघाडीच्यावतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. त्यानंतर शेकडो विद्यार्थ्यांसह तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.**



दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या विरोधात गारगोटी येथे निषेध मोर्चा काढण्यात आला.

निदर्शनात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी क्रांती चौकात बिद्री साखर कारखान्याचे संचालक राहुल देसाई, डॉ.सुभाष देसाई, प्रा.डॉ. अर्जुन कुंभार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजित पवार,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शामराव देसाई, माजी जि.प.सदस्य जीवन पाटील, सचिन घोरपडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, तालुका प्रमुख अविनाश शिंदे, मनसे तालुका प्रमुख राहुल पाटील, प्रा.जोतिराम सोरटे यांच्यासह कु श्रेया कुरळे, सलोनी आबिटकर, श्रेया भोई आदींची भाषणे झाली. या भाषणानंतर क्रांती ज्योती पासून मोर्चास सुरुवात झाली.

मोर्चात इंडिया आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, मनसे, आरपीआय, भुदरगड पुरोगामी आघाडी, शेतकरी संघटना या पक्षांचे कार्यकर्ते, महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. हा मोर्चा एसटी स्टॅन्ड मार्गे भुदरगड तहसीलदार कार्यालयावर आला. आंदोलकांनी मोर्चात जोरदार घोषणाबाजी केली.मोर्चाच्यावतीने विद्यार्थ्यांनी तहसीलदार डॉ.अर्चना पाटील यांना निवेदन दिले.

या मोर्चात गारगोटीचे सरपंच प्रकाश वास्कर, अनिल तळकर, पुरोगामी आघाडीचे कृष्णा भारतीय, मायकेल डिसोझा, धनश्री हतकर, कॉ.राम कळंबेकर, राजेंद्र यादव, शहाजी देसाई, मानसिंग देसाई, अंगणवाडी सेविका संघटनेच्या तालुकाध्यक्षा पुष्पा पाटील, रंजना मोरे, नीता बोटे, काँग्रेस तालुका उपाध्यक्ष संदिप देसाई, स्वप्निल साळोखे, प्राचार्य डी.एस.देसाई, महादेव मोरूस्कर, यांच्यासह शिक्षणप्रेमी उपस्थित होते.



बोरगाव येथे सौ.सुरेखा घाळी व महावीर घाळी यांच्या पक्ष प्रवेशप्रसंगी आम.शशिकला जोल्ले, माजी खास.अण्णासाहेब जोल्ले, नगरसेवक शरद जंगटे व अन्य.

## सुरेखा घाळी यांचा भाजपमध्ये प्रवेश

बोरगाव,ता.२४(प्रतिनिधी)-

**बोरगावच्या राजकीय वर्तुळात महत्त्वाची घडामोड घडली असून तत्कालीन ग्रामपंचायत अध्यक्षा सौ.सुरेखा महावीर घाळी यांनी पती डॉ.महावीर घाळी यांचेसह जोल्ले गटाच्या भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला.**

या पक्षप्रवेशामुळे शहरातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना उधाण आले असून, राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये झालेला हा प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे. या पक्षप्रवेशासाठी नगरसेवक शरदराव जंगटे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.पक्षप्रवेशावेळी बोलताना सौ. सुरेखा घाळी म्हणाल्या, आम.शशिकला जोल्ले आणि माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले यांनी निपाणी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला आहे. विकासाच्या प्रवाहासोबत राहून बोरगाव शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.आम.शशिकला जोल्ले यांनी घाळी दांपत्याचे पक्षात स्वागत करताना सांगितले की, घाळी दांपत्याच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा पक्षाला मोठा लाभ होईल. यावेळी माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले, नगरसेवक शरद जंगटे, हालशुगरचे अध्यक्ष जयकुमार पाटील, संचालक श्रीकांत बन्ने, भरत नसलापुरे, प्रकाश शिंदे, मधुकर पाटील, डॉ महावीर घाळी, राजशेखर हिरेमठ, महादेव नेजे यांच्यासह घाळी गटाचे पदाधिकारी,भाजपचे कार्यकर्ते व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बोरगावच्या विकासासाठी सदैव सोबत असणार

## -आम.जोल्ले; नगरोत्थान अनुदानातून विविध साहित्यांचे वाटप

बोरगाव,ता.२४(प्रतिनिधी)-

**बोरगाव शहराच्या विकासासाठी मी सदैव नगरपंचायतीच्या सोबत असणार आहे. विकास हाच मुद्दा ठेवून मी राजकारण करीत असल्याचे मत आम.शशिकला जोल्ले यांनी व्यक्त केले.**



विविध साहित्यांचे वाटप प्रसंगी आम.शशिकला जोल्ले शेजारी नगराध्यक्ष दिगंबर कांबळे, रुकसाना अपराज व इतर.

बोरगाव नगरपंचायत येथे मुख्यमंत्री अमृत नगरोत्थान योजनेतील लाभार्थ्यांना साहित्य वितरण प्रसंगी अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. नगरोत्थान योजनेसाठी शासनाकडून ५ कोटींचे अनुदान मंजूर झाले होते. यामध्ये ४ कोटी २५ लाखाचा आराखडा तयार करण्यात आला होता. यामध्ये २ कोटी २५ लाखाच्या अनुदानातून रस्ते गटारी व पेव्हिंग ब्लॉक, कामे हाती घेण्यात आले.तसेच एस . सी.एस.टी. कुटुंबातील ८८ लोकांना सोलार लाईट, इतर जातीच्या लोकांना ८२ सोलार लाईट, तसेच दिव्यांग योजनेतून २९ लाभार्थ्यांना इलेक्ट्रिक शिलाई मशीन,उच्च शिक्षित असलेल्या २ विद्यार्थ्यांना लॅपटॉप,व अंग विकलांगांना तीनचाकी २ गाडी एससी एसटी कुटुंबातील ३३ नागरिकांना आर.ओ.प्लांट, मंजूर झाले असून यासाठी ७८ लाखांचे अनुदान मंजूर झाले आहे.त्याचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.आम.शशिकला जोल्ले पुढे म्हणाल्या, बोरगाव शहराच्या सार्वजनिक विकासासाठी आपण २०१३ पासून प्रयत्न करीत आहोत. त्याचबरोबर नगरपंचायतीकडूनही विकास साधण्याचा प्रयत्न या ठिकाणी होत आहे. विकासात आपण कोणतेच प्रकारचे राजकारण केले नाही.कोणत्या समाजाला विकासापासून वंचित ठेवले नाही.

नगराध्यक्ष दिगंबर कांबळे म्हणाले, नगरोत्थान अनुदानासाठी राज्याचे काँग्रेस सरकारने विशेष अनुदान दिले असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमास उपनगराध्यक्षा रुकसाना अपराज, सभापती प्रदीप माळी, नगरसेवक अभयकुमार मगदूम, शरद जंगटे, शोभा हावले,माणिक कुंभार, तुळशीदास वसवाडे,अश्विनी पवार, नगरपंचायतीचे अधिकारी व पदाधिकारी शहरवासीय उपस्थित होते.

# शिरगुप्पी गावातील नागरी समस्या सोडवा

निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)-

**शिरगुप्पी गावामध्ये नागरिकांना विविध नागरी समस्यांना सामोरे जावे लागत आहे.या समस्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा ग्रामपंचायतीस टाळे ठोकण्याचा इशारा नागरिकांनी बैठकीप्रसंगी दिला.**

### अन्यथा ग्रामस्थांचा ग्रा.प.ला टाळे ठोकण्याचा इशारा

गावामध्ये पाणी योजनेच्या विहिरीत गटारीचे पाणी जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.तसेच गटारी तुंबलेल्या अवस्थेत असून रस्त्याला लागूनच कचऱ्याचे ढीग पहायला मिळत आहेत. शिरगुप्पीमध्ये स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असून येथे प्रेत जाळताना नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने ही स्मशानभूमी गावाबाहेर हलविण्याची मागणी होत आहे. ग्रामविकास अधिकारी शिवानंद तेली यांच्याकडे दोन ग्रामपंचायतीचा इन्चार्ज असून शिरगुप्पीमध्ये आठवड्यातून एकदा ते दोनदाच येत असल्याने शिरगुप्पी ग्रामस्थांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. गावातील या विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात,अशी मागणी मातंग समाज, बौद्ध समाज व चर्मकार समाजाकडून करण्यात आल्या. यावेळी दलित महासंघ बेळगाव जिल्हा अध्यक्ष भरत रोड्डे, दलित महासंघ निपाणी तालुका अध्यक्ष दत्तात्रेय माने, शंकर कांबळे, दीपक केंगारे, उत्तम काळे, कृष्णात कोकरे, गणपती गस्ते,सागर महाजन, सुनील रोड्डे, विकास गस्ते, नामदेव कांबळे यांच्यासह मातंग समाज, चर्मकार समाज, बौद्ध समाज नागरिक व महिलावर्ग उपस्थित होत्या.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**१ बीएचके आरसीसी** घर विकणे आहे. कबनूर जय शिवराय कॉर्नर जागा ८९० स्क्वे.फूट बांधकाम ८०० स्क्वे.फूट. संपर्क- ९८६०४८११८०, ९९२२१४१६४२, वेळ सकाळी १० ते १, दु. ४ ते ७.

**गाळा विकणे** आहे. बेसमेंट ४०० स्क्वे.फूट, महालक्ष्मी नगर, सी वींग, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३१८१४४८.

**४० बाय ५२** दोन मजली घर विकणे. कोल्हापूर नाका, श्री हरी टॉकीज रोड, इचलकरंजी. मो. ९९७५४३७०४३.

**रोज कपडे** वाळत घालण्याचे हॅंगिंग स्टॅण्ड, डासांची जाळी, किचन ट्रॉली, कबूतर जाळी, राहुल एंटरप्रायजेस. ७५०७७१६६६४, ७७५८९३४१६५.

**महासत्ता चौक** पॅराडाईज कॉलनीमध्ये ऑफिस व १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट उपलब्ध. आकर्षक दर व ॲमिनिटीज संपर्क-९३२५८३०५९२

**जुने व नवीन पॉवरलूम** देवू व घेवू तसेच फवारा, कांडीमशिन, डक्टींग घेवू व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

**कबनूर येथे** दिड गुंठा १६ मागाची रिकामी आरसीसी शेड ५८ बाय २६ एनए प्लॉट व १ बीएचके रहाणेस विकणे. मो. ८७८८०३३७९२.

**फेडरल बँक,** गिरनार अपार्टमेंट फ्लॅट विकणे आहे व तसेच हिरा पन्ना लस्सीसमोर (बेसमेंट गाळा) आरसीसी १२५० फुट विकणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**दुकान गाळा** विकणे आहे. ४३५ स्क्वे.फुट आरसीसी गाळा, महादेव प्लाझा, जुना चंदूर रोड, मथूर हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९५७९३३६६६२.

**महेंद्र जीतो** गुडकंडीशन, २०१९ मॉडेल, व्हाईट ग्रे कलर, विकणे आहे. मो. ७८७५६९९९३९.

**मान्सून धमाका** किचन ट्रॉली लेटेस्ट असंख्य व्हरायटीज, बेडरूम, वार्डरोल फर्निचर, जुन्या ट्रॉली रिप्लेसमेंट रिपेअरी एकाच छताखाली किचन सम्राट, इचलकरंजी. ९८२२२४३६९३.

### * इतर *

**शेअर सर्टिफिकेटची** कामे करून मिळतील. मो. ९७३०३६०८२०.

### * भविष्य विषयक *

**ज्यो. ठिगळे (गुरूजी)** कुंडली, भविष्य, विवाहास विलंब इ.साठी भेटा. पत्ता- राजराजेश्वरी नगर, नव्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. मो. ९९२३५०३४५२.

### * बोअर विषयक *

**राज बोअरवेल** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. मो. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

### * विवाह विषयक *

**मराठा वधुवर** व पालक मेळावा रविवार दि. २६ जुलै २०२६ सकाळी १० ते २. स्थळ-मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, इचलकरंजी. मो.९८५०००९०७१.

### * कर्जविषयक *

**बिझनेस होमलोन,** लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी, टेकओव्हर सर्व प्रकारचे मार्गेज, सिबील कमी असेल तरी करू. संपर्क- ८४०८८३०७५२.

**घर कर्ज, तारण** कर्ज, पत्रा लोड बेरिंग, कौलारू तारण करून मिळेल. सिबिल खराब असेल तरी सुध्दा. मो. ९५११९२६०९०.

**सॅलरी, बिझनेस,** मुद्रा, प्रोजेक्ट, आधार,पॅन, मॉर्गेज, सिबील प्रॉब्लेम सर्व कर्जाची कामे केली जातील. ९६०७८४०७०९.

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

### * नोकरी विषयक *

**Urgently Required in** Compressor Sales Engineer with experience of 2-3 years. Eligibility- Diploma holder in Mechanical/ Electrical. Fresher can also apply. At GMT ENTER-PRISES, yadrav, Ichalkaranji Contact 9922939136

**कामगार पाहिजे.** आपला बझार, केटकाळे मॉर्डन हायस्कूलजवळ, इचलकरंजी. ९४०४९५४३०२

**एअरजेट युनिटसाठी** २ वॉचमन, १ ड्रायव्हर कम ऑफिसबॉय व बॅंकिंग व इतर कामासाठी क्लार्क पाहिजे. पत्ता- प्राईड इंडिया. फोन- ९४२०१३२५७७

**सेल्स एक्झिक्युटिव्ह पाहिजेत.** हेअर ऑईलच्या विक्रीसाठी फिल्डवर्कची आवड आणि स्वत:ची टू व्हीलर आवश्यक. संपर्क- ९६३७७४५४४६

**लेडीज स्टाफ पाहिजे.** मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. ७३८५११२०३९

**सुवर्णसंधी-** नामांकित कॅफे ब्रिओसाठी तरूण हेल्पर (मदतनीस सर्व कामे) (१८+ते ३०) हवे आहेत. संपर्क-९५०३८३०४७९

**ऑफिस कामासाठी** लेडीज टेलीकॉलर पाहिजे. संपर्क- ८६००६८३६८९, इचलकरंजी.

**सिक्युरिटी गार्ड भरती-** डीकेटीई तारदाळ राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. ८ तास व कोरोची इचलकरंजी १२ तास, शिक्षण-१० वी. मो. ८१७७९८६२३३, ७९७२३५२९४८

**क्लार्क नेमणे आहे.** आमच्या पतसंस्थेत जेंटस क्लार्क जागा भरणेच्या आहेत. पात्रता- पदवीधर उत्तीर्ण, अनुभवींना प्राधान्य. तरी इच्छुकांनी स्वहस्ताक्षरातील अर्जासह पतसंस्थेमध्ये मंगळवार दि. २८/०७/२०२६ अखेर समक्ष येऊन भेटावे. पत्ता- विश्वामित्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित विक्रमनगर, शहापूर रोड, इचलकरंजी. मो. ९९२३६९४०४९

**ऑफिस कामासाठी** १२ वी शिकलेली व कॉम्प्युटर ची माहिती असलेली मुलगी पाहिजे. संपर्क- टियारा फॅशन्स, (रावका सदन) वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैनमंदिर समोर, इचलकरंजी. भेटण्याची वेळ- दुपारी ३ ते सायं.७

**नामांकीत कंपनीमध्ये** महाराष्ट्र व गोवासाठी १) सेल्स टीम लेडीज/ जेंटस्,२) मार्केटींग टीम, ३) फिटर हेल्पर टीम, ४) लोडींग/ अनलोडींग स्टाफ, ५) अकौंटंट टीम, ६) सोशल मिडीया टीम- मेगा भरती सुरू. मो. ८८०५२३३७७३.

**पाहिजेत-** १)सीएनसी/ व्हीएमसी ऑपरेटर-६, २) शिफ्ट सेटींग सुपरवायझर- ०२, ३) लाईन इन्स्पेक्टर-२, ४) लेडीज कामगार इन्स्पेक्टर-५. संपर्क- ८०८७७५७१७१.

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये हेल्पर पाहिजेत. ईएसआयसी सूविधा उपलब्ध. संपर्क- ७७२००१८४०६.

**पाहिजेत-** पेढीवर टेक्स्टाईल कामाचा

**अनुभवी दिवाणजी** पाहिजे. संपर्क- अरिहंत टेक्स्टाईल (हावले). संपर्क- ८५३०५४८७१५, ९४२२०४८७१५.

**गॅस सिलेंडर** घरपोच देण्यासाठी कामगार/ डिलीव्हरीमॅन पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन. एच.पी. गॅस गोडावून, बालाजीनगर. शहापूर. मो. ९५४५२२०१८९.

**हॉटेलमध्ये साऊथ इंडियन कुक,** पुरी चपातीसाठी आणि हेल्पर कामासाठी २ जेन्टस् किंवा लेडिज पाहिजेत. संपर्क : ८८८८०८९१२९

**अनुभवी व्हीएमसी ऑपरेटर** व सुपरवायझर पाहिजेत, आकर्षक पगार. गणेशनगर, ७ वी गल्ली, इचलकरंजी. मोबा. ९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८

**अकौंटींग कामासाठी जेंटस् पाहिजे.** संपर्क : मोबा. ७०६६८५७३४०, ९४२२०४८६९०, इचलकरंजी.

**दुमजली बंगल्यामध्ये** साफसफाईसाठी लेडीज पाहिजे. गरजुंनी संपर्क साधावा. आकर्षक व योग्य पगार देवू. व्यंकटेश कॉलनी, डेक्कन जवळ, इचलकरंजी. ९९२२४३१२३१, ८७६६६९३९६४

**वर्कशॉपमध्ये** कामासाठी हेल्पर पाहिजेत. संपर्क- शहापूर. फोन- ९६५७६८४०१४

**बिअर बारमध्ये** अर्जंट वेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क- ९८८१९५७०५५, ९५४५३९०९०८, इचलकरंजी.

**कामगार पाहिजे.** शिकाऊ/ अनुभवी सीएनसी/व्हीएमसी कामगार पाहिजेत. भेटा- इंदू सीएनसी शॉप, सुंदर बागेजवळ, थाळी हाऊस हॉटेलजवळ, मो. ९३७०१४३०३५

**पाहिजेत.** अनुभवी मॅनेजर कम क्लार्क-१ पद, पिग्मी एजंट-२ पद नेमणूक करणे आहे. मयुर नागरी पतसंस्था, धान्य ओळ, इचलकरंजी. मो. ९४२०००८१११, ९८३४५३७१२०

**सेल्समन पाहिजे.** रेडिमेड कापड दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन. हत्ती चौक, इचलकरंजी. संपर्क-९८५०८५८६०२

**प्रोसेसमध्ये** हॅन्ड चेकिंगसाठी अनुभवी चेकर पाहिजेत. संपर्क- ८६६८३४०७९४

**अर्जंट सिक्युरिटी** गार्ड भरती. इचलकरंजी, खोतवाडी, चिप्री, उदगांव, नांदणी, यड्राव, हातकणंगले, निमशिरगांव,कोंडिग्रे, आकर्षक पगार. मो. ९०४९५९३४३५, ७०२०१९७९८०.

**लेथ मशिनवर** डेव्हलपमेंट कामासाठी टर्नर पाहिजे. मो. ९६६५९९९८८७, ८७६६७७९११०., कोरोची.

**फर्निशिंग दुकानात** कामासाठी शिकावू हुशार मुलगा पाहिजे. भारत फर्निशिंग, इचलकरंजी. मो. ७६२०८१२४७२.

**नामवंत कंपनीमध्ये** सेल्ससाठी महिला व हेल्परसाठी मुले पाहिजेत. स्टेशन रोड, ओल्ड मुंबई आईस्क्रिमजवळ, इचलकरंजी. मो. ९२७०३३७९५५.

**इचलकरंजी येथील** नामांकित गारमेंट उद्योगासाठी अनुभवी अकौंटट आवश्यक. पद- अकौंटट (२ जागा), शैक्षणिक पात्रता- बी. कॉम./एम.कॉम. अकौंट क्षेत्रातील अनुभव आवश्यक.-पात्रता व अनुभवानुसार आकर्षक वेतन. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्वरीत खालील क्रमांकावर संपर्क साधावा. मो. ९९२१३८९५६७, ७०५७०५३५०५.

**फॅब्रिकेशन व हॉस्पिटल** फर्निचर तयार करणेसाठी हेल्पर, सीओ टू ऑरगन वेल्डर पाहिजेत. मो. ९०२१२०२७३१.

**पाहिजे कापड** पेढीवर कायमस्वरूपी अनुभवी अकौंटट जेन्टस् पाहिजे. कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक. गोडाऊन कामासाठी हेल्पर पाहिजे. मो. ९५६१६१९८३२, इचलकरंजी.

**पार्वती इंडस्ट्रीज,** खंजिरे इंडस्ट्रीज, तारदाळ, कोरोची करीता ८ तास, १२ तास सिक्युरिटी गार्ड भरती सुरू आहे. मो. ९८५०९४५२२६, ९५११७५९६७६.

**केतन वाईन्स** हुपरी येथे खालील पदासाठी भरती सुरू आहे. कौंटर बॉईज- ३ पदे, गोडाऊन बॉईज ३ पदे. संपर्क- ९८२२२४३२५६. संपर्क साधण्याची वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ७.००

**कामगार पाहिजे** हार व बुकेच्या दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- राहूल माने ८८८८२३१७३५, इचलकरंजी.

**जेन्टस् कामगार** पाहिजेत. मो. ९६३१३१६०३०.

**स्वप्नशिल्प कन्सलटंट** इचलकरंजी येथे तात्काळ अनुभवी अकौंटट हवा. किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. मो. ९८२२१८७१९९.

**शिटमेटल व फॅब्रिकेशन** कामासाठी अनुभवी/शिकाऊ वेल्डर, हेल्पर व शिटमेटल वर्कर पाहिजे. कोरोची. मो. ९१३०६५५३५२.

**मॅनेजर पाहिजे.** संपर्क - ओम एक्झीकेटीव्ह (लॉजींगसाठी) राधाकृष्ण चौक, एचडीएफसी बॅंकेसमोर, इचलकरंजी. ९५६१८६३१७५.

**पाहिजेत-** नवजीवन डेअरी करीता १) ड्रायव्हर/सेल्समन- ४ जागा २) मार्केटिंग ऑफीसर- २ जागा ३) टेलिकॉलर क्लार्क - १ जागा. मो. ९६५७०२८८८०.

**ऑफिस मॅनेजमेंटसाठी** महिला स्टाफ पाहिजे. ऑफिस मॅनेजमेंटसाठी हुशार व जबाबदार महिला स्टाफ पाहिजे. ऑफिस मॅनेजमेंट, बेसिक कॉम्प्युटर ऑपरेटिंग, चांगले संवाद कौशल्य. +९१९७३०३७७००१ वय मर्यादा २५ व अधिक.

**ऑफिस कामासाठी** ऑफिस बॉय पाहिजे. फोर व्हिलर येणे आवश्यक. जे. पी. संघवी, दाते मळा, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. मो. ८८८८८८८२४३

**फॅब्रीकेशन कामासाठी** वेल्डर व हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क- अमोल सुतार ९८२२४२०४९७, इचलकरंजी.

**हातकणंगले येथे** प्युअर व्हेज रेस्टॉरंटसाठी ऑल राऊंडर शेफ, चायनिज शेफ, किचन हेल्पर व पार्टटाईम कॅशियर लागणार आहेत. राहणेची व जेवणाची सोय,आकर्षक पगार, संपर्क- ८२९१५८१९९९.

**ऑफिस कामासाठी** महिला किंवा मुलगी पाहिजे. संभाषण कौशल्य आवश्यक. संपर्क- विवाह वधूवर केंद्र, वर्धमान चौक, इचलकरंजी. ८१७७८४१४७७.

**वनथर्ड कंपनीमध्ये** कामाकरीता मुले पाहिजेत. फिक्स पगार १० हजार + इन्सेन्टीव्ह, मो. ८२०८६१७०६६, ८९७५९१५११७.

**टु व्हिलर** पार्किंगसाठी कामगार पाहिजेत. डे व नाईटसाठी. मो. ८२३७७४४४४४.

**चप्पल दुकानात** अनुभवी किंवा शिकाऊ कामगार पाहिजे. पत्ता- न्यू बालाजी शू वर्ल्ड, गांधी पुतळा, पुरवठा कार्यालयासमोर, इचलकरंजी. मो. ९०७५७४२९१७, ८७८८६४०५६०.

**रंगाच्या दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- नवभारत पेन्टस्, बंगला रोड, इचलकरंजी. मो. ९८२३१८१४४८.

**श्री दत्त** ओली भेल कंपनीमध्ये प्रोडक्शनसाठी महिला लागतील. पगार ६०००, मो. ९६३७२९७७११, पत्ता- महासत्ता चौक, आमराई रोड, दरिबे मळा.

**श्री दत्त** ओली भेल कंपनीमध्ये कॉलींगसाठी महिला लागणार आहेत. पगार ६०००, मो. ९६३७२९७७११, पत्ता- महासत्ता चौक, आमराई रोड, दरिबे मळा.

**ऑटोलूममध्ये इलेक्ट्रॉनिक्स** व इलेक्ट्रीकल रिपेरींग कामासाठी अनुभवी किंवा शिकाऊ डिप्लोमा/ आयटीआय झालेले पाहिजेत. मो. ९९२२३७५५७७, ९७६६४४३३७५.

**१० वी, १२ वी** पास नापास मुले पाहिजेत. पत्ता- कागवाडे मळा, साखरपे हॉस्पिटल समोर, मो. ७२४९४९४९४४.

**त्वरीत सिक्युरिटी** गार्ड व सिक्युरिटी सुपरवायझर पाहिजेत. हातकणंगले व तारदाळ, आकर्षक पगार/ईएसआय सुविधा. मो. ८००७०६९१८०, ८०५५६१३०४०.

**स्ट्रिट लाईट** रिपेअरीसाठी अनुभवी व शिकाऊ वायरमन व हेल्पर पाहिजे. काम सकाळी ९ ते सायं. ६, पगार ९००० ते २०००० अनुभवानुसार, ईएसआयसी+पीएफ लागू. मो. ९८५०८१६६९८.

**मार्केटिंग व सुपरव्हिजनसाठी** बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी व्यक्ती पाहिजेत. कागल एमआयडीसी येथील आरसीएम प्लांटकरीता. मो. ९५७९५५३२१६.

**नामांकित पिझ्झा** आऊटलेटमध्ये कामासाठी जेंन्टस्/लेडीज पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९ ते सायं. ६ व सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत. मो. ८५३०३९५९६०, इचलकरंजी.

**फोर व्हिलर** हुशार व अनुभवी व शिकाऊ मॅकॅनिकल पाहिजे. मो. ९८२२४३३४२६.

**व्हीएमसी/लेथ** मशिन ऑपरेटर पाहिजेत. पार्टटाईम,फुल टाईम, अनुभवी/शिकाऊ अपेक्षेनुसार पगार. मो. ९७६५४०९३९७.

**स्टेशनरी दुकानात** टु व्हिलर/फोर व्हिलर चालविणारा कामगार पाहिजे. मो. ९७६२६६६६१९, इचलकरंजी.

**कॉम्प्युटर व झेरॉक्स** करीता लेडीज ऑपरेटर पाहिजे. महालक्ष्मी नेट कॅफे, ए.एस.सी. कॉलेज समोर, इचलकरंजी. मो. ८८५५८९२२२३.

**A Reputed** Textile House needs MBA/BBA, Fashion Technology women candidates for Merchandiser post Sent CV to whatsapp no. 9923142020.

**सिक्युरीटी गार्ड** पाहिजेत. डे शिफ्टसाठी सिक्युरिटी गार्ड पाहिजे- २ जागा. मो. ९३२६००६५४३.

**पिझ्झा आऊटलेट** किचनमध्ये अनुभवी शेफ हवे आहेत. मो. ८४२१४०८१९७.

**नामवंत कंपनीमध्ये** पाहिजेत. १० वी/१२ वी, आयटीआय/डिप्लोमा व पदवीधर मुले/मुली. सॅलरी १३ ते २० हजार पर्यंत. इचलकरंजी. ८९५६१६९६९६, ९१७५९६७७६७.

### * भाड्याने देणे/घेणे *

**१ बीएचके व** २ बीएचके फ्लॅट सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. ए-१ कोन्नूर पार्क, कबनूर. संपर्क- ९०२८५०३०४८. ७७२१९७०१०२.

**भाडेपट्टी/ लीजसाठी** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी खंजिरे मळा, इचलकरंजी फर्निश्ड बेसमेंट, ऑफिस व गोदामसहीत ३००० स्क्रे. फुट ग्राऊंड फ्लोअर ३००० स्क्रे फुट (शोरूम, बॅंक, ऑफिस, हॉस्पिटल, गोदाम इ.) पहिला मजला- ३००० चौ. फुट (ट्युशन कोचिंग प्रशिक्षण केंद्र), ४ प्रशस्त हॉल, पार्किंग सूविधा, त्वरीत ताबा. मो. ८८८८०१२३४६

**भाड्याने देणे आहे.** वन बीएचके सर्व सुविधानुसार एएससी कॉलेजपासून पाच मिनिटाच्या अंतरावर. मो. ०९२२६३६३३२४

**गाळा भाड्याने देणे.** जनता बॅंकेजवळ, डॉ. बरगाले शेजारी, हॉटेल जनसेवा वरील भाग (पहिला मजला) इचलकरंजी. ९८२३०८३०८१

**भाड्याने देणे आहे.** १ बीएचके आरसीसी वर्धमान चौक, आनंदी गॅस गोडाऊनजवळ, इचलकरंजी. ८६२४०३८४३२, ८६२४०३८४३१

**२०००० स्क्रे. फूटाचे शेड** भाड्याने पाहिजे. इंडस्ट्रियल इस्टेट एरियातील प्राधान्य. संपर्क- ८७९३८३३६८९

**ग्राऊंड फ्लोअर** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. फक्त शाकाहारींसाठी भाडे १२ हजार (एजंट क्षमस्व) जमदाडे मळा, नोबल हॉस्पिटल समोर, इचलकरंजी. संपर्क- ८८३०७४१०४३

**१३०० स्क्रे. फूटाचा** हॉल भाड्याने देणे. आरसीसी सर्व सोयीनियुक्त कामाक्षी प्लाझा, मन लॉजशेजारी, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. फोन- ९४२०१३२५७७, ९९२१२१४३२६

**मुलांसाठी कॉट बेसिसवर** प्रशस्त, हवेशीर व सर्व सोयिनीयुक्त रूम्स मिळतील. महासत्ता चौक, हनुमान मंदीर मागे, इचलकरंजी. संपर्क फोन-७०२१९९४९५०, ७०२१७९२४९२ (श्री. हिमांशु मिरगे)

**भाड्याने देणे** आहे. २ बीएचके सर्व सोईनीयुक्त, हत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९४२२०७६४६६.

**स्टेशन रोड, कॅबसन** हॉटेल शेजारी, १५ बाय १५ रेडी गाळा, खाद्य विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त, भाड्याने देणे आहे. मे. ९०३९६९३९६९.

**मेन रोड,हिंदुस्थान** हार्डवेअर समोर ३०० फुट गाळा फर्निचरयुक्त खाद्य विक्री, कापड विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त. भाड्याने देणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**चालू स्थितीतील** फुड कॅफे चालविणेस देणे आहे. पत्ता- जनता बॅंक, तारा हॉटेलसमोर, इचलकरंजी. मो. ८७८८४१६४७९.

**गाळा भाड्याने** देणे. जिव्हाजी कार्यालयासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. मो. ९७३०४०५५३३.

**प्युअर व्हेज** फॅमिलीसाठी २ बीएचके व १ बीएचके सेमी फर्निश्ड फ्लॅट सर्व सोईनीयुक्त तीन बत्ती चार रस्ता येथे भाड्याने देणे. मो. ९२६००६१००८.

**नारायण पेठ,** अग्रवाल ट्रेडर्स माडीवर २ बीएचके सर्व सोईनीयुक्त ऑफिससाठी किंवा राहणेसाठी भाड्याने देणे. मो. ८४०७९६३४५६.

**दुकानगाळा भाड्याने** देणे, बंगला रोड, श्रध्दा अकॅडमीजवळ, इचलकरंजी. मो. ८८८८९९७६७१, ९०२८५१४५११.

**रूम भाड्याने** देणे आहे. सर्व सोईनीयुक्त, राजाराम स्टेडियमसमोर, इचलकरंजी. मो. ८४२१२२६२७७.

**दुकानगाळा भाड्याने** देणेचा आहे. बेसमेंटमधील १० बाय १६ चा गाळा अगदी रोडटच डॉ. साखरपे रोड, डॉ. पठाण जवळ, थोरात मोबाईल शेजारी भाडेने देणेचा आहे. मो. ९९२१२९९३२३.

**सर्व सोईनीयुक्त** २ खोल्या भाड्याने देणे आहे. सुपर बझारमागे, लोकमान्य नगर, कोरोची. मो. ९५६१११३८५३, ९४०५८२३८५३.

**घर भाड्याने** देणे आहे. ३ बीएचके फुल फर्निश्ड, २४ तास पाणी, सर्व सोईनीयुक्त, पार्किंगसह स्टारनगर, यड्राव फाटा. मो. ९४२३८२५८१९.

**२ मजली** घर भाड्याने देणे आहे. सर्व सोईनीयुक्त. पत्ता- मोठे तळे, इचलकरंजी. मो. ९७६३१७७२९३.

**गहाणवट घर** त्वरीत पाहिजे. स्वतंत्र घर किंवा स्वतंत्र बंगलो, मध्यवस्तीत, बजेट ४ ते ५ लाख आहे. मो. ९८३४२३०७३२.

**सर्व सोईनी** समृध्द, स्वतंत्र बंगल्यामधील १ ला मजल्यावरील १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. पत्ता कोरोची, फोन- ९९७५५७५६६५, ९८६०६१५३१३.

### * इतर *

**वॉशिंग मशिन, फ्रीज** मायक्रोवेव, आटाचक्की, वॉटर फिल्टर, गॅस गिझर, इलेक्ट्रीक गिझर तसेच सर्व गृहोपयोगी उपकरणांच्या खात्रीशीर दुरूस्तीकरीता घरपोच सेवा. ९२८४५३९१६८.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**


# आर्यचाणक्य पतसंस्थेतर्फे आज आषाढी निमित्त रंगी रंगला श्रीरंग

■ इचलकरंजी, ता.२४ -

**आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलमय भाव भक्ती गीते व अभंगवाणी यांची सुरेल मैफिल कार्यक्रम रंगी रंगला श्रीरंग या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार २५ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता दाते मळा येथील लायन्स क्लबच्या प्रांगणात करण्यात आले आहे.**

अविनाश सूर्यवंशी हे या कार्यक्रमाचे निर्माते असून गायक मुकुंद चौगुले(इचलकरंजी) हे प्रस्तुतकर्ते आहेत. अत्याधुनिक ध्वनी व्यवस्था,नेत्रदिपक प्रकाश योजना, नेपथ्य अशा वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या कार्यक्रमातून विठ्ठल-रुक्मिणीची विविध भाव गीते, भक्तिगीते व अभंग वाणी अशा निवडक लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणातून आषाढी एकादशीची एक भक्तिमय संध्याकाळ रसिक श्रोत्यांसाठी अविस्मरणीय ठरणार आहे.या कार्यक्रमासाठी मोफत प्रवेशिका असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहील. प्रवेशिकेसाठी श्री आर्य चाणक्य पतसंस्थेशी संपर्क साधावा व कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन निर्माते अविनाश सूर्यवंशी यांनी केले आहे.



# काळम्मावाडी धरणात ५० टक्के पाणीसाठा

■ राधानगरी,ता. २४ (प्रतिनिधी)-

**काळम्मावाडी येथील राजर्षी शाहू जलाशयात चालूवर्षी ४९.२२ टक्के पाणीसाठा झाला असून धरण निम्म्यावरती भरलेले आहे .**

शुक्रवारी धरणाच्या जलाशयाची पाणी पातळी ६३३.४९ मीटर असून पाणी साठा ३५३.९४२ द.ल.घ.मी.१२.५० टीएमसी म्हणजेच (४९.२२ टक्के) इतका पाणीसाठा झाला आहे.

शुक्रवारी दिवसभर धरणक्षेत्रात ४८ मिली मीटर पाऊस झाला असून आजपर्यंत १७२० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.आज स्थितीला धरण परिक्षेत्रात पावसाने थोडी उघडीप दिली असली तरी पावसाचे जवळपास दोन महिने बाकी आहेत. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर पुढील काही दिवसात धरण पूर्ण क्षमतेने भरेल.



# शिरदवाड बंदला चांगला प्रतिसाद

■ शिरदवाड, २४(वार्ताहर)-

**नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्ली येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ शिरदवाड येथे बंद पाळण्यात आला. बंदला चांगला प्रतिसाद मिळाला.**

दिल्ली येथे झालेल्या विद्यार्थ्यांच्यावर लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ तसेच नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी,पुकारण्यात आलेल्या बंदला शिरदवाडमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सकाळी गावातून बंदचे आवाहन करत फेरी काढण्यात आली.

या आवाहनास शिरदवाड मधील व्यापाऱ्यानी चांगला प्रतिसाद दिला.बंद शांततेत पाळण्यात आला. यावेळी दिलीप शिंगे, अतुल कांबळे,रवी कांबळे, विनायक कांबळे, प्रकाश कांबळे, सुरज माळगे, प्रमोद कांबळे,सागर कांबळे, आकाश कांबळे,विशाल कांबळे, अर्जुन कांबळे सुयश कांबळे सुभाष कांबळे वैभव कांबळे महेंद्र कांबळे यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# नृसिंहवाडी दत्तधाममध्ये आजपासून श्रीगुरुपुजन सोहळा



■ बुबनाळ ता.२४ (वार्ताहर)-

**नृसिंहवाडी येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दत्तधाममध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त शनिवार, ता.२५ ते २९ जुलैअखेर श्रीगुरुपुजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.**

श्रीगुरुपुजन म्हणजे श्री स्वामी समर्थ महाराजांना आपले गुरु करुन घेणे होय.भारतीय संस्कृतीत गुरुना नेहमीच पुजनीय स्थान आहे.अध्यात्मात गुरु हा भंगवतापेक्षाही श्रेष्ठ मानला गेला आहे. यामुळे अखिल भारतीय श्री स्वामी सेवा मार्गातील सेवेकऱ्यांसाठी हा दिवस अतिशय महत्वाचा असतो. यादिवशी सर्व स्वामी सेवक महाराजांच्या मुर्तीवर वैयक्तिक अभिषेक करुन श्री स्वामींना गुरुपद स्विकारण्याची विनंती करतात. अशी विनंती करुन दर्शन घेण्यासाठी नृसिंहवाडी येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, दत्तधाममध्ये भाविक, सेवेकऱ्यांची गुरुपौर्णिमेदिवशी अलोट गर्दी होते. ही गर्दी गुरुपौर्णिमा या एकाच दिवशी होऊ नये म्हणून अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर (नाशिक)चे पीठाधीश प.पू.गुरुमाऊली यांच्या कृपाशिर्वादाने चंद्रकांतदादा यांच्या मार्गदर्शनाखाली आजपासून ते गुरुपौर्णिमेपर्यंत दररोज सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत श्री गुरुपुजन सोहळा आयोजिला आहे.

सर्व श्री स्वामी सेवेकरी, भाविकांनी गुरु पौर्णिमेदिवशी गर्दी न करता आजपासून सुरु होणाऱ्या या श्री गुरुपुजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नृसिंहवाडी येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दत्तधामतर्फे करण्यात आले आहे.

## दक्षिण चीन समुद्रात पुन्हा तणाव

**मनिला,ता.२४-**

दक्षिण चीन समुद्रात चीनच्या तटरक्षक दलाच्या जहाजांनी त्यांच्या फिलिपिन्स मत्स्य विभागाच्या दोन नौकांवर उच्च दाबाने पाण्याचे फवारे मारले. या आठवड्यात वादग्रस्त सागरी क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये झालेली ही तिसरी मोठी चकमक आहे.ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा मनिला येथे आशियाई आणि पाश्चिमात्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक सुरू आहे. या बैठकीत चीनच्या सागरी हालचालींबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.


## जाहीर इशारावजा नोटीस

१) मिळकतीचे वर्णन - मौजे चंदूर येथील क.ग.नं. ३७९ यापैकी हे ०.००.३९आर याचे ३९.०० चौ.मी ची बंदिस्त खुली मिळकत यासी पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस-रस्ता, दक्षिणेस-संजय स्वामी यांची मिळकत, उत्तरेस-रामय्या स्वामी यांची मिळकत येणेप्रमाणे चतुः सिमेतील दगड, माती, जल, तरू, पाषाण, झाडझुड वगैरे तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरी हक्कासह ची खुली प्लॉट मिळकत.

वर नमुद केलेली मिळकत सौ. सारिका शंकरैय्या पुजेरी, रा. चंदूर यांची मिळकत असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल श्री. शितल रमाकांत बिडकर, रा. इचलकरंजी यांना नोटराईज्ड खरेदीपूर्व करारपत्राने देवून भरीव अशी संचकार दाखल रक्कम स्विकारली आहे. परंतू जादा रक्कमेची लालसा उत्पन्न झालेमुळे सदर मिळकत त्रयस्थास विक्री करणार असल्याचे आमचे अशिलांना समजले आहे. तरी सौ. सारिका शंकरेंय्या पुजेरी, रा. चंदूर हिच्याशी कोणीही कसलाही मिळकती संदर्भात व्यवहार करू नये केल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून दिली इशारा वजा नोटीस.

ता.२४/०७/२०२६.

**ॲड.ओंकार मोहन माने**
नवीन वसाहत, शिरदवाड.
ता.शिरोळ, जि. कोल्हापूर
मो. ८५३०३९५९६०

# अल्पवयीन मुलास गाडी चालविण्यास दिली;पालकास २५ हजाराचा दंड

■ निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)–

**निपाणी शहरात अल्पवयीन मुलास गाडी चालविण्यास दिल्याबद्दल पालकांना २५००० रुपयांचा दंड निपाणी न्यायालयाने पालक अनिकेत भरत पवार (रा.लिंगनूर,ता. कागल) यांना ठोठावला.**

शहरात गेल्या महिन्यात एआय कॅमेरे बसवले आहेत. अल्पवयीन मुलास गाडी चालवण्यास मनाई आहे. तरी देखील अनेक पालक मुलांना गाडी चालवण्यास देत आहेत.त्यामुळे पालकांना दंड भरावा लागत आहे.बेळगाव जिल्हा पोलिसांकडून ही कारवाई केली जात आहे. निपाणी शहरात अनेक ठिकाणी एआय कॅमेरे बसविण्यात आले आहेत. याची वाहनधारकांनी गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करावा, वाहनाशी संबंधित कागदपत्रे सोबत ठेवावीत. वाहनधारकांनी वाहन चालवताना नियमांचे उल्लंघन करू नये याकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# निपाणीत पावसाची उघडीप; जत्राट बंधारा वाहतुकीस खुला

■ निपाणी,ता.२४(प्रतिनिधी)–

**गेल्या२ दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्यामुळे वेदगंगा व दूधगंगा नद्यांच्या पाणीपातळीत घट झाली आहे.त्यामुळे वेदगंगा नदीवरील जत्राट बंधारा शुक्रवारी वाहतुकीस खुला झाला आहे. पावसाची अशीच उघडीप मिळाल्यास इतर बंधारेही वाहतुकीस खुले होण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, संततधार पावसामुळे तालुक्यांतील एकूण ६ बंधारे पाण्याखाली गेले होते. त्यामुळे प्रशासनाने सदर बंधारे वाहतुकीस बंद केले होते.त्यापैकी आज जत्राट बंधारा वाहतुकीस खुला झाल्याने या बंधाऱ्यावरून वाहतूक सुरू झाली आहे.



**वेदगंगा नदीची पाणीपातळी घटल्याने जत्राट बंधारा वाहतुकीस खुला झाला.**

## मिठाचा ट्रक उलटला

**रत्नागिरी,ता.२४**–मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कोदवली (राजापूर) येथील महालक्ष्मी मंदिराजवळील धोकादायक वळणावर मिठाने भरलेला ट्रक उलटला. अपघातात चालक किरकोळ जखमी झाला असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## वसंत कारंडे यांचे निधन

■ नांदणी,ता.२४( वार्ताहर)–



**नांदणी (ता, शिरोळ) येथील** विरशैव लिंगायत माळी समाजाचे माजी अध्यक्ष **वसंत मारुती कारंडे (वय ६८) यांचे शुक्रवारी पहाटे आकस्मिक निधन झाले.**

ते सामाजिक व राजकीय क्षेत्रात कायम अग्रेसर होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## जाहीर नोटीस

**का कागल** येथील गट नं. ३७७ /ब/प्लॉट नं./११ चे क्षेत्र ८४१ चौरस फुट. यासी चतु:सिमा – **पुर्वेस** ''प्लॉट नं. १२, **पश्चिमेस** – प्लॉट नं. १०, **दक्षिणेस**– याच गटातील उर्वरीत मिळकत,**उत्तरेस**– रस्ता, सदर मिळकत ही श्री प्रदिप रामराव आतवाडकर रा.कागल यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी तोंडी करार केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.२४/०७/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

**इचलकरंजी शहर येथील री.स.नंबर.२६ पैकी प्लॉट नंबर. २० चे क्षेत्र ५०५.३० चौरस मिटर ची जागा मिळकत** यासी चतुः सिमा **पुर्वेस** – री स नंबर २४ ची मिळकत. **पश्चिमेस**–९ मिटर रस्ता. **दक्षिणेस**–ओपन स्पेस. **उत्तरेस** – प्लॉट नंबर ११ ची मिळकत. सदर ची मिळकत **श्री.अजित रामचंद्र पोवार.** रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे.सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क,दावा,पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ५ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही.

ता.२४/०७/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नंबर.६३५** पैकी **प्लॉट नंबर ३ चे क्षेत्र ९२.९३ चौरस मिटर** ची जागा व या वरील घर मिळकत यासी चतु:सिमा– **पुर्वेस**– प्लॉट नंबर १०.**पश्चिमेस** – प्लॉट नंबर १२. **दक्षिणेस**– २० फुट रस्ता. **उत्तरे–श्री मिरजे यांची मिळकत.** सदर ची मिळकत **श्री.खंडोबा विठ्ठल चव्हाण. रा.तारदाळ** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे.सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता.२४/०७/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

मौजे रूई येथील गट नंबर ७७५ पैकी बिगरशेती क्षेत्र हे. ०.०६.०० आर ची खुली जागा मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस– रेडेकर यांची मिळकत,पश्चिमेस– तंगोजी यांची मिळकत. दक्षिणेस–१० फुट रस्ता, उत्तरेस–२० फुट रस्ता सदरची मिळकत ही संजय दत्तात्रय केंदोळे रा.इचलकरंजी यांचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकतीची आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून त्यांना संचकार पावती करून दिलेली आहे सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क,दावा,पोटगी, बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही.

ता. २४/०७/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
**३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक,टाकवडे वेस, इचलकरंजी,ता.हातकणंगले जि. कोल्हापूर**
**मो.नं. ९८८१०१४७२५**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नं. ३५६** पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे प्लॉट नं. १० व ११ चे क्षेत्र २१६०९ चौरस फुटची खुली जागा मिळकत, यासी चतु:सिमा **पुर्वेस** – २५ फुट रस्ता, पश्चिमेस–याच गटातील शिल्लक मिळकत, **दक्षिणेस**–गट नं ३५५ ची मिळकत, **उत्तरेस**– प्लॉट नं ९, सदरची मिळकत ही **श्रवण अरुण पाटील,शुभम मनिष मानधने व अमर रंगराव माने रा.इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी संतोष दत्तात्रय घुणके व विपुल विजय चौगुले यांना करारपत्र करून दिले आहे व त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.२४/०७/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

**सर्व लोकांना कळविणेत येते की,**

**मौजे तारदाळ** येथील गट नं.६३५ मधील गुंठेवारी बिगरशेती भुखंड क्रं. १ बी–६ क्षेत्र चौ.मी.७१.०९ ची खुली जागा सर्व. यासी चतु:सिमा–**पुर्वेस**– भुखंड क्रं.१बी–५ची मिळकत, **पश्चिमेस**– श्री.गैबान यांची मिळकत,**दक्षिणेस**–हजारे यांची मिळकत, **उत्तरेस** – २० फुट रुंदीचा रस्ता. याप्रमाणे चतु:सिमेतील खुली जागा मिळकत तदंगभुत वस्तुसह सर्व.

येणेप्रमाणे वर वर्णन बिगरशेती खुली जागा श्री. सोहेल अशपाक गोलंदाज रा.शहापुर यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत विश्वमित्र नागरी सहकारी पत संस्था मर्या. इचलकरंजी यांचे कर्ज बोजे शिवाय निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून आमचे मित्राला खरेदीपत्र पुरे करून देणेचे अटीवर लेखी संचकारपत्राने संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सबब वरील मिळकती संदर्भात कोणाचा, कसलाही हक्कसंबंध, करार, तारण, गहाण, तसेच वित्तीय संस्था कर्ज बोजा, दावा, पोटगी, बक्षिस, कुळहक्क वगैरे असलेस नोटीस प्रसिद्धी पासून सात (७) दिवसाचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह खात्री पटवुन द्यावी.तसे मुदतीत झाले नाही तर ठरलेप्रमाणे आमचे मित्र खरेदीपत्र पुरे करुन घेतील.नंतर तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस असे सही ता.२४/०७/२०२६ इसवी.

**श्री.एम.आय.मुल्ला**
**मुद्रांक विक्रेता, शांतीनगर, इचलकरंजी, मो. ९९२२२४२१२३**

## जाहीर नोटीस

**शहर इचलकरंजी** येथील **रि. स. नंबर २५०/२/पै/१५ प्लॉट नं. १५ चे क्षेत्र १९० चौरस मीटरची मिळकत.**यासी चतु: सिमा–**पुर्वेस**–नारायण कोकरे यांची मिळकत, **पश्चिमेस** – रस्ता,**दक्षिणेस**–कांबळे यांची मिळकत,**उत्तरेस**– शेरखाने यांची मिळकत,सदरची मिळकत ही **मज्जीद बाबालाल बागवान रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता.२४/०७/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

१) ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील **गट नं. ३०२,** याचे क्षेत्र हे . १.७२ आर, पो. ख क्षेत्र हे . ० ०६ आर,आकार रू. ९.०६ पैसे यापैकी क्षेत्र हे ०–१० आर ची शेतजमिन मिळकत यांसी चतु:सिमा **पुर्वेस** :– रस्ता, **पश्चिमेस** :– बजरंग निर्मळ यांची मिळकत, **दक्षिणेस**:– बजरंग निर्मळ यांची मिळकत व **उत्तरेस** :– **विष्णू निर्मळ** यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील पिक येणारी शेत मिळकत.२) वरील मिळकत ही ''श्री बजरंग बापू निर्मळ यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांनी वरील मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवुन करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे . ३) सबब, सदरील मिळकतीवर कौशल्याबाई आ.नाईक निंबाळकर ना. सह. पतसंस्था मर्या.यड्राव या संस्थेच्या कर्जबोजा व्यतरीक्त अन्य कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारण गहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क,कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्यावरती कागदपत्रासह लेखी कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही.

ता.२४/०७/२०२६

**ॲड.पंकज आण्णासो पाटील**
**श्री दत्त अपार्टमेंट, गाळा नं.१, सांगली नाका, इचलकरंजी**
**मो.नं. ९०२१२३७६८७**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नंबर ७५९/१** पैकी प्लॉट नंबर ८० व ८१ चे एकत्रीत क्षेत्र १८५–८७ चौ. मिटर ची मिळकत यासी चतु:सिमा – **पुर्वेस** –२० फुट रस्ता. **पश्चिमेस** –प्लॉट नंबर ९४ व ९५, **दक्षिणेस** –प्लॉट नंबर ८२, **उत्तरेस** – प्लॉट नंबर ७९. सदर मिळकत **श्री. अमित महादेव मधाळे तर्फे वटमुखत्यार सौ. माधुरी गणेश बागडे रा.भुम** यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्रआमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी,इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १७/०७/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन – जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नं. ३०० याचे क्षेत्र हे. १=२१.०० आर, पोटखराब क्षेत्र हे ०=१२.०० आर, आकार रु. २.१० पै., यापैकी बिगरशेती प्लॉट क्र.२० चे क्षेत्र १०९.२० चौ. मी. (म्हणजे ११७५ चौ. फुट) ची खुली मिळकत. यासी चतुःसिमा– पूर्वेस– प्लॉट नं. १९ ची मिळकत, पश्चिमेस– प्लॉट नं. २१ ची मिळकत, दक्षिणेस–१५ फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस–प्लॉट नं. १३ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील खुली मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह, ईझमेंटरी हक्कांसह सर्व.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत श्री. जिवंधर बापुसो मुरचिट्टे यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत विक्री योग्य असल्याचा आणि ती निर्वेध व निष्कर्जी असल्याचा तसेच त्यावर कोणताही करार, नसुन तिच्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद प्रलंबित नसल्याचा आणि मिळकत जप्ती/मनाई यापासुन मुक्त असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांनी दिला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी ता.२४/०७/२०२६.

**ॲड.राहुल विलास जाधव**
**रा.२०/९९५/१, स्वामी मळा, साईनाथ नगर, गल्ली नं. १ इचलकरंजी,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर मो.९१५६७७८४४५**

## जाहीर नोटीस

**सर्व लोकांना कळविणेत येते की,**

**मिळकतीचे वर्णन – मौजे यड्राव**, ता. शिरोळ येथील **क.ग.नं.१७८** याचे क्षेत्र १ हे. ५१ आर पो.ख.० हे. ०६ आर आकार ९ रु. ७५ पै. यापैकी **क्षेत्र ० हे. ५१ आर सह पो.ख. ० हे. ०२ आर, आकार ० रु. ५१ पै.** ची शेतजमीन यासी चतु:सिमा पुर्वेस – श्री. चवगोंडा पाटील यांची शेतजमीन, पश्चिमेस – वैशाली पाटील व सुमित पाटील यांची शेतजमीन, दक्षिणेस– १२ फुट सामाईक रस्ता, उत्तरेस– राजश्री पाटील यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत **सुमित महावीर पाटील व वैशाली विजय पाटील रा.यड्राव** यांचे मालकी वहिवाटीची असून ती **सौ. राजश्री सचिन पाटील व श्री.सचिन दिलीप पाटील** यांनी करारपत्राने घेवू केलेली आहे. सदर करारपत्राआधारे प्राप्त झाले अधिकारावरुन **सौ. राजश्री सचिन पाटील व श्री. सचिन दिलीप पाटील, रा.जांभळी** यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा **सौ.राजश्री सचिन पाटील व श्री. सचिन दिलीप पाटील** यांनी दिलेला आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे.

सबब वर नमुद मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क, करार, दावा, कर्ज, लिज, दान, जप्ती आदेश, ॲक्वीझिशन व रिझर्व्हेशन इ. कसलाही हक्कसंबंध असलेस तो त्यांनी ७ (सात) दिवसात खाली नोटीस प्रसिध्द करणार यांना लेखी स्वरुपात कागदपत्रासहीत कळवावा. मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस मिळकत निर्वेध समजून व्यवहार पुरा केला जाईल म्हणून प्रसिध्द केली नोटीस.

ता.२१/०७/२०२६.

**ॲड.धीरज पृथ्वीराज पारख**
**१०/५, पवन रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी**
**फोन नं.९९२२०९९५६७**

## जाहीर नोटीस

**मौजे शिरढोण** येथील गट नं. १६३७/२ पैकी क्षेत्र हे ०.१०.०० आर यासी चतुः सिमा–**पुर्वेस**– सलिम् मुजावर यांची मिळकत, **पश्चिमेस** – रस्ता, **दक्षिणेस**– लिहुन देणार यांची शिल्लक मिळकत, **उत्तरेस** – लिहुन देणार यांची शिल्लक मिळकत. सदर मिळकत ही अश्विनी अशोक घारगे रा.कुरूंदवाड यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी करारपत्र केलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.२४/०७/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन – जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नं. ३०० याचे क्षेत्र हे. १=२१.०० आर, पोटखराब क्षेत्र हे ०=१२.०० आर, आकार रू. २.१० पै., यापैकी बिगरशेती प्लॉट क्र. १९ चे क्षेत्र १०९.२० चौ. मी. (म्हणजे ११७५ चौ. फुट) ची खुली मिळकत.यासी चतुःसिमा– पूर्वेस– प्लॉट नं. १८ ची मिळकत, पश्चिमेस– प्लॉट नं. २० ची मिळकत, दक्षिणेस–१५ फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस–प्लॉट नं. १४ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह, ईझमेंटरी हक्कांसह सर्व.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत श्री. जिवंधर बापुसो मुरचिट्टे यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत विक्री योग्य असल्याचा आणि ती निर्वेध व निष्कर्जी असल्याचा तसेच त्यावर कोणताही करार, नसुन तिच्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद प्रलंबित नसल्याचा आणि मिळकत जप्ती/मनाई यापासून मुक्त असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांनी दिला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी ता. २४/०७/२०२६.

**ॲड.राहुल विलास जाधव**
**रा.२०/९९५/१, स्वामी मळा, साईनाथ नगर, गल्ली नं. १ इचलकरंजी,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर मो.९१५६७७८४४५**

## जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर

आमचे अशिल **श्री. संदीप चंद्रकांत शहा** रा. गुजरी पेठ, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी दिले माहितीवरुन दाखविले कागदपत्राआधारे, त्यांचेकरीता दिलीप दत्तात्रय पाटील, लक्ष्मी दिलीप पाटील, राजकुमार जंबु चौगुले, अरुणा राजकुमार चौगुले यांचे मिळकती संदर्भात ॲड. शिवकुमार सु. लकडे यांनी ता. १६/०७/२०२६ इ. रोजीचे दै. महासत्ता पान नं.७ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर देणेत येते की,

१) **मिळकतीचे वर्णन –**

जिल्हा व तुकडी कोल्हापूर तालुका शिरोळ पैकी मे. दुय्यम निबंधकसो श्रेणी – १, शिरोळ, यांचे अधिकार कक्षेतील **मौजे यड्राव** येथील **क.ग.नं.४९६/१/२२ चे** संपुर्ण क्षेत्र ११७०.१५ चौ.फुटाची बिगरशेती खुली मिळकत जागा यांसी चतुः सिमा पुर्वेस–३० फुट रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नंबर २९, दक्षिणेस – प्लॉट नं. २१, उत्तरेस–प्लॉट नं. २३ येणेप्रमाणे वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीस यापुढे प्रस्तुत हरकतवजा उत्तरी नोटीसीचे कामी ''**सदर मिळकत**'' असे संबोधले आहे.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात मा. सहाय्यक संचालक नगररचना विभाग, कोल्हापूर यांनी रेखांकन मंजूर केले असून सदर रेखांकन नकाशामध्ये १८ मीटर आर.पी रोडच्या पुर्वेस आमचे अशिलांचे व अन्य सहहिस्सेदार श्री. चंद्रकांत चंपालाल गांधी यांचे मालकीची वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत व त्यापलीकडे क. ग.नं. ४९६/१ मधील बफर झोनची मिळकत दर्शविणेत आलेली आहे. अशी वस्तुस्थिती असताना दिलीप दत्तात्रय पाटील, लक्ष्मी दिलीप पाटील, राजकुमार जंबु चौगुले, अरुणा राजकुमार चौगुले यांनी मा. तहसिलदारसो, शिरोळ यांचेकडून क्रं. ४२/क/एसआर/०२/२०२५ ता. १८/०३/ २०२५ इ. रोजीचे आदेशाने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब, क व ड अन्वये एकूण ४००० चौ.मी. क्षेत्राची मिळकत रहिवाशी कारणाकरीता बिगरशेती करून घेतली असलेचे भासवून ग्राममहसुल अधिकारीसो, शिरोळ यांचे सही शिक्क्यानिशी नकाशा तयार करून सदर नकाशाचा आधार घेवून सदर मिळकतीमध्ये अनाधिकाराने पाडलेल्या प्लॉट्सची निरनिराळ्या व्यक्तींना विक्री करणेचा प्रयत्न चालविलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून उपरोक्त संदर्भीय नोटीसीची रचना करणेत आली असलेने त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. वस्तुतः **मा. सहाय्यक संचालक**, नगररचना विभाग, कोल्हापूर यांनी मंजूर केलेल्या रेखांकन नकाशामध्ये १८ मीटर रुंदीच्या आर. पी. रोडच्या पुर्वेस आमचे अशिलांचे मालकीची क.ग.नं. ४९६/२ ची शिल्लक मिळकत असून त्यापलीकडे दिलीप दत्तात्रय पाटील व लक्ष्मी दिलीप पाटील यांचे मालकीची मिळकत असतानाही त्यांनी चुकीची वस्तुस्थिती नमुद करून आमचे अशिलांचे मालकीची क. ग.नं. ४९६/२ ची मिळकत क.ग.नं. ४९६/१ या मिळकतीचा भाग असलेचे भासवून प्रस्तावित खरेदीदारांची फसवणुक करणेचा प्रयत्न चालविलेला आहे. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णन साफ चुकीचे असुन सदर मिळकतीचे चतुः सिमे बाबत आमचे अशिल व दिलीप दत्तात्रय पाटील, लक्ष्मी दिलीप पाटील, राजकुमार जंबु चौगुले, अरुणा राजकुमार चौगुले यांचे दरम्यान वाद असुन त्याची खातरजमा केले खेरीज अलका मुकूंद खोचरे व राहुल रघुनाथ पाटील यांनी अथवा ॲड. शिवकुमार सु. लकडे यांचे अज्ञात अशिलांनी कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री अथवा तत्सम स्वरुपाचा व्यवहार करू नये. याही ऊपर सदर मिळकती संदर्भात कोणी काही व्यवहार केलेस अथवा केला असलेस त्यांना सदर मिळकतीची निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी मालकी प्राप्त होणार नाही. उलटपक्षी त्यांना निरनिराळ्या वादांना तोंड द्यावे लागेल. याची संबंधितांनी प्रकर्षाने नोंद घ्यावी. म्हणून दिले जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर.

सही.ता.२३/०७/२०२६.

**ॲड.पवनकुमार अ.उपाध्ये,**
**९/६३/११,दिपश्रेय,महालक्ष्मी व्हिलेज,साळुंखे मळा, आमराई रोड,इचलकरंजी. मो.नं.९८२२४४३११७.**



वीणा पूजन व वारकऱ्यांचा सत्कार करताना दामोदरलाल बाहेती व इतर प्रमुख मान्यवर.

## मैत्री फाऊंडेशन,मारवाडी युवा मंचची वारकऱ्यांना साहित्यरुपी मदत

इचलकरंजी,ता.२४–

**येथील सामाजिक संघटना मैत्री फाऊंडेशन व मारवाडी युवा मंच यांच्यावतीने घोसरवाड येथून निघालेल्या पंढरपूर वारीस आर्थिक मदत देण्यात आली. यामध्ये प्रवासासाठी लागणारा सर्व किराणा माल व बस खर्च देण्यात आला. वारीस निघालेल्या पुरुषांना कुर्ता पायजमा व भगिनींना साड्यांचे वाटप करण्यात आले.**

लायन्स ब्लड बँक येथे स्वागत सोहळा आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी दामोदरलाल बाहेती हे तर मारवाडी युवा मंचचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रामकिशोर वर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी मैत्री फाऊंडेशनचे अध्यक्ष चंद्रप्रकाश छाजेड, महिला अध्यक्षा वहिदा नेजकर व सर्व सदस्य तसेच मारवाडी युवा मंचचे अध्यक्ष अमृत छाजेड, आशिष भांगडिया, तेजराज भंसाली, प्रांतीय सदस्य जुगल बियाणी, महावीर सिंघवी, रामकिशोर वर्मा तसेच राजपूत सेवा समिती अध्यक्ष प्रेमसिंग चौहान उपस्थित होते. दामोदरलाल बाहेती यांच्या हस्ते वीणा पूजन व वारकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात साक्षी शिवाजी कांबळे हिला शिक्षणासाठी व राहूल आनंदा गायकवाड याला वैद्यकीय कारणासाठी आर्थिक मदत श्री. बाहेती यांच्या हस्ते देण्यात आली.सुत्रसंचालन व स्वागत, प्रास्ताविक अशोक खोत यांनी केले. वारकऱ्यांच्या वतीने बाबासाहेब पुजारी यांनी आभार मानले.



राणाप्रताप सेवा सोसायटीच्या एईपीएस सुविधेचा शुभारंभप्रसंगी सुभाष निंबाळकर, अमित पाटील व इतर मान्यवर.

## राणाप्रताप सेवा सोसायटीमध्ये एईपीएस सुविधेचा शुभारंभ

इचलकरंजी,ता.२४–

**राणाप्रताप विकास सेवा सोसायटीच्या माध्यमातून केडीसी बँकेच्या एईपीएस (आधार अनेबल पेमेंट सिस्टीम) सुविधेचा शुभारंभ उत्साहात पार पडला. या सुविधेमुळे नागरिकांना आधार क्रमांक व अंगठ्याच्या ठशाद्वारे बँकिंग व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे.**

या सुविधेचे उद्घाटन हातकणंगले तालुक्याचे विभागीय अधिकारी सुभाष निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हातकणंगले तालुक्याचे एएफएलसी प्रमुख राजू लायकर, इचलकरंजी शहर शाखेच्या शाखाधिकारी रेश्मा नंदनवाडे, कॅशियर राजू दावणे तसेच राणाप्रताप विकास सेवा सोसायटीचे चेअरमन अमित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमादरम्यान संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना अंगठ्याच्या ठशाद्वारे पेन्शनचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास सोसायटीचे पदाधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी उपस्थित होते.



## विद्यामंदिर बोरपाडळे शाळेत दिंडी सोहळा उत्साहात

बोरपाडळे,ता.२४(प्रतिनिधी)–

**राम कृष्ण हरीचा जयघोष, हातामध्ये भगवी पताका, टाळ मृदुंगाचा गजर, डोईवर घेतलेले तुळशी वृंदावन, बालचमूंनी साकारलेल्या संतांच्या वेशभूषा अशा भक्तीमय वातावरणात विद्यामंदिर बोरपाडळे शाळेतील विद्यार्थ्यांचा आषाढी वारी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

आषाढी एकादशीनिमित्त तालुक्यातील अनेक शाळांमध्ये दरवर्षी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी गावच्या मुख्य मार्गावर पायी दिंडी सोहळा काढला. समाज प्रबोधनपर घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये ग्रामस्थही सहभागी झाले होते. दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष सुदीप पाटील, सदस्य, सदस्या, मुख्याध्यापक उत्तम पाटील , संजय पाटील ,स्वाती लोहार , कल्पना सुणगार , कविता कोटे,पुनम लबडे, सारिका समुद्रे यांनी परिश्रम घेतले.

# बाजारभोगाव-पडसाळी मार्गावर लाखोंचा निधी पाण्यात

## महिन्याभराच्या पावसाने रस्त्यावर खड्डे; पाणी साचल्याने रस्ता बनला धोकादायक

बाजारभोगाव,ता.२४(राम करले)–

**पावसाळ्यापूर्वी मुख्य रस्त्यांवरील नालेसफाई, खड्डे बुजविणे आणि पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र बाजारभोगाव पडसाळी मार्गावरील विदारक परिस्थिती पाहता हा निधी नेमका कुठे खर्च झाला, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.**

अवघ्या महिनाभराच्या पावसातच या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचल्याने रस्ता धोकादायक बनला आहे. दुचाकीस्वार,



बाजारभोगाव-पडसाळी मार्गावर निकृष्ट कामांमुळे ठिकठिकाणी अशी पाण्याची तळी साचली आहेत.

शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच अन्य वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एखादा गंभीर अपघात घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

नालेसफाईची कामे कागदावरच झाली का? निकृष्ट दर्जाची कामे दुरुस्त करून ठेकेदारांना बिले अदा करण्यात आली का? संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. सार्वजनिक पैशांचा अपव्यय करून नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणाचीच जरब उरलेली नाही, अशी भावना नागरिकांमध्ये आहे.

शासनाच्या निधीची उधळपट्टी आणि कामातील हलगर्जीपणाची स्वतंत्र चौकशी करून दोषी अधिकारी, अभियंते आणि संबंधित कंत्राटदारांवर कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

नागरिकांच्या जीविताशी संबंधित अशा गंभीर प्रकरणांकडे प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करत असेल, तर उच्च न्यायालयाने स्वतःहून (सुओ मोटू) दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश द्यावेत, अशीही मागणी नागरिकांकडून होत आहे. विकासाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च होत असताना रस्त्यांची ही दयनीय अवस्था प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

## घोसरवाडात घराघरात फुलणार भक्तीचा मळा

घोसरवाड,ता.२४(वार्ताहर)–

**घोसरवाड (ता.शिरोळ) येथे आषाढी एकादशीला भक्तीचा मळा फुलणार आहे. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्ताने गावात भक्ती संस्कृती आणि कौटुंबिक ऐक्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळणार आहे.**

येथे शनिवार ता.२५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त सर्व गावकरी आपल्या घरासमोर संध्याकाळी सात वाजता दोन पणत्या लावून ज्ञानोबा-तुकाराम हे शब्द रांगोळीने काढून आपल्या सर्व कुटुंबीयांसोबत ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व श्री विठ्ठल रखुमाई देवाची आरती करणार आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्ताने हा सोहळा गावातील प्रत्येक घराघरात होणार असून एकप्रकारे घोसरवाडात भक्तीचा मळा फुलणार आहे. यामध्ये सर्व ग्रामस्थांनी सहभाग घेतला आहे.



ओंकार शुगर फराळे येथे मिल रोलर पूजन करताना संचालक प्रशांत बोत्रे-पाटील व इतर मान्यवर.

## ओंकार शुगरचे मिल रोलर पूजन संपन्न

राधानगरी,ता.२४(प्रतिनिधी)–

**ओंकार शुगर अॅण्ड डिस्टीलरी पॉवर प्रा.लि.फराळे (युनिट नं.३) (ता.राधानगरी) या कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये मिल रोलर पूजन सोहळा नुकताच कारखान्याचे संचालक प्रशांत बोत्रे-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.**

यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर देण्यासाठी ओंकार ग्रुप कटिबद्ध असून शेतकऱ्यांनी ऊस कारखान्यास पाठवून सहकार्य करावे.

यावेळी फराळेचे सरपंच वैशाली डवर, पनोरी सरपंच सुवर्णा परिट, जनरल मॅनेजर शत्रुघ्न पाटील, प्रभारी मुख्य शेती अधिकारी साताप्पा खाडे,शरद पाटील, नानासो जाधव, संभाजीराव देसाई,पंकज पवार, अशोक वाडकर व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## डी.वाय.पाटील अभियांत्रिकीच्या ७२ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील ७२ विद्यार्थ्यांची २६ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.**

विभागातील विद्यार्थिनी सबा साहिर शेख हिला टीई कनेक्टिव्हिटी या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये ८ लाख रुपये वार्षिक पॅकेज मिळाले आहे. लॉन्च्ड ग्लोबल या कंपनीमध्ये सर्वाधिक १६ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, इनयंत्रा टेक्नॉलॉजीज प्रा.लि. मध्ये १२ आणि भारत फोर्ज मध्ये ७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता,अधिष्ठाता प्रा.सुदर्शन सुतार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.मकरंद काईंगडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागप्रमुख प्रा.डॉ.टी.बी.मोहिते-पाटील, प्लेसमेंट समन्वयक तसेच सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.





डी.वाय.पाटील अभियांत्रिकीचे नामांकित कंपनीत निवड झालेले विद्यार्थी.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, सीएचआरओ श्रीलेखा साटम, प्राचार्य डॉ. संतोष चेडे आणि रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कोल्हापुरात भाजपची काँग्रेसच्या विरोधात निदर्शने

कोल्हापूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**पंतप्रधानांच्या निवासस्थाना समोर आंदोलनाच्या नावाखाली निर्माण करण्यात आलेल्या गोंधळाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी, कोल्हापूरच्या वतीने कोल्हापुरात काँग्रेसविरोधात निषेध आंदोलन करण्यात आले.**

निषेध आंदोलनाची सुरुवात भाजपा जिल्हा कार्यालय, नागाळा पार्क येथून करण्यात आली. त्यानंतर काँग्रेस कार्यालयाच्या दिशेने मोर्चा मार्गस्थ झाला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाचा निषेध केला. व्हिनस कॉर्नर येथून निघालेला हा मोर्चा पोलीस प्रशासनाने अडवला.यावेळी पोलिस प्रशासन आणि कार्यकर्ते यांची





कोल्हापुरात काँग्रेसविरोधात भाजपने काढलेला मोर्चा.

झटापट झाली. यावेळी पोलीस प्रशासनाने बॅरिकेट लावून कार्यकर्त्यांना अडवले आणि अटक करण्यात आली.

या आंदोलनात आमदार अमल महाडिक, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, महापौर रुपाराणी निकम, जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर, भाजपा प्रदेश सचिव महेश जाधव, प्रा.जयंत पाटील, स्थायी समिती सभापती विशाल शिराळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तानाजी पाटील, नगरसेवक माधुरी नकाते, उमा पवार यांच्यासह भाजपा पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क | र | म | णू | क





पंडित बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळ, इचलकरंजी आणि नटनागर कल्चरल असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त 'कृष्ण-विठ्ठल'भक्तीमय संगीताचा सुरेल अविष्कार...

॥ तो हा विठ्ठल बरवा ॥

कलाकार
डॉ. श्री. चारुदत्तबुवा गोविंदस्वामी आफळे आणि
सौ. गौरी लक्ष्मण पाटील

संगीत साथ
तबला : श्री. पृथ्वीराज पाटील   पखवाज : श्री. प्रसाद भांडवलकर
तालवाद्य : श्री. सर्जेराव माने   ऑर्गन : श्री. लक्ष्मण पाटील

स्थळ : पंडित बाळकृष्णबुवा स्मृति मंदिर, इचलकरंजी.
वेळ : रविवार, दिनांक २६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता.

तरी रसिकांनी भक्तीरसाचा आस्वाद घ्यावा.

श्रीहरी
शुक्रवार, ता. २४/०७/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
कुँवारी लडकी
मिस लिली
सायं. ७ वा.
A प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २४ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
हॉट वाईफ्स क्लब
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी
SINCE 1975
DOLBY 7.1 SOUND
★ स्वच्छता ★ सुरक्षितता ★ कुटुंबासोबत दर्जेदार मनोरंजन ★
शुक्रवार, 24 पासून धमाकेदार चित्रपट!
हिंदी चित्रपट | मराठी चित्रपट





रोज 3 खेळ: सकाळी 11:45 AM, दुपारी 3:00 PM, रात्री 9:30 PM
रोज 1 खेळ: सायंकाळी 6:00 PM
बुकिंगसाठी संपर्क 9623150103
आजच बुकिंग करा आणि आपली जागा निश्चित करा!
फॅमिली सिटिंग | DOLBY 7.1 साऊंड | आरामदायक बसण्याची सोय | स्वच्छ आणि सुंदर थिएटर | बाहेरील खाणे आणि पिणे बंदी
★ ★ ★ आपले सहकार्य आणि प्रेमाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद! ★ ★ ★



५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता.२४ पासून
रोज २ खेळ ११.४५ व ३ वा. | रोज २ खेळ सायं. ६ व रात्री ९ वा.
थलपती विजय यांची प्रमुख भूमिका असलेला हिंदी चित्रपट





जन नेता (हिंदी) | भुतम भयम (मराठी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत गुरुवार ता.२३ पा.
११.३० * ३.०० * ६.१५ * ९.३०
सुपरहिट फुल्ल अॅक्शन चित्रपट





गुरु
गुरूवार,ता. २३ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२ * ३.१५ * ६.३० * ९.४५ वा.
तामिळनाडूचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. थलापती विजय यांचा बहुप्रतिक्षित चित्रपट





RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow





" धमाल 4 " ( हिंदी ) 09:45 AM, 12:30 PM 04:30 PM, 07:30 PM
" भूतम् भयम् " ( मराठी ) 03:00 PM, 09:30 PM
" द ओडिसी " ( हिंदी ) 06:00 PM, 10:30 PM
" स्वप्नसुंदरी " ( मराठी ) 12:30 PM
" जन नेता " ( हिंदी ) 09:30 AM, 01:00 PM 03:30 PM, 07:00 PM 10:15 PM
" एक होतं माळीण " ( मराठी ) 10:00 AM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11





जन नेता (HIN) (A) 12.00, 03.30, 07.00, 10.15pm
धमाल 4 (HIN) (U/A) 02.15, 07.45, 10.00pm
द ओडिसी (HIN) (A) 11.00am, 01.30, 10.30pm
भूतम भयम् (MAR) (U/A) 10.30am, 04.45pm
स्वप्नसुंदरी (MAR) (U/A) 07.30pm
एक होतं माळीण (MAR) (U/A) 05.00pm
आता पहा मॉर्निंग शो 100 रु. पासून पुढे

# सातारा पालिकेच्या सभेत ४६ विषयांना मंजुरी

## सभेवर खासदार गटाचा बहिष्कार;भुयारी गटार योजनेचा ठेकेदार ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याचा निर्णय

सातारा,ता.२४(प्रतिनिधी)–

**आघाड्यांवर न लढता भाजपाची निर्विवाद सत्ता पहिल्यांदाच दोन्ही राजेंच्या नेतृत्वाखाली सातारा नगरपरिषदेत आली असली तरी गटा- तटाचे राजकारण आता चांगलेच पेटू लागल्याचे चित्र सातारा नगरपरिषद सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने दुसऱ्यांदा अधोरेखित झाले.खासदार उदयनराजे भोसले गटाचे सर्व नगरसेवक सभेवर बहिष्कार टाकत अनुपस्थित राहिले. तरी देखील सभा संपन्न झाली असल्याचे चित्र दिसले.**



दोन्ही राजेंचे मनोमिलन मात्र कार्यकर्त्यांचे काय? असा प्रश्न आजही पालिका वर्तुळात, सभागृहात होत असलेल्या खडाखडीने उपस्थित होत आहे. मनोमिलनातून लढलेल्या निवडणुका अखेर नेते गट तट मानून काम करू नका असे सांगतात. सर्वांना विश्वासात घ्या म्हणताना नक्की माशी शिंकली कुठं याबद्दल आता शहरात चर्चांना उधाण आले आहे.

सातारा नगरपालिकेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत अनपेक्षित राजकीय घडामोडी घडल्या. खासदार उदयनराजे भोसले समर्थक नगरसेवक सभेला अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या सहभागाशिवायच सभा पार पडली. मात्र, आवश्यक कोरम पूर्ण झाल्याने सभागृहाने अवघ्या अर्ध्या तासात ४६ विषयांना मंजुरी देत शहर विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अमोल मोहिते हे होते. ५० सदस्यीय सभागृहातील २८ नगरसेवक उपस्थित राहिल्याने सभेचे कामकाज नियमानुसार सुरू झाले. सभेपूर्वी सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र असताना काही खासदार गटाच्या नगरसेवकांनी अचानक अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याने पालिका वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले. मागील सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील काही नोंदींवरून मतभेद निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. नंतर संबंधित मजकूर वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला, तरी गैरहजेरीमुळे अनेक तर्कवितर्कांना उधाण आले.

सभेत शहरातील विकासकामांना गती देणाऱ्या विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. शहरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, गॅस पाईपलाईनच्या कामामुळे उकरण्यात आलेल्या पाच प्रभागांतील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता, शिवतीर्थ परिसरात हायमास्ट दिवे उभारणे, सुधारित पाणीपुरवठा योजना क्रमांक दोनला मंजुरी तसेच पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या विकास आराखड्यास हिरवा कंदील देण्यात आला.

सभेतील सर्वाधिक महत्त्वाचा निर्णय भुयारी गटार योजनेच्या ठेकेदाराविरोधातील कारवाईचा तसेच २०२५ ते ३१ यासाठी चतुर्थ वार्षिक पाहणी करण्यासाठी एजन्सी नेमणे हे विषय चर्चेचे ठरले. भुयारी गटार योजनेचे नियोजित मुदतीत काम पूर्ण करण्यात अपयश आल्याने संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्याच्या प्रस्तावाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या निर्णयामुळे सार्वजनिक कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांविरोधात पालिका कठोर भूमिका घेत असल्याचा संदेश दिला गेला.

सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या सभेचे कामकाज अवघ्या ३० मिनिटांत पूर्ण झाले. सभा सचिव वर्षा पाटील यांनी विषयांचे वाचन केले. काही विषयांवर उपसूचना मांडल्यानंतर उर्वरित प्रस्तावांना सभागृहाने मंजुरी दिली.

सभेनंतर भाजपचे गटनेते अविनाश कदम यांनी पक्षात कोणतीही गटबाजी नसल्याचा दावा केला. पक्षातील सर्व नगरसेवकांमध्ये समन्वय असून पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनानुसारच पालिकेचे कामकाज सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही सदस्य अनुपस्थित राहिल्यामुळे पक्षात मतभेद असल्याचा निष्कर्ष काढणे योग्य नसल्याचेही त्यांनी सांगितले.

एकंदरीत नगरसेवकांची गैरहजेरी, अल्पावधीत मंजूर झालेले ४६ विषय, भुयारी गटार योजनेतील ठेकेदारावरील कारवाई आणि त्यानंतर सुरू झालेल्या राजकीय चर्चांमुळे सर्वसाधारण सभा शहराच्या राजकीय वर्तुळात विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

## मिरज पंचायत समितीच्या प्रभारी सभापतीपदी स्नेहल मोरे

सांगली,ता.२४(प्रतिनिधी)–

**मिरज पंचायत समितीच्या सभापतीपदाचा पदभार जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती स्नेहल मोरे यांच्याकडे देण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी दिले.**

मिरज पंचायत समिती सभापती व उपसभापती निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यानंतर याबाबतची फेरनिवडणूक होऊन नवीन सभापती व उपसभापती निवड होईपर्यंत येथील सभापतीपदाचा पदभार सौ.मोरे यांच्याकडे राहणार आहे. मिरज पंचायत समितीची सभापती निवड प्रक्रिया बेकायदेशीर ठरवली गेली आहे. या निर्णयाच्या विरोधात अपील करण्यासाठी सभापती तन्वी कमलेकर यांना अजून काही दिवसाची मुदत आहे. दरम्यानच्या काळात कमलेकर यांच्या सहीने पंचायत समितीची मासिक सभा बोलावण्यात आल्याचे पत्र काढण्यात आले.त्यानंतर तात्काळ सभापती पदाचा पदभार जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण सभापती मोरे यांच्याकडे देण्यात आल्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत.दरम्यान, ता.४ ऑगस्ट रोजी मिरज पंचायत समिती सभापती व उपसभापती निवड घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी दिले आहेत.



आष्टा :शिबिरात रक्तदान करताना जि.प.सदस्य संताजी मेटकरी सोबत गौरव नायकवडी,प्रवीण माने,बंडा आटूगडे व मान्यवर.

## आष्ट्यात महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आष्टा,ता.२४(प्रतिनिधी)–

**स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आष्टा शहर व निशिकांत दादा युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम हॉल, आष्टा येथे आयोजित 'महाआरोग्य' शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराचा सुमारे एक हजाराहून जास्त नागरिकांनी लाभ घेतला.**

शिबिराचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हा समन्वयक व संघटक गौरव नायकवडी, राष्ट्रवादीचे युवा नेते प्रवीण माने यांच्या हस्ते झाले.अध्यक्षस्थानी डॉ. सतीश बापट होते. जिल्हा परिषद सदस्य संताजी मेटकरी, निशिकांत दादा युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष अक्षय पाटील, नगरसेवक संजय सावंत, संदीप गायकवाड ,उदय कुशिरे ,पोपट शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला, औषधोपचार तसेच विविध आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून दिल्या. याचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.

## विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी साताऱ्यात मोर्चा

सातारा,ता.२४(प्रतिनिधी)–

**नीट परिक्षेतील कथित पेपरफुटीच्या मुद्द्यावर दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी साताऱ्यात भर पावसात विद्यार्थी व युवक रस्त्यावर उतरले.**

युनायटेड यूथ फ्रंटच्या पुढाकारातून काढण्यात आलेल्या या मोर्चात सुमारे १५० हून अधिक युवक-युवती सहभागी झाले. आंदोलकांनी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. पोवई नाका येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर शाहू चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत घोषणाबाजी करत मोर्चा काढण्यात आला. 'विद्यार्थ्यांना न्याय द्या' आणि 'शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकार थांबवा' अशा आशयाचे फलक सहभागींच्या हातात झळकत होते. शाहू चौकातील सभेत वक्त्यांनी दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा तीव्र निषेध नोंदवला. नीट परीक्षेतील कथित गैर व्यवहाराची पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## कुपवाडमध्ये विकासापेक्षा श्रेयवादावर अधिक जोर

कुपवाड,ता.२४(वार्ताहर)–

**कुपवाडच्या विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, विकासापेक्षा श्रेयवादाला अधिक महत्त्व दिले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. वाढीव घरपट्टी, रस्त्यांची दुरवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहांचा अभाव आणि इतर मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर लढा देण्यासाठी स्थापन झालेल्या कुपवाड संघर्ष समितीमध्ये दोन गट पडल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.**



- शहरातील मुलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष
- संघर्ष समितीतील गटबाजीची चर्चा

गेल्या काही महिन्यांपासून घरपट्टी कमी करण्यासाठी आंदोलने, निवेदने, उपोषणे आणि विविध मार्गांनी पाठपुरावा करण्यात आला. मात्र, त्यातून अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. त्यातच समितीतील अंतर्गत मतभेद आणि श्रेयवादामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, कुपवाडच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असताना, आपापल्या गटांचे वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न होत असल्याने मूळ प्रश्न बाजूलाच पडत आहेत. त्यामुळे विकासाच्या कामांना गती मिळेल का, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. कुपवाडमध्ये आजही अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था, सांडपाण्याचा प्रश्न, सार्वजनिक मुतारींचा अभाव आणि इतर मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत आहे. या समस्या सोडविण्याऐवजी श्रेयवादावरून वाद होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

'कुपवाडचा विकास महत्त्वाचा की श्रेयवाद? हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. संघर्ष समितीतील मतभेद दूर करून सर्वांनी एकत्रितपणे कुपवाडच्या विकासासाठी काम करावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. आता संघर्ष समितीतील वाद मिटणार का, आणि कुपवाडच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळणार का, याकडे संपूर्ण कुपवाडवासीयांचे लक्ष लागले आहे.



उरुण ईश्वरपूर येथे व्हॉलीबॉल खेळणाऱ्या मुलींना बॉलचे वाटप करताना प्रतिक पाटील. समवेत इतर मान्यवर.

## ईश्वरपूरमध्ये व्हॉलीबॉलच्या खेळाडूंना साहित्याचे वाटप

ईश्वरपूर,ता.२४(प्रतिनिधी)–

**सांगली जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या वतीने वाळवा व शिराळा तालुक्यातील शाळा, कॉलेज व प्रशिक्षण केंद्रात व्हॉलीबॉलचे धडे गिरविणाऱ्या मुलींना महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रतिक पाटील यांच्या हस्ते उरुण ईश्वरपूर येथे ५० बॉल व खेळाचे साहित्याचे वाटप करण्यात आले.**

यावेळी चीनमध्ये पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी आंतरराष्ट्रीय खेळाडू मनवा पाटील (कासेगाव) हिचा सत्कारही करण्यात आला.याप्रसंगी व्हॉलीबॉल असोसिएशनचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन पाटील,शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक पोपट पाटील, प्रा.डॉ. संदीप पाटील,श्रीकांत पाटील,प्रा.संग्राम पाटील, प्रा.शरद पाटील,प्रा.अजित शेळके,तसेच क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रारंभी केआरपी कॉलेजचे प्राचार्य टी.जे.शिंदे यांनी स्वागत केले. बी.डी.जाधव यांनी आभार मानले.

## रोटरी क्लब कृष्णा व्हॅलीचा पदग्रहण समारंभ उत्साहात

मिरज,ता.२४(प्रतिनिधी)–

**आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण रक्षणासाठी रोटरी क्लबचा कायमच पुढाकार असतो. सामाजिक कार्यासाठी समविचारी नवीन सदस्य रोटरी परिवारात आणावेत, असे आवाहन रोटरी प्रांतपाल नियुक्त डॉ. सुहास जोशी यांनी केले.**





रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅलीच्या पदग्रहण समारंभप्रसंगी डॉ. सुहास जोशी, प्रफुल्ल तारळेकर,ॲड. बाळासाहेब जाधव आदी.

रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅलीच्या पदग्रहण समारंभात ते बोलत होते. रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅलीच्या अध्यक्षपदी प्रफुल्ल तारळेकर यांची, ॲड. गणेश पाटील यांची उपाध्यक्षपदी, स्वप्नील पाटील यांची सचिवपदी, तर प्रवीण गोडबोले यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली. एन.डी.पाटील नाईट कॉलेजमधील कमवा व शिका या योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर योजनेखालील होतकरू विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ.जोशी यांच्याहस्ते झाला.

मावळते अध्यक्ष उदय कुलकर्णी यांनी स्वागत केले, तर राजेंद्र मेढेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमोद चौगुले, आर. डी. जाधव, विनोद पाटील, तानाजी बोराडे, संदीप नाईक, विनायक काळे, संजीव पाटील, विशाल भगत यांची नवी कार्यकारिणी आहे. सहायक प्रांतपाल ॲड. बाळासाहेब जाधव, श्रीकांत तारळेकर, तुषार तारळेकर, गिरीश तंगडी उपस्थित होते. प्रवीण गोडबोले यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोल्या खासगी शाळेला दिल्याचे उघडकीस

### उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांचे चौकशीचे आदेश

सांगली,ता.२४(प्रतिनिधी)–

**मिरज तालुक्यातील म्हैशाळ गावात असणाऱ्या जिल्हा परिषद शाळेच्या तब्बल आठ वर्ग खोल्या खासगी शिक्षण संस्थेला वापरण्यासाठी परस्पर दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांनी याबाबत चौकशीचे आदेश दिले आहेत.**

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांनी मिरज तालुक्यातील भोसे, म्हैसाळ, सोनी आणि तानंग गावांतील जिल्हा परिषद शाळा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांना अचानक भेटी दिल्या. यावेळी म्हैसाळ येथील शाळेतील वर्गखोल्या खासगी संस्थेच्या वापरात असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी मुख्याध्यापक व ग्रामसेवक यांना जाब विचारला. मात्र भाडे करार झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी याबाबत सविस्तर माहिती घेतली. परंतु, संबंधितांकडून समाधानकारक माहिती न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांना संपूर्ण माहिती गोळा करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचे लाड यांनी स्पष्ट केले. संबंधित शाळा ही कोल्हापूर जिल्ह्यातील एका राजकीय व्यक्तीची असल्याचे समजते. भोसे, सोनी आणि तानंग येथील काही शाळांमध्ये स्वच्छतेचा अभाव आढळून आला. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासल्यानंतर अपेक्षित उत्तरे न मिळाल्याने शिक्षकांच्या अध्यापनाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमधील व्यवस्थापना बाबतही अनेक त्रुटी आढळून आल्या.

## मलकापूरच्या विकासाला जागतिक बँकेचे बळ मिळणार

### आ.अतुल भोसले : मलकापूरमध्ये वीज बिलमुक्त अभियानाचा शुभारंभ

कराड,ता.२४(प्रतिनिधी)–

**मलकापूर शहराच्या वेगवान विकासाला आता जागतिक बँकेच्या योजनांचे बळ मिळणार असून,या योजनांमध्ये मलकापूरचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी ३० वर्षांच्या विकासासाठी शहराला निधीची कमतरता भासणार नाही, अशी माहिती आ.डॉ.अतुल भोसले यांनी दिली.**

मलकापूर शहर वीज बिलमुक्त अभियान, तसेच संकलित करामध्ये १० टक्के सवलत देण्याच्या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल डॉ. सुरेश भोसले यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी अर्बन कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी हे होते. आ.डॉ.भोसले म्हणाले, मलकापूरचा विकास सध्या वेगाने सुरू असून भविष्यात ही गती आणखी वाढणार आहे.त्यामुळे शहराचे रूपांतर मोठ्या शहरात होण्यास वेळ लागणार नाही. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन मलकापूरच्या पुनर्विकासाचा आराखडा तयार केला जात आहे. यामध्ये रस्ते, पाणीपुरवठा, भुयारी गटार तसेच अन्य नागरी सुविधांच्या जुन्या योजनांचा विस्तार व आधुनिकीकरण करण्यावर भर दिला जाणार आहे. मलकापूरची २४ बाय ७ नळ पाणीपुरवठा योजना देशभरात आदर्श ठरली आहे. आता जागतिक बँकेच्या योजनांच्या माध्यमातून या योजनेचे 'अल्ट्रा मॉडर्न' स्वरूपात रूपांतर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच भुयारी गटार योजनेच्या विस्तारासाठी निधी मिळविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.कराड दक्षिण मतदार संघ 'वीज बिलमुक्त' करण्याचे लक्ष्य व मलकापूरला 'सोलर सिटी' बनविण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी शहरातील घरांचे सर्वेक्षण करून प्रत्येक घरासाठी योग्य सौरऊर्जा प्रणाली निश्चित करण्याचे काम सुरू आहे. 'पीएम सूर्य घर' योजनेच्या माध्यमातून कराड दक्षिण मतदारसंघ वीज बिलमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत मतदारसंघातील १ हजार १२३ घरांवर सौर पॅनेल बसविण्यात आले असल्याचे आ.भोसले यांनी सांगितले.



मलकापूर : वीज बिलमुक्त अभियानाचा शुभारंभ कार्यक्रमात बोलताना आ.डॉ.अतुल भोसले,समवेत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

डॉ.सुरेश भोसले म्हणाले, २४ बाय ७ नळ पाणीपुरवठा योजना हा मलकापूरचा ब्रँड बनला आहे. आता त्याच धर्तीवर 'वीज बिलमुक्त मलकापूर' हा नवा ब्रँड निर्माण करण्याची गरज आहे. यावेळी सुभाषराव जोशी,मनोहर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केली. ज्ञानदेव साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले.धनंजय येडगे यांनी आभार मानले. यावेळी बाजीराव जाधव, बी.टी.मोहिते, नगराध्यक्ष तेजस सोनवले, उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, मुख्याधिकारी कपिल जगताप, धनंजय येडगे, गीतांजली पाटील यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व नागरिक उपस्थित होते.

## बाहुळेत 'एक दिवस बळीराजा'साठी उपक्रम

सातारा,ता.२४(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'एक दिवस बळीराजासाठी' या उपक्रमांतर्गत मौजे बाहुळे (ता. जावली, जि. सातारा) येथे कृषी विभाग व महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बाहुळे येथील शेतकऱ्यांच्या शेतावर सुधारित चारसूत्री भात लागवड प्रात्यक्षिक यशस्वीरीत्या पार पडले.**



बाहुळेत शेतावर रोटर चालवून चिखलणीचा अनुभव घेताना जिल्हाधिकारी संतोष पाटील व इतर अधिकारी.

याप्रसंगी सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती भाग्यश्री फरांदे यांनी प्रत्यक्ष शेतात उतरून चिखलणी करत भाताची लावणी केली. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी स्वतः शेतावर रोटर चालवून चिखलणीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

भात लावणीनंतर आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. आधुनिक तंत्रज्ञान, चारसूत्री भात लागवडीचे फायदे आणि कृषी योजनांवर त्यांनी मार्गदर्शन केले.तसेच, शेतकऱ्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेत त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

अधिकाऱ्यांनी केली भाताची लावणी

याप्रसंगी जावली तालुक्याचे तहसीलदार प्रवीण मुदगल, तालुका कृषी अधिकारी प्रकाश राठोड, मंडल कृषी अधिकारी (मेढा) बापूसाहेब रुपनवर, उपकृषी अधिकारी प्रसाद फडतरे, दत्तात्रय जाधव तसेच सहाय्यक कृषी अधिकारी वैभव डोईफोडे, मिलिंद बर्गे, भानुदास चोरगे, संतोष इंगवले,विलास कदम,सचिन बेसके,विशाल डंगारे,धनंजय सापते,नितीन जांभळे,अनिल चव्हाण, रामकृष्ण डंगारे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ध्यास विठ्ठल भेटीचा!

आषाढी एकादशीला महाराष्ट्रातील अनेक जिल्हे आणि कर्नाटक, तसेच आंध्रप्रदेश या राज्यांतील काही ठिकाणांहून वारकरी हातात भगवी पताका, गळ्यात तुळशीची माळ, पुरुष डोक्याला फेटा बांधून अन्? स्त्रिया डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन श्री विठ्ठलाच्या गोजिऱ्या रूपाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला येतात. वारकरी वारीमध्ये टाळ-मृदंगाच्या तालात विठ्ठलाच्या नामाचा गजर करत जातात. हे वारकरी तहान-भूक विसरून उन्हात आणि पावसात अनवाणी चालत असतात.

त्यांचा भोळाभाव पाहून श्री विठ्ठलही वारकरीरूपी भक्तांना भेटण्यासाठी अत्यंत व्याकुळ झालेला असतो. देवाच्या कृपेने वारी आणि विठ्ठलाची भक्ती यांचे उलगडलेले आध्यात्मिक माहात्म्य आजही पंढरपुरी अधोरेखित होते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकावण्यासाठी आणि भाविकांना संघटित करण्यासाठी पंढरपूरच्या वारीची प्रथा चालू केली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच समाजामध्ये पंढरपूरच्या वारीच्या रूपाने भक्तीची गंगा शतकानुशतके प्रवाहित होत आहे. वारकरी संप्रदाय स्थापन करून प्रत्येक वर्षी आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी या २ तिथींना आपापल्या गावातून चालत पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्याची म्हणजे 'वारी'ची प्रथा आरंभ केली. या प्रथेमागे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा भक्तीमय संकल्प कार्यरत आहे. त्यामुळे ही प्रथा अनेक शतकांपासून चालू आहे.

वारीमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्याला तहान, भूक आणि चालण्याचे श्रम यांचा पूर्णपणे विसर पडलेला असतो. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या कृपेने त्यांच्या अंत:करणामध्ये विठ्ठलभक्तीची अखंड ज्योत तेवत असते. त्यामुळे वारकऱ्यांना श्री विठ्ठलाला भेटण्याची ओढ लागलेली असते. यालाच 'भगवंताच्या भेटीसाठी आतुर होणे', असे म्हणतात. या अवस्थेत वारकरीरूपी विष्णुभक्तांच्या हृदयात उत्कटभाव जागृत झालेला असतो. या उत्कटभावाचा आवेश इतका असतो की, प्रत्येक वारकरी श्री विठ्ठलाला भेटण्यासाठी चातक पक्षाप्रमाणे व्याकुळ झालेला असतो. 'भगवंता, आता आम्हाला लवकरात लवकर तू दर्शन दे', अशी एकच आर्त प्रार्थना त्यांच्या हृदयातून होत असते. त्यांच्या मुखावरील उत्कटभाव आणि आर्तता पाहून प्रत्येक गावातील भाविकाचा भाव अनावर होऊन त्यांचा कंठ विठ्ठलाच्या भेटीसाठी दाटून येतो.



'भक्तीमार्गी उपासक त्याच्या उपास्यदेवतेची भक्तीभावाने कशा प्रकारे उपासना करत असतो', याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पंढरपूरच्या वारीतील वारकरी ! अशा प्रकारे देहभान हरपून चालणारे वारकरी तुळशीच्या माळा आणि चंदनाचा टिळा यांच्या सुगंधासह भक्तीच्या गंधाने न्हाऊन निघालेले असतात. भगवंताची भक्तीभावाने उपासना केल्यामुळे भाविकाच्या हृदयामध्ये भक्तीरस पाझरल्याने त्याचे मन, बुद्धी, चित्त आणि अहं या सूक्ष्म देहांची अल्पावधीत शुद्धी होते.

त्यामुळे भाविकाला भगवंताच्या सगुण रूपाशी एकरूप होणे संभव होते. अशा प्रकारे भावपूर्ण वारी आणि आजीवन विठ्ठलभक्ती केलेले संत तुकाराम, संत गोरा कुंभार, संत नामदेव, संत चोखामेळा, संत सावता माळी,संत सेना महाराज इत्यादी संतांना श्री विठ्ठलाच्या सगुण रूपाशी एकरूप होऊन सायुज्य मुक्तीची प्राप्ती करता आली.

या वैज्ञानिक युगामध्ये मनुष्य चंद्र आणि मंगळ यांवर पोचला, तरीही भाविकांच्या हृदयातील विठ्ठलाच्या भक्तीचा झरा अजूनही अविरत वहात आहे. याचे श्रेय वारकरी संप्रदायातील समस्त संतांना जाते. या संताच्या मांदियाळीमुळे समाजाच्या मनामध्ये अजूनही भगवंताच्या भेटीची आणि त्याच्या सहवासातील आनंद अनुभवण्याची ओढ टिकून आहे. त्यामुळे वारकरी संप्रदाय हा 'भक्तीउपासनेचा केंद्रबिंदू' बनलेला आहे. वारीमध्ये कार्यरत झालेले धर्मतेज आणि भक्तीगंगा यांच्या मिलापाचे चैतन्य गावागावांतून प्रवाहित होऊन अनेक गावे श्री विठ्ठलाच्या भक्तीने न्हाऊन निघतात.

श्री विठ्ठलाच्या कृपेने महाराष्ट्रात भागवत धर्माची ही पताका अजूनही फडकत आहे. जेव्हा वेगवेगळ्या गावांतून आलेल्या वाऱ्या पंढरपूरला पोचतात आणि आषाढी एकादशीला त्यांना श्री विठ्ठलाचे पावन दर्शन होते, तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावत नाही. ज्याप्रमाणे नदी तिच्या उगम स्थानापासून वहात सहस्रो मैलांचा प्रवास करून शेवटी सागराला येऊन मिळते, त्याप्रमाणे वारीमध्ये अनेक दिवसांचा पायी प्रवास करून वारकरी शेवटी पंढरपुरातील श्री विठ्ठलापर्यंत येऊन पोचतात. भक्त आणि भगवंत यांच्या भेटीच्या या अलौकिक संगमाच्या सोहळ्याचे वर्णन करण्यासाठी शब्दही थिटे पडतात.

आषाढी एकादशीला 'देवशयनी एकादशी' असेही म्हणातात; कारण या तिथीनंतर श्रीविष्णु क्षीरसागरात योगनिद्रेत मग्न होतो. आषाढी एकादशीला पंढरपूरला आलेल्या समस्त वारकऱ्यांच्या रूपातील भक्तांना भेटून श्रीहरिचे मन तृप्त होते आणि तो योगनिद्रामग्न होतो. त्यानंतर ४ मासांनंतर कार्तिकी एकादशीला भगवंताला पुन्हा भक्तांची आठवण झाल्यामुळे तो योगनिद्रेतून त्याच्या भक्तांना डोळे भरून पहाण्यासाठी जागृत अवस्थेत येतो.

त्यामुळे कार्तिकी एकादशीला 'देवप्रबोधिनी एकादशी' असेही म्हणतात. या ४ मासांत अकार्यरत झालेले विष्णुतत्त्व वारकरीरूपी विष्णुभक्तांच्या भक्तीमुळे पुन:श्च जागृत होते. यावरून आपल्याला भक्तीचे महत्त्व लक्षात येते. ईश्वराच्या कृपेने महाराष्ट्रात पंढरपूरच्या वारीमुळे अखंड भक्तीगंगा प्रत्येक वर्षी प्रवाहित होते आणि मनावर भगवंताच्या भक्तीचा संस्कार दृढ होतो. यासाठी समस्त विठ्ठलभक्त संतांच्या चरणी कोटी कोटी नमन करतात.



## संतांची पंढरी

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांसारख्या संतांनी मानवतेचा सहिष्णुता धर्म शिकवला. विविध अभंग, ओव्या, कीर्तन, भजन, भारूडातून सामाजिक समता प्रस्थापित केली.संत लिखाणातल्या अभंगांतून ईश्वर सर्वांचा आहे हा संदेश स्पष्टपणे व्यक्त होतो, त्यामुळे पंढरीची वारी समाजातील भेदभाव मिटवणारी, माणुसकीची नाती दृढ करणारी अद्वितीय परंपरा ठरत आहे. काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल, नांदतो केवळ, नांदतो केवळ पांडुरंग, काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल! कायम त्याच्या अवतीभवती फिरणारं शरीर पंढरपूर होतं तर अंतरंग विठ्ठलवासाने भरून पावतं. त्याच्यावरील अढळ श्रद्धेतून भक्ती जोम धरू लागते. या निर्गुण निराकाराची उपासना प्रत्येकाला जमेलच असं नाही. पण त्यातील सगुण उपासना म्हणजे भक्ती भगवंताचे रूप मानून मनात ठसवतो. मग वारीला निघताना देहभान विसरायला लावणाऱ्या अंतःकरणातील त्याच्या रूपाचा ध्यास वाढतो आणि कधी पाहिन त्या सर्वस्व रूपाला भाव प्रकट होतो. सर्वसामान्यांना ज्ञान नको असते तर दैनंदिन जीवनात एक आधार हवा असतो. आधार व्यक्तिनिष्ठ असल्याने त्याची उपासना होते. मानवी जीवन समस्याग्रस्त झाल्यावर ईश्वर हाच एक आधार असतो. ज्ञान आणि भक्ती एका नाण्याच्या दोन बाजू असल्याने ज्ञान दानाच्या ठिकाणी भक्तीची ओढ असायला पाहिजे अशी शिकवण देणारे संत आपल्या महाराष्ट्रात जन्मले आहेत. ज्यांनी या महाराष्ट्राचा विकास साधला. नुसती भक्ती अंधश्रद्धेला वाव देते पण ज्ञानयुक्त भक्तीतून डोळस श्रद्धा वाहू लागते ही शिकवण आपल्या संतांनी शिकवल्यामुळे ज्ञानमार्गाने जाणाऱ्या संत तत्त्वज्ञानाला भक्तीची जोड मिळता अध्यात्मिक प्रगतीची वाटचाल जोमाने होते. संतांच्या ग्रंथांचा अर्थ कृतीनेच कळतो. गतीमान मराठी भाषेच्या व्युत्पत्तीमुळे या जीवनात क्रांतीपूर्ण बदल झाले. सातवाहनांच्या काळात देवतांचा स्तुतीपर असलेल्या वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराजांच्या गाथा याचं कारणास्तव प्रसिद्ध झाल्या. संस्कृत भाषेनंतर सामान्यांची प्राकृत भाषा नावारूपाला आली. संत ज्ञानेश्वर महाराज लिहिते झाले. त्यावेळच्या समकालीन संतांनी ती भाषा पुढे नेली.

संत ज्ञानेश्वरांनी मराठीत भगवद्गीतेची टीका लिहून नव्या साहित्य पर्वाची सुरुवात केली. समाजाला वैचारिकतेची वाट दाखवत अज्ञान अंधकाराच्या कोषातून बाहेर काढले. त्यातून ज्ञानेश्वरीसारखा अमूल्य ठेवा महाराष्ट्राला लाभला. महाराष्ट्र भूमीच्या उत्कर्षासाठी संत वचनातील परीपूर्ण मार्गदर्शक तत्त्व उपयोगी पडली. संत ज्ञानेश्वरानंतर संस्कृत भागवतपुराण ग्रंथ मराठीत लिहणारे संत एकनाथ यांनी भावार्थ रामायण मराठीत आणले. संतांची महती थोर आहे. अशी थोर पुण्य संत परंपरा महाराष्ट्राला लाभली. त्यांचे अस्तित्व देहात नसून त्यांच्या वचनात असल्याने आपण त्या वचनाशी बांधिल आहोत. परिस लोखंडाचे सोने करतो तर संत सामान्यांचे असामान्य भल्या सूज्ञ माणसात रूपांतर करतात. आत्मज्ञान, सद्गुण, भक्तीमार्ग ज्यांनी अनुभवलेला असतो तोच खरा संत होय. थोर संत विषयात देव पाहातात तर आपण देवात विषय पाहतो हा फरक असल्याने काम, क्रोध, मद, मोह, मत्सर जिथं संपतो तिथं संत जन्माला येतात. संतांचे विचारकार्य हे मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे असल्याने त्यांनी दिलेल्या नैतिक मूल्यांमधून महाराष्ट्रात समूळ संस्कृतीचे उत्तम संस्कार जनमानसावर झालेले आहेत. संतांचे कार्य पिढ्यान पिढ्या संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी राहील.

बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल करावा विठ्ठल जीवभाव या अभंगाचा अनुभव वारीच्या निमीत्ताने प्रत्येक वारकऱ्याला येत असतो. पंढरीचा राजा हा प्रत्येक वारकऱ्याचा श्वास आहे. त्याचे नाव घेतल्याशिवाय वारकरी कार्य करत नाही. अशा विठ्ठलभक्त असलेल्या वारकऱ्यांचा संगम चंद्रभागेच्या वाळवंटात विठूच्या साक्षीने होत असतो. प्रत्येक वारकरी विठूला आळवत जगाच्या कल्याणासाठी प्रार्थना करत असतो. विश्वाचे कल्याण चिंतणे, गृहस्थ धर्माचे योग्य पालन करणे, भागवत धर्माचे भक्ती मार्गाने पालन करणे हेच वारकऱ्यांचे भक्तीमय जीवन होय.

भारतीय संस्कृतीत सन्मार्गांने वागावे, सत्याचरण करावे यासाठी मानवास विविध व्रते करण्यात सांगितले आहे. आपल्या मनातील अशुभ विचारांचे पदोपदी मानवी मनावर आक्रमण होत असते हे कोणी नाकारु शकत नाही. मानव व पशु यातील महत्त्वाचा फरक निती अनितीचे परिक्षण करणारी बुद्धि हाच म्हणावा लागेल.

परोपकाराय पुण्याय हा जागतिक सिद्धांत महर्षी व्यासांनी मांडल्याचे आपण जाणतोच, मात्र त्यानुसार आचरण ही कर्मकठीण गोष्ट आहे. याची कमीअधिक प्रचिती प्रत्येकास येतच असते. आपणास प्रयत्नपुर्वक या सन्मार्गदायक महासुत्राचे आचरण करावयाचे असेल तर मन नावाचे इंद्रिय आज्ञेत असणे अत्यावश्यक म्हणावे लागेल. आपल्या प्रत्येक धर्मानुष्ठानाचे उच्चतम ध्येय मनाची स्वभाविक चंचलता कमी करुन सरावाने मनोनिग्रह करणे हेच आहे.

उपनिषदांचे मत शरीर रथ, इन्द्रिय घोडे व मन लगाम आहे. त्यामुळे मनावर नियंत्रण यशाचा राजमार्गच म्हणावा लागेल. दहा इन्द्रियांनंतर मनास अकरावे इन्द्रिय म्हणून शास्त्राने मान्यता दिली आहे, म्हणून एकादशीस (अकराव्या तिथीस) भारतीय संस्कृतीत असाधारण महत्त्व आहे.

मनावर अंकुश ठेवायचा असेल तर त्यादृष्टीने एकादशीस व्रत करणे फलदायी ठरते. आपण कोणतेही व्रत करतो तेव्हा ते मूलतः काम्यव्रत असते म्हणजे उत्तम नोकरी, व्यावसायिक प्रगती , सांसारीक सुख हा प्रामुख्याने हेतु असतो. अशाप्रकारची व्रते ऐच्छिक असतात ती कोणी निसर्गतः स्वीकारत नसतो. उदिष्टपूर्तीसाठी दैवीउपासना हे त्यांचे लक्ष असते. मात्र एकादशी व्रत हे श्वासोश्वास करणाऱ्या मानवाने जाणीवपूर्वक आपल्या सर्वांगिण प्रगतीसाठी करावे असे सांगितले आहे. उपवास व हरिस्मरण हा या व्रताचा मुख्य भाग आहे. आहारशास्त्राचा विचार केला तर लंघन करणे हे शरीरास आरोग्यदायक ठरते, जसे शरीराचे आरोग्य आवश्यक आहे तसेच मनास सामर्थ्यसंपन्न करण्यासाठी एकादशीस हरिस्मरण करणे हितकारक ठरते.

## आषाढी एकादशीचा इतिहास

श्रीविठ्ठला बद्दल निरपेक्ष प्रेमभाव हे असाधारण बळ प्रदान करणारे ठरते. आषाढी एकादशीला लाखो लोक विठोबाचे दर्शन घेण्यास मंगलमय वारीत सहभागी होतात. त्याचे एकमात्र कारण विठठलाचे प्रेमस्वरुप नाम ।।विठोबाचे नाम सुलभ सोपारे। तारी एकसरें भवसिंधु।। येणा-या प्रत्येकावर समानभावाने प्रेमकरणारा व भवसिंधू तरुन जाण्यास तळमळीने साह्यभुत होणारा विठठल हाच सकलांचा आधार ठरतो. हरिस्मरण हाच मुख्य धर्म आहे असे मानणे, व त्यानुसार आचरण करणे मानवास सात्विक बनवते. अशा हरिभक्ताच्या मनातील हरिचिंतनाची सहजस्पंदनाने भूमंडलातील अमंगलाचे अघमर्षण व मांगल्याचे प्रक्षेपण करत असते आणि तेही निरपेक्ष आणि अविरत.

कलीयुगात अशा ज्ञातअज्ञात हरिभक्तांच्या पुण्यप्रभावानेच सन्मार्गाने जाणा-यांना अपयशाच्या महाद्वारात उभे राहूनही हरिनिष्ठ राहण्याचे अभेद्य बळ मिळत असते. यशापयशाच्या आलेखावरुन आपल्या भक्तिचे किंवा इश्वरीकृपेचे मुल्यांकन आपण करु शकत नाही.

मनातील असंतुलीत आंदोलने, अनामिक भय, सर्वसाधनसंपत्तीने सालंकृत असूनही निद्रादेवीची अवकृपा व सतत असमाधानाचे बीजारोपण, या लक्षणांच्या यादीत चढत्या भाजणीने होणारी वाढ थांबवणे हे आपले उदिष्ठ असणे अगत्याचे आहे. कारण विठठलाचे स्वरुप तर शांताकारम्? आहे. आम्ही अल्पसंतुष्ट मनोवृत्तीचा पुरस्कार करत आहोत असे कदापि समजू नये.

नित्यस्पर्धेतील सर्वोत्तम स्पर्धक अशी आपली ख्याती जरुर असावी, मात्र त्याच बरोबर शाश्वत सर्वोत्तमाचा ध्यासही घ्यावा. आणि त्यासाठी आषाढी एकादशी हा अत्युत्तम मुहूर्त आहे हे वेगळे सांगावयास नको.

देवशयनी एकादशीचा इतिहास पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य याने तप करून शंकराकडून अमरपद मिळवले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, विष्णु, शिव अशा सर्व देवांना अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकुट पर्वतावर धात्री (आवळी) वृक्षातळी एका गुहेत दडून बसले. त्यांना त्या आषाढी एकादशीला उपवास करावा लागला. पर्जन्याच्या धारेत स्नान घडले. अकस्मात त्यांच्या सर्वांच्या श्वासापासून एक शक्ती उत्पन्न झाली. त्या शक्तीने गुहेच्या दाराशी टपून बसलेल्या मृदुमान्य दैत्याला ठार मारले. ही जी शक्तीदेवी, तीच एकादशी देवता आहे.आषाढी एकादशी व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. ही मनोकामना पूर्ण करणारी एकादशी आहे. ही पुत्रदायी एकादशी आहे.

पंढरपूरची वारी हे व्रत आषाढ शुद्ध एकादशीपासून करतात. वारकरी संप्रदाय हा वैष्णव संप्रदायातील एक प्रमुख संप्रदाय आहे. या संप्रदायात वार्षिक, सहामाह याप्रमाणे जशी दीक्षा घेतली असेल, तशी वारी करतात.

ही वारी पायी केल्याने शारीरिक तप घडते, असे समजले जाते. चातुर्मासाची सुरुवात आषाढ शु। एकादशीने होते. एकादशी या तिथीला अन्य दिवसांच्या तुलनेमधे प्रत्येकामधील सात्त्विकता सर्वात अधिक असते. त्यामुळे या दिवशी साधनाकरण अधिक सोपे जाते आणि साधनेपासून होणारा लाभ हा सर्वाधिक असतो. सर्व भाविकांना प्रिय असणारी ही आषाढी एकादशी. तिचं महात्म्य असं आहे. वर्षभरातील चोवीस एकादशींमध्ये आषाढी एकादशीचे स्वत:च वेगळे स्थान आहे.



आषाढी एकादशी म्हटले की डोळयासमोर येते ती पंढरपुरची वारी. गेले शतकानुशतक शेकडो किलोमीटर चालत भक्तेभावाने लाखोंचा समुदाय आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरला जमा होतो। भारताच्या आध्यात्मिक इतिहासातील ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे.

बहुतेक वारकरी वारी पायी करतात. ही वारी पायी केल्याने शारीरिक तप घडते. आषाढी एकादशीला पंढरपूरला वारी जाते. गेल्या आठशे वर्षांपासून अधिक काळ ही वारी चालू आहे. एका दृष्टीने बघायला गेले तर साधना करणे म्हणजे एक प्रकारचे व्रतच असते.



# जय जय विठोबा रखुमाई

कृष्णाचे नाव विठ्ठल कसे पडले आणि रुक्मिणी विठ्ठला पासून वेगळी का झाली त्याची कथा...

कृष्ण निजला निवांत आठवली त्याला राधा
राधेला केले जादूने जिवंत जणू काय झाली त्याला प्रेम बाधा.

एकदा कृष्ण स्वतःच्या प्रसादात निवांत झोपला होता. आणि मग अचानक त्याला राधेची आठवण आली. कृष्णाला राधे विषयी असलेली ओढ सर्वज्ञातच आहे. आणि मग आपल्या जवळ असलेल्या योगशक्तीने तो राधेशी संवाद साधत होता. बालपणीच्या वृंदावनातल्या जुन्या आठवणी काढून दोघं गप्पांमध्ये रमले होते.

समोरून आली रुक्मिणी
कृष्णा संगे राधास पाहिली
डोळे झाले लाल लाल
म्हणे मी कृष्णास सोडून चालली

तेवढ्यात तिथे रुक्मिणी आली. सहाजिकच कृष्णा सोबत राधेला बघून तिच्या अंगाचा अगदी तीळपापड झाला. चिडून रागावून ती कृष्णाला सोडून निघून गेली.

कुठे गेली रुक्मिणी
कोणास बाई ठाऊक
कृष्ण भटकतोय तिला शोधत
होऊन व्याकुळ भावूक

तशी रुक्मिणी समजदार होती. कृष्ण प्रत्येक वेळी कुठेतरी जाई काहीतरी अडचण येईल मग ती सोडवता सोडवता त्याला कोणीतरी सहाय्यकरे आणि एका नवीन पटराणीची कृष्णाच्या महालात भर पडेल. रुक्मिणीने हे सर्व हसतमुखाने सहन केलं. पण यावेळी माहित नाही तिला काय झालं? कदाचित जो एकांत आणि सहवास तिला पती म्हणून कृष्णा कडून मिळत नाही तो राधेला मिळालेला बघून तिच्या मनामध्ये मत्सर उफाळून आला असावा आणि ती घर सोडून निघून गेली. पण आता कृष्ण तरी काय करणार? कृष्णाच्या सर्व राण्यांमध्ये रुक्मिणी ही अनुभवाने मानाने वयाने आणि मनानेही मोठी होती. यादवांचा सगळा कुटुंबकबीला आणि परिवार तिने अगदी एकसंघ बांधून ठेवला होता. पण आता तिच्या अशा रागावून जाण्याने कृष्णाची पंचायत झाली. आणि मग तोही निघाला तिला शोधायला.

पोहोचला बाई कृष्ण शोधत तिरी चंद्रभागेच्या.
आणि रुक्मिणी दिसली दिंडीरवनात पंढरीच्या

आता रुक्मिणीला शोधत शोधत कृष्ण पोहोचला भूलोकी. आणि तिथे पंढरपूरच्या दिंडी वनात त्याला रुक्मिणी दिसली.

कृष्ण मनवितो रुक्मिणीस पण ती रुसलेली फार

म्हणतो कसा, ''अगं रुक्मिणी कसा करू मी तुझ्याविना वैकुंठाचा संसार?'रुक्मिणीला दिंडी मनात बघितल्याबरोबर कृष्णाला हायसं वाटलं. तू रुक्मिणीची नाना प्रकारे मन धरणी करत होता. अगं तू माझी पटराणी, आठी जणींमध्ये तू सगळ्यात मोठी. माझा वैकुंठाचा कारभार तुझ्याविना कसा काय चालेल बरं? इतके संत, ऋषी, महर्षी येतात, भक्तगण येतात, त्यांची उठबस, आदराधित्य सगळं तूच तर बघतेस. आता तूच अशी रुसून बसली तर आलेल्या पाहुण्यांचे स्वागत कोण करेल? पण रुक्मिणी फार रागावली असल्याने तिने भगवंताच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. आणि ती तिथेच दिंडी वनात राहिली.

रुक्मिणी नाराज त्यातच कृष्णास
आठवे भक्त एक थोर
नाव त्याचे पुंडलिक
लय गुणाच ते पोरं

रुक्मिणीची मन धरणी करून शेवटी कृष्ण थकला आणि पुंडलिक नावाच्या आपल्या भक्ताकडे गेला. पुंडलिकाची महिती तर आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे.

पुंडलिकाच्या घरी आली कृष्णाची ग बाई स्वारी
पुंडलिक करतो आई बापाची सेवा
ठेवून उभा विटेवर कृष्णाला दारी

पुंडलिकाकडे मोठ्या आशेने कृष्ण भगवान गेले. पण इकडे पुंडलिक मात्र आई-वडिलांची सेवा करण्यात दंग होते. दाराशी साक्षात भगवंत आला तरीही त्यांनी घरात असलेली एक वीट भगवंताजवळ फेकली आणि त्यावर उभा राहण्यास सांगून ते आई-वडिलांची सेवा करत राहिले.

वाट पाहता पाहता कृष्णाची मूर्ती रहिली
विटे मुळे विठ्ठल त्याची प्रचिती जाहली

पुंडलिक आई-वडिलांची सेवा करण्यात दंग झाले होते इकडे सकाळी मंदिराचे दरवाजे उघडण्याची वेळ होऊन गेली होती. शेवटी नाईलाजाने कृष्ण भगवंत पुंडलिकाकडे मूर्ती रुपात राहून मंदिराच्या गाभाऱ्यात आपल्या स्थानावर आले. पहाटे पहाटे भक्त पुंडलिकाच्या लक्षात आलं की अरे इथून भगवंत तर निघून गेले आहे त्यांची मूर्ती केवळ तिथे राहिली आहे. आणि म्हणूनच विटेवर उभा असलेला तो विठ्ठल असं भगवंताचे नामकरण झालं.

२८ युगे झाली लांब उभी राहुनी
रुक्मिणी रुसवा तो धरी
अवघ्या भू मंडळाचा संसार बघत
विठ्ठल उभा विटेवरी

रुक्मिणीची अर्जव करता करता, तिची मनधरणी करता करता अनंत काळ निघून गेला. एक तर कृष्णाचे भक्तगण अपार. त्याला सवडच कुठे होती रुक्मिणीसाठी, त्यातच त्याने राधेला बोलावलं. रुक्मिणीचा रागावर झाला आणि कितीतरी युगे ती एकटीच वेगळी जाऊन उभी राहिली. पण विठ्ठलाचा संसार मात्र सुरू आहे. कान्होपात्रा, जनी, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, तुकाराम, नामदेव, अगणित भक्तगण आणि त्यांची अनन्य भक्ती यातच मग विठ्ठराया रममाण झाला. आणि रुक्मिणी मात्र एकटी राहिली.

भू मंडळी म्हणे विठ्ठलास बाप
आणि रुक्मिणी आई
बोला जय जय विठोबा रखुमाई

नवरा बायकोचे भांडण असलं तरी भक्तांसाठी मात्र विठ्ठल त्यांचा बाप पाठीराखा आहे आणि रुक्मिणी त्यांची रखुमाई आहे.

**• राखी भावसार भांडेकर, नागपूर**

# लोकप्रिय लोकसेवक : झुंझारदादा पाटील



**आष्टा ही कृषीप्रधान, सहकार, शिक्षण, सांस्कृतिक परंपरा आणि क्रीडा क्षेत्रातील वैभवशाली इतिहास लाभलेली नगरी आहे. या शहराच्या विकासात अनेक नेतृत्वांनी मोलाचे योगदान दिले असून, त्यामध्ये माजी नगराध्यक्ष झुंझारराव शिवाजीराव पाटील यांचे नावही जोडले जाते. लोकसेवा, विकासाची दूरदृष्टी आणि सर्वसामान्यांशी जपलेली आत्मीयता या गुणांमुळे त्यांनी आष्टा शहराच्या जनमानसात वेगळे स्थान निर्माण केले आहे.**

२००६ला नगरसेवक म्हणून लोकप्रतिनिधित्वाची सुरुवात करत त्यांनी पालिकेत पाणीपुरवठा सभापती, आरोग्य सभापती, उपनगराध्यक्ष आणि त्यानंतर नगराध्यक्ष म्हणून प्रभावी कामगिरी बजावली. पुढे सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेतही त्यांनी मोलाचे योगदान दिले. आज ते आष्टा शहर विकास आघाडीचे विद्यमान गटनेते म्हणून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

झुंझारराव पाटील यांचे राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजसेवेचे माध्यम आहे. सामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे आणि प्रशासनाशी समन्वय साधून विकासकामे पूर्ण करणे ही त्यांची ओळख बनली आहे. स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत यश संपादन करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देतात. युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देणारे ते अनेकांसाठी खऱ्या अर्थाने आयडॉल व्यक्तिमत्त्व ठरले आहेत. शिवाजीराव पाटील आप्पा पतसंस्था ही त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आणखी एक महत्त्वाची ओळख आहे. 'सामान्य माणूस हा केंद्रबिंदू' या विचारातून त्यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून हजारो नागरिकांना आर्थिक आधार दिला. अनेक लघुउद्योजक, व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांना वेळेवर पतपुरवठा करून त्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा केला. झुंजारराव पाटील युवा मंचच्या माध्यमातून त्यांनी रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम अशा विविध लोकोपयोगी कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांची तळमळ शिवाजीराव पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून प्रकर्षाने दिसून येते. आज झुंझारराव दादा हे केवळ राजकीय नेते नसून विकासाभिमुख, संवेदनशील आणि समाजहिताला सर्वोच्च स्थान देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांची विकासाची दृष्टी, समाजसेवेची तळमळ आणि सर्वसामान्य माणसाप्रती असलेली आत्मीयता हीच त्यांच्या लोकप्रियतेची खरी ताकद आहे. वाढदिवसानिमित्त माजी नगराध्यक्ष झुंझारराव पाटील यांना निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**-अंकुश मदने**
**(संचालक, शिवाजीराव पाटील पत संस्था आष्टा)**

# प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल ३७२ चौरस फुटाचे

**- प्रकाश आवाडे**

इचलकरंजी,ता.२४-

**प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत साकारण्यात येत असलेली घरकुले आता ३२५ चौरस फुटाऐवजी ३७२ चौरस फुटाची असणार आहेत. घरकुलाचा कार्पेट एरीया वाढला असला तरी घराची किंमत पूर्वी जाहीर केल्याप्रमाणेच १० लाखच असणार आहे, अशी माहिती या घरकुलाचे मुख्य प्रवर्तक प्रकाश आवाडे यांनी दिली.**

इचलकरंजी शहर व परिसरातील गरीब, कष्टकरी कामगार वर्गासह छोटे व्यापारी, रिक्षा व टेम्पोचालक, नोकरदार



**प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल योजनेची माहिती देताना माजी आम.प्रकाश आवाडे.**

सर्वसामान्यांना हक्काचे घरकूल मिळवून देण्यासाठी 'प्रकाश आवाडे गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या' वतीने शहर व परिसरात ५ हजार घरे बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी पंतप्रधान आवास योजनेसह अन्य योजनांच्या अनुदानाचा लाभही संबंधित लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणून जय सांगली नाका परिसरातील शरद इन्स्टिट्युटच्या मागे इचलकरंजी-टाकवडे रोडवर घरकुले उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक घरकूल हे पूर्वी ३२५ चौरस फुटाचे निश्चित करण्यात आले होते. या घरकुलात एक लिव्हींग रूम, किचन, बेडरूमसह स्वतंत्र संडास, बाथरूमही असणार आहे. त्याचबरोबर युटीलीटी सुविधाही उपलब्ध असणार आहे. शिवाय घरकुल लाभार्थ्यांसाठी प्ले ग्राउंड, नाना-नानी पार्क, लहान मुलांसाठी खेळणी, अभ्यासिका, मोठा हॉल आदी सुविधाही निर्माण करण्यात येणार आहेत.

याप्रसंगी कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेचे चेअरमन स्वप्निल आवाडे, प्रकाश दत्तवाडे, अहमद मुजावर, बाळासाहेब कलागते, रुबन आवळे, शेखर शहा, रमेश कबाडे, चंद्रकांत पाटील, महेश सातपुते, राजेंद्र आरेकर, सुहास अकिवाटे, नरसिंह पारीक, डॉ. सुषमा पुजारी, सपना भिसे आदींसह उपस्थित होते.



डॉ. प्रमोद पाटील यांना सन्मानित करताना डॉ. अनिल काकोडकर.

# डॉ. प्रमोद एस. पाटील यांना सीआरएस लीडरशिप अवॉर्ड

कोल्हापूर, ता. २४ (प्रतिनिधी)-

**येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे रिसर्च डायरेक्टर प्रा. डॉ प्रमोद एस. पाटील यांना उत्कृष्ट संशोधन व शैक्षणिक कार्यासाठी सीआरएस लीडरशिप अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

चिरंतन रसायन संस्था (सीएसआर) आणि सौराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सौराष्ट्र विद्यापीठात आयोजित 'सायन्स बियॉन्ड बाउंडरी : इन्व्हेन्शन, डिस्कव्हरी, इनोव्हेशन अँड सोसायटी या आंतरराष्ट्रीय परिषदेत हा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. पाटील यांना डिस्टिंग्विश्ड स्पीकर म्हणूनही गौरवण्यात आले. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आम. सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले याचे सहकार्य मिळाले.

# रास्त भाव दुकानदारांना ई सेवा केंद्र मिळावे

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

इचलकरंजी, ता.२४-

**रास्त भाव धान्य दुकानदारांना शासनमान्य ई सेवा केंद्रमिळावे या मागणीसह इतर मागण्यांचे निवेदन कोल्हापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.**

निवेदनात,रास्त भाव धान्य दुकानदाराना शासनमान्य ई सेवा केंद्र मिळावे. रेशन धान्य दुकान गेली अनेक वर्षे केंद्र व राज्य सरकारच्या लोकउपयोगी अभियानामध्ये, देशाच्या आत्पतकलीन परिस्थिती मध्ये निस्वार्थी विनामूल्य सहभाग घेत असतात. सध्या फक्त गहू व तांदूळ वितरणातून अत्यल्प कमीशन मिळत आहे.



**निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांना निवेदन देताना डॉ. रवींद्र मोरे राजेश मंडलिक गजानन हवलदार व इतर.**

तरी शासनमान्य ई सेवा केंद्र मिळाल्यास उत्पन्नात थोडी वाढ होवून दिलासा मिळेल.धान्य वाटप चे मार्जीन मनी फेब्रु. २०२६ पासून ते जून २०२६ पाच महिन्याचे एकत्रित लवकर मिळावे, सर्वर डाऊनमुळे मशीनच्या होत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, लॉगिन मधुन शुभ्र व उर्वरीत केशरी कार्ड धारकांचे ऑनलाईन रेशनकार्ड नंबर काढणेसाठी रेशन दुकानदार यांना लॉगिन मिळवे, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदरचे निवेदन जिल्हाध्यक्ष डॉ रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांना देण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष राजेश मंडलिक, गजानन हवालदार, अरुण शिंदे, महादेव कदम, जालंधर पाटील, नायकवडी, अनिल पाटील, सचिन चव्हाण, आदित्य दावणे, बंडा सावेकर, श्रीमंय शेटे, सरिता हरूगले, करंण घोडके, धीरज भंडारी, केतन भोसले, बाळासाहेब शेटे आदि दुकानदार उपस्थित होते.



# सुरज गॅस एजन्सीतर्फे विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

इचलकरंजी,ता.२४-

**माई महिला मंडळ संचलित, श्रीमती बाळाबाई केशवलाल शहा माई बाल विद्या मंदिरात सुरज गॅस एजन्सीतर्फे गरजू व गुणवंत अशा बालवाडी ते चौथीच्या एकूण २५ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. हे गणवेश सुनितभाई परिख यांच्याकडून गेली अनेक वर्षे दिले जातात.**

कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीना तोसनीवाल,राजकुमार यादव(विक्रि सेल्स अधिकारी), सुरज गॅस एजन्सीचे मॅनेजर विशाल दुधाणे तसेच क्लार्क प्रमोद रक्ताडे,संस्थेच्या उपाध्यक्षा माधुरी मर्दा, सेक्रेटरी निकिता शहा, सल्लागार डॉ..एस.पी.मर्दा, लता नाईक यांच्यासह पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.स्वागत व प्रास्ताविक लता नाईक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रजनी घोडके यांनी करून दिला.आभार आरती पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन संगीता होगाडे यांनी केले.

# हातकणंगलेत दुचाकींची धडक; तिघे जखमी

हातकणंगले,ता. २४ (प्रतिनिधी) -

**कोल्हापूर सांगली - मार्गावर हातकणंगले गावच्या हद्दीत असलेल्या रामलिंग फाट्यावर दोन मोटार सायकलींची धडक झाल्याने तिघेजण गंभीर जखमी झाले.यातील एकाची प्रकृती चिंताजनक असून त्याला इचलकरंजी व कोल्हापूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास झाला.**

चंद्राज्योती पुजारी (वय २०), अभिषेक न्यामगोंड (वय २० दोघेही रा. जमखंडी) व अजित अंकलीकर (वय ६२, रा. आळते ) अशी जखमींची नावे असून चंद्राज्योती पुजारी याची प्रकृती चिंताजनक आहे.न्यामगोंड व पुजारी हे घोडावत महाविद्यालयाचे विद्यार्थी असून ते अतिग्रे येथील महाविद्यालयातून हातकणंगलेकडे मोटार सायकल वरून चालले होते. तर अंकलीकर हे मोटार सायकलवरून आळतेहून रामलिंग फाट्यावर रस्ता ओलांडून रूकडी येथे चालले होते. कोल्हापूर - सांगली मार्गावर मोठ्या प्रमाणात रहदारी असल्याने व रात्रीची वेळ असल्याने दोघाही मोटारसायकल स्वारांना रस्त्याचा अंदाज न आल्याने दोन्ही मोटार सायकलींची धडक झाली. या अपघाताची नोंद करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत पोलिसांत सुरू होते.

# ...मग तुम्ही झोपा काढत होता का?-आम. पाटील

कोल्हापूर, ता. २४ (प्रतिनिधी)-

**काँग्रेसच्या काळात पेपरफुटी झाली, असे भाजपवाले सांगत असले तरी त्यावेळी ते झोपा काढत होते का? त्याचवेळी भाजपने रस्त्यावर उतरून आंदोलन का केले नाही, असा सवाल काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आम. सतेज पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केला.**

पाटील म्हणाले, आता विषयांतर करण्यासाठी, स्वतःची चूक झाकण्यासाठी हे प्रयत्न सुरू आहेत. लोकांमधील उद्रेक हा राजकीय उद्रेक आहे, असे भासवत आहेत आणि यातली हवा काढून घेण्याचे काम भाजप करत आहे.

मात्र, हा जनक्षोभ आहे, काँग्रेस नेहमीच यासंदर्भात आवाज उठवत राहणार आहे. सरकार हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न करत आहे. मुलांच्या खिशात पुडी टाकू, असे पोलिसांनी म्हणणे म्हणजे गृह खात्याचे अपयश आहे.

पोलिसांच्या माध्यमातून हे आंदोलन दडपण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही आम. पाटील यांनी केला. ईव्हीएम मशीन आणि इतर गोष्टी पुढच्या निवडणुकीत लक्षात येतील. पण, सध्या युवकांचा रोष आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होणे गरजेचे असल्याकडेही आम.पाटील यांनी लक्ष वेधले.

महाराष्ट्रातही दबावाचे राजकारण आंदोलकांवर केले जात आहे. मात्र, त्याला बळी पडणार नाही. जर असे गुन्हे दाखल केले तर महाराष्ट्र काँग्रेस न्यायालयात मदत करणार असल्याचे आम.पाटील यांनी सांगितले.

# टाकळीत भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा

सैनिक टाकळी,ता.२४(प्रतिनीधी)-

**येथील श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर गावातील प्रमुख मार्गावरून भक्तिमय आणि उत्साही वातावरणात दिंडी काढण्यात आली. या सोहळ्याने संपूर्ण टाकळी गावात चैतन्य निर्माण झाले होते.**

वारीदरम्यान विद्यार्थ्यांसह उपस्थितांनी पारंपारिक फुगडीचा आनंद घेतला, तसेच टाळ-मृदंगाच्या तालावर भजनाचे कार्यक्रमही झाले.विठ्ठल नामाचा गजर करूया, एकादशीची वारी साजरी करूया! या घोषात आणि हरिभक्तीच्या रंगात तल्लीन होऊन शिक्षक, विद्यार्थी, वारकरी आणि ग्रामस्थांनी हा सोहळा अत्यंत यशस्वीरीत्या साजरा केला.



# लोकप्रतिनिधींकडून लाठीहल्ल्याचा निषेध

गगनबावडा, ता.२४ (प्रतिनिधी) -


**नवी दिल्ली येथील आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गगनबावडा तालुक्यातील लोकप्रतिनिधी, निवडे-साळवण परिसरातील नागरिकांनी गगनबावडा तहसीलदारांना निवेदन दिले.**

निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला संविधानाने शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. मात्र आंदोलनावर बलप्रयोग झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.नीट पेपर फुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखेखाली किंवा स्वतंत्र यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी करावी. महाराष्ट्र शासनामार्फत या मागण्या तातडीने भारत सरकारकडे पाठवाव्यात आणि योग्य ती कार्यवाही करावी.यावेळी जि. प. सदस्य संभाजी पाटणकर, सभापती छाया देसाई, पं. स.सदस्य अमर कांबळे, विलास पाटील,सहदेव कांबळे, बयाजी शेळके गोकुळ संचालक, प्रकाश पाटील,बंकट थोडगे, भगवान पाटील, सूर्यकांत पडवळ, शिवाजी राऊत व संभाजी पाटील यांसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते.

# कृष्णेच्या पातळीत काहींशी घट

बुबनाळ ता.२४( वार्ताहर)-

**गेले दोन दिवस धरणपाणलोट क्षेत्रात पावसाने दिलेली पुर्ण उघडीप, हिप्परगी धरणातून करण्यात येत असलेला विसर्ग यामुळे शिरोळ तालुक्यातील कृष्णा नदीची पाणी पातळी शुक्रवारी दिवसभर स्थिर राहीली आहे.**



**पातळी स्थिर राहील्याने कृष्णेचे पाणी श्री दत्त मंदिर पादुकापर्यंत पोहचूनही दक्षिणद्वार सोहळा होवू शकला नाही.( छाया : अनिल जासुद)**

गुरुवारी रात्री कृष्णेच्या पाणी पातळीत मात्र अडीच फुटाने वाढ झाली. यामुळे शुक्रवारी पहाटे मंदिराजवळील कृष्णेचे पाणी श्री दत्तप्रभुंच्या पादुकापर्यंत पोहचले.दक्षिणद्वार सोहळ्यासाठी अजुन सहा इंच पाणी पातळीत वाढ होणे आवश्यक होते.मात्र शुक्रवारी दिवसभर कृष्णेची पातळी जैसे थे राहीली.पाणी पातळीत वाढ न होता दुपारनतंर किंचीत घटच झाल्याने नृसिंहवाडी श्री दत्त मंदिरमध्ये अपेक्षित असलेला या मोसमातला दुसरा दक्षिणद्वार सोहळा होऊ शकला नाही. यामुळे भाविकांना दक्षिणद्वार सोहळयाची प्रतिक्षाच करावी लागणार आहे. दरम्यान, शुक्रवारी रात्री आठ वाजता श्रीं चा पालखी सोहळा पाण्यातुनच झाला.राजापूर बंधाऱ्याजवळ सकाळी आठ वाजता पाणी पातळी ३० फुट ७ इंच होती. ती सायंकाळी पाच वाजता ३० फीट ६ इंच झाली आहे.

# सर्किट बेंचच्या वर्षपूर्तीनिमित्त १६ ऑगस्टला सोहळा

कोल्हापूर, ता.२४ (प्रतिनिधी)-

**कोल्हापूर सर्किट बेंचच्या स्थापनेला १६ ऑगस्ट २०२६ रोजी एक वर्ष पूर्ण होत असून या निमित्त वर्षपूर्ती सोहळा केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता पूर्ण खंडपीठाच्या मागणीला नवे बळ देण्याचा निर्धार सहा जिल्ह्यांतील वकिलांनी व्यक्त केला. केंद्रीय कायदामंत्र्यांसह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, सर्किट बेंचसाठी प्रथम नियुक्त झालेले चार न्यायमूर्ती तसेच विद्यमान न्यायमूर्तींना या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या नियोजनासाठी शुक्रवारी कोल्हापूर बार असोसिएशन व खंडपीठ कृती समितीची बैठक झाली.**

बैठकीत सर्किट बेंचच्या स्थापनेसाठी गेल्या चार दशकांपासून संघर्ष करणाऱ्या ज्येष्ठ वकिलांचा वर्षपूर्ती सोहळ्यात गौरव करण्यात यावा, अशी सूचना सांगलीचे ज्येष्ठ विधिज्ञ श्रीकांत जाधव यांनी केली.सर्किट बेंच जिल्हा बारचे अध्यक्ष तेजपाल इंगळे यांनी सहा जिल्ह्यांतील सर्व वकिलांचा या सोहळ्यात सक्रिय सहभाग असेल, असे सांगितले. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. विवेक घाटगे आणि ॲड. संग्राम देसाई यांनी सर्किट बेंचच्या वर्षभरातील कामगिरीवर आधारित माहितीपट तयार करण्याचा प्रस्ताव मांडला.

सर्किट बेंचच्या स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांना कोल्हापूरचा सर्वोच्च शाहू पुरस्कार प्रदान करण्यासाठी सहा जिल्ह्यांच्या वतीने ठराव करण्याची सूचनाही बैठकीत करण्यात आली.

बैठकीस सातारा बार असोसिएशनचे बी. एम. जगताप, एस. एम. गायकवाड, दीपक पाटील, सांगली बार असोसिएशनचे एस. के. पाटील, भाऊसाहेब पोवार, दिलीप पाटील, हंबीरराव पाटील, प्रमोद भोकरे, प्रताप हारुगडे; सिंधुदुर्ग बार असोसिएशनचे अध्यक्ष परीमल नाईक, विवेक माडगुळकर, आर. आर. तोष्णिवाल, कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अजित मोहिते, व्ही. आर. पाटील, सर्जेराव खोत, प्रकाश मोरे, धनंजय पठाडे, महिला प्रतिनिधी शुभांगी निंबाळकर, सायली हुनुरे, सर्वेश भांदिगरे, अवधूत पाटील आदी उपस्थित होते.

उपाध्यक्ष संजय घाटगे यांनी आभार मानले.सूत्रसंचालन वीरेंद्रसिंह निंबाळकर यांनी केले.


# तलावात उडी घेऊन इसमाची आत्महत्या

मिरज,ता.२४( प्रतिनिधी)-



**शहरातील गणेश तलावात उडी घेऊन ५५ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली. तलावात मृतदेह तरंगताना आढळला.**

माहिती मिळताच मिरज शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सांगली स्पेशल रेस्क्यू फोर्सच्या पथकाने कमांडर कैलास वडर यांच्या नेतृत्वाखाली मृतदेह बाहेर काढला.सुरुवातीला ओळख पटत नसल्याने पोलिसांनी तलावाजवळ सापडलेली चप्पल, डायरी, पाकीट व चष्म्याची तपासणी केली. पाकिटातील छायाचित्राच्या आधारे चौकशी करून मृताची ओळख रवींद्र पांडुरंग कांबळे (वय ५५, रा. विद्यानगर, मिरज) अशी पटली.



**लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ लाक्षणिक उपोषण प्रसंगी अब्राहम आवळे,राहुल आवळे,माजी आम.राजीव आवळे, उदयसिंग पाटील, शिवाजी पाटील, शशांक बावचकर आदी.**

# आंदोलकांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ शांतिदूत सेवा संस्थेचे लाक्षणिक उपोषण

इचलकरंजी,ता.२४-

**दिल्ली येथील जंतर-मंतरवरील आंदोलनकर्त्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ शांतिदूत सेवा संस्थेच्यावतीने शुक्रवारी येथील म.गांधी पुतळ्याजवळ संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आवळे यांच्या नेतृत्वाखाली एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.**

दरम्यान,प्रांताधिकारी याना निवेदन देण्यात आले. लाठीहल्ल्याची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. शिक्षकमंत्री धर्मेंद्र प्रधान, गृहमंत्री अमित शहा व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा,अशी मागणी करण्यात आली. आंदोलनस्थळी जि. प. सदस्य राहुल आवळे,माजी आम.राजीव आवळे,विरोधी पक्ष गटनेते उदयसिंग पाटील, नगरसेवक शिवाजी पाटील, काँग्रेस सरचिटणीस शशांक बावचकर, माजी जि. प. स्मिता आवळे , नगरसेवक क्रांती आवळे,नागेश शेजाळे, संजय रेणके, संजय आढाव, उत्तम बेडगे, अनिल आवळे, अजित भोरे, अमर आळंदे, किरण भोसले, सुनील साठे उपस्थित होते.आंदोलन यशस्वीतेसाठी शांतिदूत सेवा संस्थेचे सर्व पदाधिकारी, महिला, पास्टर, ब्रदर आणि लीडर यांनी परीश्रम घेतले.

# केडीसीसीवरील दंड स्वतः भरण्यास संजयबाबा घाटगे तयार

## दंड माफीसाठी आरबीआयकडे पुन्हा अपील करणार: मुश्रीफ

कोल्हापूर, ता. २४ (प्रतिनिधी)-

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) केडीसीसी बँकेवर आकारलेला १३ लाख ३० हजार रुपयांचा दंड स्वतः भरण्याची तयारी माजी आमदार तथा बँकेचे तज्ज्ञ संचालक संजयबाबा घाटगे यांनी दर्शविली आहे. अन्नपूर्णा साखर कारखान्याच्या कर्जप्रकरणामुळे बँकेला कोणतीही आर्थिक किंवा प्रतिमेची तोशीस लागू देणार नसल्याची ग्वाहीही त्यांनी दिली असल्याचे केडीसीसी बँकेचे अध्यक्ष तथा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले.**

प्रसिद्धीपत्रकात मुश्रीफ यांनी म्हटले आहे की, आरबीआयने दंड आकारल्याची माहिती मिळाल्यानंतर घाटगे यांनी स्वतः दूरध्वनीवर संपर्क साधला. यावेळी त्यांनी, राज्यातील सर्वोत्कृष्ट सहकारी बँक म्हणून ओळख असलेल्या केडीसीसी बँकेच्या प्रतिमेला कोणताही धक्का लागू नये, ही आपली भूमिका असल्याचे सांगत दंडाची संपूर्ण रक्कम स्वतः भरण्याची तयारी दर्शविली. मुश्रीफ म्हणाले, अन्नपूर्णा साखर कारखान्याला प्रकल्प उभारणीसाठी १८ जून २०१९ रोजी कर्ज मंजूर करण्यात आले होते. त्यावेळी संजयबाबा घाटगे हे बँकेच्या संचालक मंडळावर नव्हते. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ रोजी त्यांची तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्ती झाली. नाबार्डने या कर्जाबाबत आक्षेप घेतल्यानंतर घाटगे यांनी ३० मार्च २०२६ रोजी अन्नपूर्णा साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला. ही सर्व वस्तुस्थिती केडीसीसी बँकेने आरबीआयला कळविली असतानाही दंड आकारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आरबीआयच्या डीईएएफ नियमांनुसार दहा वर्षांहून अधिक काळ व्यवहार नसलेल्या खात्यांतील रक्कम आरबीआयकडे वर्ग करणे आवश्यक असते. मात्र, न्यायालयीन आदेश, स्थगिती किंवा अन्य कायदेशीर कारणांमुळे गोठविण्यात आलेल्या काही खात्यांतील रक्कम तांत्रिक कारणांमुळे वेळेत वर्ग होऊ शकली नव्हती. नाबार्डने ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधित रक्कम तत्काळ आरबीआयकडे वर्ग करण्यात आल्याचेही मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

# हातकणंगलेत केंद्र सरकारच्या निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

हातकणंगले,ता.२४ (प्रतिनिधी)

**दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अमानुषणे केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ व शिक्षण मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा तसेच सदाभाऊ खोत यांनी विद्यार्थींना आतंकवादी संबोधल्या बद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा यासह अन्य मागण्यासाठी हातकणंगले तालुका कांग्रेस कमिटीतर्फे माजी आम. राजूबाबा आवळे यांच्या नेतृत्वाखाली हातकणंगले तहसील कार्यालय व पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला.यावेळी मागण्यांचे निवेदन देण्यात आले.**





आवळे म्हणाले, देशात भाजप सरकार हुकुमशाही पद्धतीचा कारभार करत आहे. शांतपणे आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यावर पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज करून अनेकांची डोकी फोडली तसेच भाजपे नेते बेदरकारपणे वक्तव्य करत आहेत. यामुळे देशातील लोकशाही धोक्यात आली आहे. गोरगरीब लोकांवर बळाचा वापर करून त्यांचा आवाज दाबला जात आहे. शिक्षणमंत्री धर्मेन्द्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जात नाही. त्यामध्ये सदाभाऊ खोत हे विद्यार्थाना आंतकवादी म्हणत आहेत. यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

यावेळी जि.प. सदस्य राहूल आवळे,सोनाली सांवत, बाजीराव सातपूते, डॉ.अभिजीत इंगवले, भगवान जाधव,उत्तम पाटील, गिरीष इंगवले, दयासागर मोरे, शकील अत्तार, अन्सार देसाई, निहाल सनदी, सचिन बोराडे, अमर वरुटे,विश्वास कोळी,गोविंद दरक, पिंटू किर्णींगे, ॲड. सुरेश पाटील, अप्पा ऐडके, प्रकाश खांडेकर, बाळासो प्रताप, राहूल चिनगे, गुलाब शेख, विनायक मोरे, दयासागर मोरे, अनिल पाटील, समीर शेख,मुन्ना शेख यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



## सैन्यमने १० मीटर एअर पिस्तूलमध्ये पटकावले रौप्यपदक

नवी दिल्ली,ता.२४–

**भारताची नेमबाज सैन्यम हिने चीनमधील हांगझोउ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषक रायफल/पिस्तूल/शॉटगन स्पर्धेत शानदार कामगिरी करत महिला १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक आपल्या नावावर केले. यासह तिने स्पर्धेत भारताचे पदक खातेही उघडले.**

अंतिम फेरीत सैन्यमने दबावाच्या परिस्थितीत उत्कृष्ट संयम आणि सातत्यपूर्ण कामगिरीचे प्रदर्शन करत २४३.४ गुणांची कमाई केली आणि दुसरे स्थान पटकावत रौप्यपदक जिंकले. हे तिच्या कारकिर्दीतील दुसरे आयएसएसएफ विश्वचषक रौप्यपदक असून, आंतरराष्ट्रीय स्तरावरील तिच्या सातत्याने उंचावत चाललेल्या कामगिरीचा तो पुरावा आहे.

यापूर्वी पात्रता फेरीत सैन्यमने ५७९ गुण मिळवत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले होते. संपूर्ण पात्रता फेरीत तिने अचूक नेमबाजीचे प्रदर्शन केले आणि त्याच लयीत अंतिम फेरीतही खेळ करत भारताला स्पर्धेतील पहिले पदक मिळवून दिले. हांगझोउ येथे सुरू असलेल्या या प्रतिष्ठेच्या जागतिक स्पर्धेत भारतीय नेमबाजांकडून पुढेही अनेक पदकांची अपेक्षा आहे. सैन्यमच्या रौप्यपदकामुळे भारतीय संघाचे मनोबल उंचावले असून स्पर्धेची सकारात्मक सुरुवातही झाली आहे.

# भविष्यात ऑस्ट्रेलिया- इंग्लंड कसोटी सामना भारतात होणार

## क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे सीईओ ग्रीनबर्ग यांचे संकेत

नवी दिल्ली,ता.२४–

**भविष्यात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामना भारतात खेळवला जाऊ शकतो. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉड ग्रीनबर्ग यांनी याबाबतचे संकेत दिले.**



सध्या टी-२० क्रिकेटची लोकप्रियता वाढत आहे. त्यामुळे कसोटी क्रिकेट पुन्हा चाहत्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी वेगवेगळ्या कल्पनांवर विचार सुरू आहे. त्यामध्ये भारतात ऑस्ट्रेलिया-इंग्लंड कसोटी खेळवण्याचाही पर्याय असल्याचे ग्रीनबर्ग यांनी म्हटलें आहे.सध्या असा कोणताही प्लॅन नाही. पण भविष्यात संधी मिळाली तर त्यावर नक्की विचार करू शकतो. आम्ही सर्व पर्याय खुले ठेवले आहेत. ग्रीनबर्ग यांनी सांगितले की, बीसीसीआय आणि इंग्लंड क्रिकेट बोर्डासोबत क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे भविष्यात भारतात मोठे सामने खेळवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात चार वर्षांनी ॲशेस मालिका खेळवली जाते. मात्र, भारतात कसोटी सामना झाला तरी तो ॲशेस मालिकेचा भाग असणार नाही. दरम्यान, क्रिकेट ऑस्ट्रेलिया भारतीय चाहत्यांपर्यंत पोहोचण्यासाठीही प्रयत्न करत आहे. त्याचाच भाग म्हणून यंदा डिसेंबरमध्ये चेन्नईमध्ये बिग बॅश लीगचा सामना खेळवला जाणार आहे. भारतात बिग बॅशचा सामना होण्याची ही पहिलीच वेळ असेल.भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या तीन देशांमध्ये कसोटी क्रिकेटला आजही चांगला प्रतिसाद मिळतो. त्यामुळे हा फॉरमॅट आणखी मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे.पुढील वर्षी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्या क्रिकेट संबंधांना १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त मार्च २०२७ मध्ये मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर विशेष कसोटी सामना होणार आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेटचे वेळापत्रक जाहीर

## २४ सप्टेंबरपासून स्पर्धा ; भारतासह चार संघ थेट क्वार्टर फायनलमध्ये

नवी दिल्ली,ता.२४–

**जपानमधील आयची–नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. आशियाई स्पर्धेत क्रिकेटचा यापूर्वी २०१०, २०१४ आणि २०२३ मध्ये समावेश करण्यात आला होता.**

वेळापत्रकानुसार पुरुषांची क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. तर महिलांची स्पर्धा १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत खेळवली जाणार आहे. ही स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये होणार असून सर्व सामन्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा असणार आहे.पुरुषांच्या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश या चार संघांना थेट क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश मिळाला आहे.

उरलेल्या सहा संघांना दोन गटांमध्ये विभागण्यात आले आहे. ग्रुप अ मध्ये नेपाळ, जपान आणि अफगाणिस्तान, तर ग्रुप ब मध्ये मलेशिया, ओमान आणि हाँगकाँग यांचा समावेश आहे. या दोन्ही गटांतील अव्वल दोन संघ क्वार्टर फायनलमध्ये पोहोचतील.भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ थेट क्वार्टर फायनलमध्ये असल्यामुळे त्यांच्यातील सामना फक्त सेमीफायनल किंवा फायनलमध्येच होऊ शकतो. मात्र त्यासाठी दोन्ही संघांनी आधी आपापले क्वार्टर फायनल सामने जिंकणं गरजेचे आहे. जर कोणताही संघ उपांत्य फेरीपूर्वीच स्पर्धेबाहेर झाला, तर भारत–पाकिस्तानचा सामना होणार नाही. महिलांच्या क्रिकेट स्पर्धेलाही थेट क्वार्टर फायनलपासून सुरुवात होणार आहे. भारताचा पहिला सामना यजमान जपानविरुध्द होईल. तर बांगलादेश–चीन, पाकिस्तान–थायलंड आणि श्रीलंका–मलेशिया असे सामनेही खेळवले जाणार आहेत. या सामन्यांतील विजेते संघ थेट उपांत्य फेरीत प्रवेश करतील.



### वैभव सूर्यवंशीकडे नजरा

**या स्पर्धेसाठी भारतीय पुरुष संघाची धुरा श्रेयस अय्यर सांभाळणार असून तिलक वर्मा उपकर्णधार असेल. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचाही संघात समावेश करण्यात आला आहे. जर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना झाला, तर वैभव सूर्यवंशी पुन्हा एकदा आपल्या आक्रमक फलंदाजीने पाकिस्तानच्या गोलंदाजांवर धावांचा पाऊस पाडणार का, याकडे क्रिकेट चाहत्याचे लक्ष लागले आहे.**



एफआयएच युथ हॉकी चॅम्पियनशिप: कझाकिस्तान,बांगलादेशचा धुव्वा

# भारतीय पुरुष - महिला संघांची विजयी घोडदौड कायम

मस्कत (ओमान),ता. २४ –

**एफआयएच यूथ हॉकी ५ एस आशियाई चॅम्पियनशिप २०२६ मध्ये भारतीय उप–कनिष्ठ महिला आणि पुरुष संघांची दमदार कामगिरी पाहायला मिळाली.गुरुवारी खेळल्या गेलेल्या एलिट पूलमधील सामन्यांमध्ये भारतीय महिला संघाने कझाकिस्तानचा १०–० असा धुव्वा उडवला, तर पुरुष संघाने बांगलादेशचा ८–३ असा पराभव करून सलग विजयाची मालिका कायम राखली.**

महिला गटात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. नौशीन नाझ हिने सामन्याच्या पहिल्याच मिनिटाला सलग दोन गोल झळकावत भारताला २–० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या हाफपर्यंत भारतीय संघ हीच आघाडी कायम ठेवत होता, मात्र दुसऱ्या हाफमध्ये त्यांनी खेळाचा वेग आणखी वाढवत आणखी आठ गोल करत कझाकिस्तानला पूर्णपणे सामन्याबाहेर फेकले. प्लेयर ऑफ द मॅच संदीपा कुमारी हिने ११व्या, १६व्या आणि १८व्या मिनिटाला गोल करत हॅट्ट्रिक पूर्ण केली. नौशीन नाझ हिनेही शानदार कामगिरी करत पहिल्या, पहिल्या, १५व्या आणि २०व्या मिनिटाला चार गोल झळकावले. याशिवाय किरण एक्का (१५ वे मिनिट), नीलम टोपनो (१७वे मिनिट) आणि पुष्पा मांझी (१९वे मिनिट) यांनीही गोल करत भारताचा एकतर्फी विजय निश्चित केला.

पुरुष गटात भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिल्या हाफमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. भारतीय कर्णधार आणि प्लेयर ऑफ द मॅच केतन कुशवाहा याने चौथ्या आणि आठव्या मिनिटाला दोन गोल केले, तर शाहरुख अली याने तिसऱ्या मिनिटाला एक गोल करत भारताला ३–२ अशी आघाडी मिळवून दिली. बांगलादेशकडून मोहम्मद होसेन (६वे मिनिट) आणि सोहराब सोटोन (८वे मिनिट) यांनी गोल करत सामना रंगतदार ठेवला. केतन कुशवाहा याने १२व्या आणि १५व्या मिनिटाला आणखी दोन गोल करत आपल्या चार गोलांची नोंद पूर्ण केली. तर रोमित पाल (१३वे मिनिट), प्रहलाद राजभर (१४वे मिनिट) आणि राहुल यादव (१८वे मिनिट) यांनीही प्रत्येकी एक गोल केला. बांगलादेशकडून सोहराब सोटोन याने ११व्या मिनिटाला आपला दुसरा गोल केला, मात्र तो संघाचा पराभव टाळू शकला नाही.

# इचलकरंजीत ''विठुराया हवा तुमचा सहवास'' गीताचे प्रकाशन

इचलकरंजी,ता.२४ –

**आषाढी एकादशी निमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ए.के. प्रोडक्शनने 'विठुराया हवा तुमचा सहवास' हे गीत विठ्ठल भक्तांच्या भेटीस आणले आहे.**



**विठुराया हवा तुमचा सहवास या गीताच्या प्रकाशनप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे – कोल्हे,अप्पर तहसीलदार महेश खिलारी, सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक राजेंद्र काणे.**

या गीताचे प्रकाशन अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे कोल्हे,अप्पर तहसीलदार महेश खिलारी, सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक राजेंद्र काणे यांच्या हस्ते झाले. या गीताची निर्मिती व गीतलेखन अरुण काशीद यांनी केले असून स्वरसाज सूर नवा ध्यास नवा फेम संज्योती जगदाळे यांनी चढवला आहे.याला संगीत दर्शन सुतार व ऋषिकेश ठाकूरदेसाई यांनी दिले आहे तर चित्रीकरण विक्रम खांडेकर, पवन गिरंगे यांनी केले आहे.

संकलन अक्षय जगताप यांनी केले असून मिक्स मास्टरिंग राधिका डिजिटल (होगाडे जॉबर) प्रवीण व प्रशांत होगाडे यांनी केले आहे.

या गीताने वारीची अनुभूती आल्याचे सुषमा शिंदे कोल्हे, यांनी सांगितले. भक्ती गीताचे श्रवण केल्यास ताणतणाव मुक्त राहण्यास मदत होत असल्याचे खिलारी यांनी सांगितले.काणे यांनी, ए.के .प्रोडक्शन च्या कार्याचे कौतुक केले.सूत्रसंचालन प्रा.रोहित शिंगे यांनी केले.यावेळी प्रसिध्द नृत्य दिग्दर्शक सुमित साळुंखे,योगेश कौंदाडे, तौफिक नाईकवाडे, सी.पी. कोरे,अनिल डांगरे उपस्थित होते.

# श्री विठ्ठल-रुक्मिणीला भरजरी काशी रेशमी पोशाख

## येवला पैठणीत माता रुक्मिणीचा शृंगार

सोलापूर,ता.२४ (प्रतिनिधी) –

**आषाढी एकादशी महापूजेच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहपरिवार श्री विठ्ठल व माता रुक्मिणीची महापूजा करणार असून, यंदा श्री विठ्ठल–रुक्मिणीसाठी खास भरजरी काशी रेशमी पोशाख तयार करण्यात आला आहे. हा विशेष पोशाख मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते देवाला अर्पण करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.**

यावेळी आचार्य तुषार भोसले,मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते. सोलापूरचे कुशल कारागीर शुभम तिवारी यांनी हा पोशाख अत्यंत बारकाईने साकारला असून, त्यासाठी आचार्य तुषार भोसले यांनी विशेष पुढाकार घेतला. काशीच्या शुद्ध रेशमी कापडापासून तयार करण्यात आलेल्या या पोशाखावर आकर्षक नक्षीकाम, भरजरी लेस आणि कलात्मक भरतकाम करण्यात आले आहे. श्री विठ्ठलांच्या अंगी, शेला व इतर वस्त्रांवर पारंपरिक भारतीय वस्त्रकलेचे उत्कृष्ट दर्शन घडते. महापूजेच्या दिवशी हा पोशाख दिवसभर श्री विठ्ठलांच्या अंगावर विराजमान राहणार आहे.माता रुक्मिणीच्या शृंगारासाठी येवला येथून खास रेशमी पैठणी मागविण्यात आली असून, पारंपरिक पैठणीमुळे देवीच्या अलंकारात अधिक वैभवाची भर पडणार आहे. या विशेष पोशाखामुळे यंदाचा आषाढी महापूजेचा सोहळा अधिक देखणा आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

राज्यभरातील लाखो भाविकांचे लक्ष लागलेल्या आषाढी महापूजेत श्री विठ्ठल–रुक्मिणीचा हा विशेष शृंगार आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार असून, महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रपरंपरेचा आणि स्थानिक कारागिरांच्या कौशल्याचा सुंदर आविष्कार म्हणून त्याची नोंद घेतली जात आहे.

# अर्जेंटिनाच्या निकोलस ओटामेंडीचा फुटबॉलला अलविदा

ब्यूनस आयर्स,ता.२४ –

**अर्जेंटिनाचा अनुभवी डिफेंडर निकोलस ओटामेंडीने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली.३८ वर्षीय ओटामेंडीच्या १७ वर्षांच्या शानदार आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट झाला. या काळात त्याने अर्जेंटिनाला २०२२ फिफा विश्वचषक आणि दोन कोपा अमेरिका विजेतेपदे मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.**



ओटामेंडीने अर्जेंटिनासाठी १३९ आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून ४ फिफा विश्वचषक स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले.फिफा विश्वचषक २०२६ मध्ये उपविजेता ठरलेल्या अर्जेंटिना संघाचाही सदस्य राहिला. ओटामेंडीने इन्स्टाग्रामवर भावनिक संदेश शेअर केला. त्याने लिहिले, आज मला माझ्या कारकिर्दीतील सर्वात कठीण शब्द लिहावे लागत आहेत. नशिबाने असे लिहिले की, माझा शेवटचा सामना विश्वचषक अंतिम सामना ठरला. निकाल आमच्या अपेक्षेनुसार लागला नाही, पण मी अभिमानाने निरोप घेत आहे.या संघाने शेवटच्या क्षणापर्यंत आपले सर्वोत्तम दिले. ओटामेंडीने युरोपमधील १६ वर्षांची यशस्वी कारकीर्द संपवल्यानंतर अर्जेंटिनाच्या दिग्गज क्लब रिव्हर प्लेटमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. युरोपमध्ये त्याने पोर्टो, व्हॅलेन्सिया, मँचेस्टर सिटी आणि बेनफिका यांसारख्या मोठ्या क्लबचे प्रतिनिधित्व करत अनेक संस्मरणीय यश मिळवले.त्याच्या निवृत्तीसह अर्जेंटिना फुटबॉलच्या एका सुवर्ण अध्यायाचाही समारोप झाला.

# आषाढी यात्रेसाठी पंढरपूर नगरपालिका सज्ज

## प्रशासनाकडून २५०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती; दररोज ४५ एमएलडी पाणीपुरवठा

पंढरपूर,ता.२४ (दिनेश खंडेलवाल)–

**आषाढी शुद्ध एकादशी २५ जुलै रोजी होणार असून, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून सुमारे १८ ते २० लाख भाविक येण्याची शक्यता आहे. येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.**

आषाढी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट ,६५ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी तसेच सुरळीत पाणीपुरवठा पाणीपुरवठा , सुरक्षित विद्युत पुरवठा उपलब्ध राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाकडून पंढरपूर नगरपालिका व जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून जिल्हा प्रशासनामार्फत २५०० कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

नदी पात्र, वाळवंट परिसर, वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (६५ एकर) व इतर विविध ठिकाणी १२ हिरकणी कक्ष स्थापन करण्यात येत असून कक्षाच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविण्यात येणार आहेत.शहरातील सार्वजनिक बोअरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज ४५ एमएलडी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार असून, त्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे. तसेच वारी कालावधीत शहरात विविध ठिकाणी ५० टँकरद्वारे पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या ,कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, जेटींग आदी वाहनांच्या माध्यमातून कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.दररोज १०० ते १५० टन इतका कचरा उचलण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यात्रेकरुंच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाकडुन ६५ एकर, नदी पात्र, पत्राशेड, मंदिर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणी आपत्तीव्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे . त्याचबरोबर पत्राशेड, वाळवंट, ६५ एकर परिसर, रेल्वे मैदान या ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात येणार आहेत.तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यासह प्रदक्षिणा मार्ग, दर्शन बारी येथील लाईट दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच नदीपात्रात व घाटावर अखंडित व पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नदीपात्रात हायमास्ट दिवे, घाटांवर एलईडी दिवे चालू करण्यात आले आहेत.

**भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन नगराध्यक्षा प्रणिती भालके व उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी केले आहे.**

# भारत–अफगाणिस्तान टी–२० मालिका १३ सप्टेंबरपासून

नवी दिल्ली,ता.२४–

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील ऐतिहासिक ३ टी–२० सामन्यांची मालिका १३ ते १७ सप्टेंबर दरम्यान दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवली जाण्याची शक्यता आहे.**

काही दिवसांपूर्वीच भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये एकमेव कसोटी सामन्याचा आणि ३ वनडे सामन्याच्या मालिकेचा थरार रंगला. या मालिकेत भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवला. आता अफगाणिस्तानचा संघ पुन्हा एकदा भारत दौऱ्यावर येणार आहे.अफगाणिस्तानचा संघ पाहुणा संघ असूनही यजमानपद भुषवताना दिसून येणार आहे. त्यामुळे ही मालिका ऐतिहासिक ठरणार आहे.

वृत्तानुसार, भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये होणारी ऐतिहासिक टी–२० मालिका १३ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या कालावधीत खेळवली जाणार आहे. क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच असे घडणार आहे की, भारतात येऊन दुसरा देश टी–२० मालिकेचे आयोजन करणार आहे. पण बीसीसीआय आणि अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाकडून अद्यापही कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

झिम्बाब्वे मालिका झाल्यानंतर भारतीय संघ २ कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. त्यानंतर भारतीय खेळाडू आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी रवाना होणार आहेत.